किनाऱ्यावर येत होते. लेखक प्रभात होत होते. क्षितिजावर येऊन वाङमयात झेपावत होते. दलित साहित्याला ही आयडेंटिटी, अस्मिता लाभताच दलितांच्या प्रतिभांना दिशा लाभल्या, आणि उड्डाणांचे आशय ठरले. डॉ. वानखडे हे अनात्म-प्रतित्य समुत्पादवादी कलावादाचा अभ्यासपूर्ण प्रतिवाद मांडणारे, हिंदु देवदैवतांवर प्रहार करणारे. आजवरच्या दलित साहित्याला डॉ. वानखडयांच्या या मूल्यांनी युक्त अशा लेखनाचा आकार आहे. अशी सगळी मूल्यांची स्पष्टता, कलेतील भूमिकांची स्पष्टता आणि दलितांच्या साहित्याला देह आणि चेहरा डॉ. वानखडयांच्या धडपडीतून प्राप्त झाला. आणि जातीत लेले, भारत -जनता यापुरते असलेले दलित साहित बुद्धाभीमाने निर्मिलेली क्रांती हत्यारे घेऊन ठीच्याच नव्हे, भारताच्याच नव्हे ये समाज आणि वाङमय प्रबोधनासाठी

# आंबेडकरवादी
# आस्वादक समीक्षा



म्हणजे नाचात्र विचार आणि त्याचा असलेल्या अवि ार. जीवनासंबंधी अत्यंत गंभीर आणि ेती. त्यांनी नेहरु-करांना दि ति मोठे अन्वर्थक आहे. ते म्ह ले विचार कल्पना दुसऱ्यांना देतो. त्या तंत्र्यपू तात. ते सर्वसामान्य नसतात. मला वाटतं बाहेर फेकलेल्या कल्पना विचारातूनच जगातील सर्व चळवळींचा उगम झाला आहे.' आणि त्यांनी नागपूर दलित साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात लेखन हे केवळ लेखन नव्हे तर कृतीही ( ॲक्ट ) आहे' हे सार्त्रचे वचन उद्धृत केले आहे. त्यानुसारच डॉ. वानखडे हे जिवंत मनाचे व विचाराचे विचारवंत होते. एक जिवंत प्रेरकता त्यांच्या विचारात होती. आणि दलित साहित्याला, चळवळीला त्यांचे विचार विशेष प्रेरक आणि मार्गदर्शक

# आंबेडकरवादी आस्वादक समीक्षा

डॉ. यशवंत मनोहर

प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर–४१६ ०१२

आंबेडकरवादी Ambedkarwadi
आस्वादक समीक्षा Aaswadak Samiksha

डॉ.यशवंत मनोहर Dr.Yashwant Manohar

प्रथमावृत्ती १९९१

प्रकाशक :
सौ. अनिता दिलीप गवळी
'कपिलवस्तु'
२८३८ क, प्लॉट नं. ७ अ, बी वार्ड,
दत्तनगरशेजारी–जवाहरनगर,
कोल्हापूर–४१६ ०१२

मुद्रक :
श्रीपाद सीताराम गोसावी
राजहंस प्रिंटिंग प्रेस,
नागाळा पार्क, कोल्हापूर–४१६ ००३
फोन : २३९०६

मूल्य रुपये ५५/–

© डॉ. यशवंत मनोहर
नागपूर विद्यापीठ, नागपूर

मुखपृष्ठ–अनंत खासबारदार, कोल्हापूर
ब्लॉक– शरद पंडीत, पूजा स्क्रीनप्रिंटर्स, कोल्हापूर

– प्रमुख वितरक –
मे. सिद्धार्थ बुक सेंटर
१३ ई, महालक्ष्मी चेंबर्स, एस. टी. स्टॅंडसमोर,
कोल्हापूर–४१६ ००१

'बा'च्या जन्मशताब्दी वर्षाला . . .

— यशवंत

# प्रस्तावनांची प्रस्तावना

ही प्रस्तावना म्हणजे प्रस्तावनांची प्रस्तावना! मागील बारा – पंधरा वर्षांमध्ये अनेक पुस्तकांना मी प्रस्तावना लिहिल्या. त्यातील काही प्रस्तावना आज "आंबेडकरवादी आस्वादक समीक्षा" या पुस्तकाच्या रूपाने प्रकाशित होत आहेत ही माझ्यासाठी विशेष आनंदाची बाब आहे.

या पुस्तकातील एकेक प्रस्तावना आदरपूर्वक केलेल्या स्वागताची एकेक कमानच आहे. आंबेडकरवादी साहित्याला तत्त्वज्ञान देणाऱ्या आदरणीय डॉक्टर म. ना. वानखडे यांच्या पुस्तकाला मी एक ऐतिहासिक कर्तव्य म्हणून प्रस्तावना लिहिली. इतर प्रस्तावनांच्या मागे मात्र वेगळी भूमिका आहे. ही भूमिका स्वागताची आणि स्वागत करता करताच समीक्षेचीही आहे. त्यामुळे चिकित्सापूर्ण स्वागते असे स्वरूप या प्रस्तावनांना आहे. आंबेडकरवादी साहित्याच्या परिवारात मी वेळोवेळी नव्या आणि महत्त्वाच्या उद्रेकांचे असे स्वागत केले. सूर्यकुलाचे सभासद व्हायला आलेल्या प्रज्ञांचे आणि प्रतिभांचे मी त्यांच्या शक्तीच्या इतमामाने आदरातिथ्य केले. या पुस्तकात अनेक काव्यप्रतिभांचे स्वागत आहे. कथाप्रतिभांचे आणि नाट्यप्रतिभांचे स्वागत आहे आणि विचारप्रतिभांचेही स्वागत आहे.

यातील 'युद्धाई' या पुस्तकाची प्रस्तावना सर्वांत आधीची तर 'मूकेची भूपाळी' या पुस्तकाची प्रस्तावना सर्वांत अलीकडची आहे. या प्रस्तावना कालक्रमानुसार दिलेल्या नाहीत. शिवाय मराठील सावित्रीकुलाची कविता आणि युद्धभूमीकडे निघालेली कविता या दोन प्रस्तावना या ना त्या कारणामुळे पुस्तकांसोबत प्रकाशित होऊ शकल्या नाहीत. पण हा प्रस्तावना–राग अनुक्रमे अधिकाधिक प्रत्ययकारी होत गेला आहे.

आज तर प्रस्तावनालेखन म्हणजे विशेषच जबाबदारीची गोष्ट वाटते. वैचारिक वा ललित ग्रंथकृतीच्या सौंदर्याचे, सामर्थ्याचे आणि निराळेपणाचे मर्म उकलून दाखविण्याचे कार्य प्रस्तावनेला करावे लागते. त्या त्या ग्रंथकृतीची स्वभाववैशिष्ट्ये चपखलपणे मांडून दाखविणारी प्रस्तावना त्या त्या कृतीच्या पुढील आकलनावर प्रभाव गाजविणारा दस्तऐवज ठरू शकते.

प्रस्तावना म्हणजे प्रशंसा, पाठराखण असे मानण्यात येत असले तरी ते खरे नव्हे. प्रस्तावना खुद्द एक जबाबदार कृती असते. ती एक समतोल समीक्षा असते. प्रस्तावना हा अत्यंत सापेक्षी आणि समतोल असा अभिप्राय असतो असे असले तरी इतर अनेक कारणांमुळे प्रस्तावनांमध्ये अनुसूचित प्रकार शिरत असतात.

खरे तर प्रस्तावना ही एक नवनिर्मितीच असते. त्या त्या ग्रंथकृतीसंबंधी प्रस्तावनाकार प्रथमच बोलत असतो. प्रस्तावनाकाराच्या बोलांना त्यामुळे प्रवर्तकपणाचे मोल प्राप्त होण्याची शक्यता असते. प्रस्तावना ही एक महत्त्वाची आणि जबाबदार कृती ठरते त्याचे हेच कारण आहे.

प्रस्तावनेतील समीक्षा ही आस्वादक समीक्षाच असते. हा आस्वाद सुस्पष्ट वाङ्मयीन भूमिकेच्या पायावर उभारलेला असणे आवश्यक असते. अशा भूमिकेमुळे प्रस्तावनेला सूत्र लाभते. दिशा लाभते. तिला तिचा एकसंध जीवनाशय आणि सुभग असा घाट लाभतो. कलावंताचे वा ग्रंथकाराचे व्यक्तित्व, ज्याचा त्याला अनुभव येतो त्या समाजजीवनाचे व्यक्तिमत्त्व, ग्रंथकृतीची निर्मिती, व्यक्ती व समाज यांच्या मनावर तिचा होणारा परिणाम या सर्वच प्रक्रियांना समुचितपणे सामोरी जाणारी वाङ्मयीन आणि जीवनावश्यक भूमिका प्रस्तावनाकाराजवळ असावी लागते.

एखादा ग्रंथ, एखादी साहित्यकृती ही व्यक्तित्वसंपन्न अशी एक सांस्कृतिक घटना असते. त्या विवक्षित भाषेतील संपूर्ण वाङ्मयीन परंपरा, समकालीन जाणीवप्रवाह आणि द्वंद्वशील नैतिकता यांच्या संदर्भात सिद्ध झालेली असते. निर्मात्याचे व्यक्तिमत्त्वसुद्धा त्यांची सामाजिक पार्श्वभूमी, समकालीन वास्तवाशी त्याचा विशिष्ट संबंध आणि त्यावर होणारे वैचारिक संस्कार यांच्यामुळे विशिष्ट प्रकारेच जीवनाला सामोरे जात असते. या सर्व स्पंदनशील कक्षांच्यासंदर्भात कलाकृतीची वीण तपासावी लागते.

साहित्यकृतीच्या निर्दोषतेचे, चांगलेपणाचे किंवा असामान्यतेचे अधोरेखन प्रस्तावनाकाराला करावे लागते. तशी साहित्यकृतीच्या सदोषतेची फसलेपणाची, तिच्या नैतिक भूमिकेची आणि सामान्यत्वाचीही मीमांसा त्याला करावी लागते. साहित्यकृतीतील सौंदर्यशक्ती आणि नैतिकशक्ती यांच्या परस्पर उपकारक सामरस्याचाही शोध घ्यावा लागतो. यामुळे प्रस्तावनेला मूल्यगर्भ आस्वादक समीक्षेचे रूप प्राप्त होते.

माझ्या एका प्रस्तावनेच्या निमित्ताने डॉ. वि. स. जोगांनी काढलेले उद्‌गार इथे मी उद्‌धृत करीत आहे. माझी प्रस्तावना त्यांना कविताच वाटते. ते म्हणतात " मनोहरांचे अलीकडील प्रत्येक लिखाण हे गद्य म्हणावे की पद्य म्हणावे असा संभ्रम पडतो. काव्य म्हणावे तर तर्कशुद्ध विचारांची ती अखंड मांडणी असते. गद्य म्हणावे तर त्यातील प्रत्येक शब्द ध्वन्यार्थाचा संगीतमय आविष्कार करतो." ( समुचित: जाफेमा, ९१ ) असो.

सदर पुस्तकातील आस्वादक समीक्षेमागे आंबेडकरवादी सांस्कृतिकता आणि नैतिकता उभी आहे. या नैतिकतेच्या आणि या नैतिक भूमिकेवर संभवणाऱ्या वाङ्मयीन भूमिकेच्या प्रकाशात काही ग्रंथकृतींचे आस्वादन मी वेळोवेळी केले आहे, ही विवक्षित आस्वादने म्हणजे या प्रस्तावना !

माझे धम्मबंधू व प्रियदर्शी प्रकाशनाचे दिलीप गवळी व सौ. अनिता गवळी यांनी आगत्यपूर्वक या पुस्तकाच्या प्रकाशनाची जबाबदारी घेतल्याबद्दल मी त्यांचे मनापासून आभार मानतो. कोल्हापूरचे चित्रकार अनंत खासबागदार व पूजा स्क्रिनचे शरद पंडीत यांनी या पुस्तकातील विषयाला अत्यंत प्रभावीपणे आविष्कृत करणारे सुंदर मुखपृष्ठ करून दिल्याबद्दल त्यांचेही व राजहंस प्रेसचे मालक, कर्मचारी वर्ग यांचेही आभार.

**— डॉ. यशवंत मनोहर**

# अनुक्रमणिका

१. दलित साहित्याचे तत्त्वज्ञानसौंदर्य
: दलितांचे विद्रोही वाङ्मय : डॉ. म. ना. वानखडे, १९८१

२. आंबेडकरी विचारांचे लावण्य
: फुले–आंबेडकरी चळवळ : धनराज डाहाट, १९९०

३. आंबेडकरी कवितेतील गाणारे वादळ
: हुंकार वादळांचे : भाऊ पंचभाई, १९८९

४. मुक्तियुद्धाचे पडघम वाजवणारी कविता
: मुक्तियुद्ध : दिवाकर बोवडे, १९९०

५. मराठीतील सावित्रीकुलाची कविता
: अग्निशिखा : सुगंधा शेंडे, १९८९

६. युद्धभूमीकडे निघालेली कविता
: युद्धघोष : संजू नाईक

७. दु:खितांच्या कवितेचा अग्निपिसारा
: अग्निपिसारा : अविनाश वरोकर, १९८३

८. दलित कवितेची युद्धाई
: युद्धाई : अजय रामटेके, १९७९

९. नव्या संस्कृतीचा गर्भ वागविणारी कविता
: घुगऱ्या : दु. मो. लोणे

१०. पालवीच्या रंगांची मैफिल
: प्रीती पल्लवी : विशाल बी. ओव्हाळ, १९८९

११. आंबेडकरी कवितेतील सिंहनाद
: मुकेची भूपाळी : हृदय चक्रधर, १९९०

१२. रमाई करुणेचे महाकाव्य
: रमाई : संपादक : सिद्धार्थ तलवारे, १९९१

१३. दलित कथेतील विजांचे वादळ
: विटाळ : चंद्रकांत वानखेडे १९८८

१४. दु:खाला नायक करणारी विद्रोही कथा

: निखाऱ्यातील फुले : रमेश पाटील, १९८८

१५. विद्रोहाचे नाट्यसौंदर्य

: इथे माणसाला स्थान नाही : बाजीराव रामटेके १९८७

१६. जखमांचे शहर

: शहर : अमर रामटेके, १९८४

१७. स्वातंत्र्याच्या तहानेचे नाट्य

: स्वातंत्र्य हवे आम्हाला : वि. रू. गोडबोले, १९८७

१८. एका नियतकालिकाचे ' अंधेरे बंद कमरे '

: अस्मितादर्शची नऊ वर्षे : वामन निंबाळकर १९७७

# दलित साहित्याचे तत्त्वज्ञानसौंदर्य

तेवीस मार्च, १९७८ ची गोष्ट. डॉ. वानखडे सरांचे पत्र आले. त्यात त्यांनी लिहिले होते:–"मी येत्या ३१ मार्चला एक दीड महिन्यासाठी अमेरिकेस जाणार आहे. त्यामुळे माझा पत्रव्यवहार बंद राहील." आणि सुमारे सव्वा महिन्यातच त्यांच्या मृत्यूची बातमी वाचावी लागली. एक मे ७८ रोजी अमेरिकेतच त्यांचा मृत्यू झाला होता. एक दीड महिन्याच्या बोलीने थांबलेला पत्रव्यवहार कोणत्याही स्पष्टीकरणाशिवाय नंतर कायमचाच थांबला.

आम्ही औरंगाबादेच्या मिलिंद महाविद्यालयाचे विद्यार्थी, डॉ. वानखडे हे आमचे आदरणीय प्राचार्य हे प्राचार्य आमच्या आयुष्यविश्वात एका संदिप्त चिरंतनाची स्मरणिका झालेले आहेत. या व्यक्तित्वाला केवळ महाविद्यालयाचे प्राचार्य एवढीच एकटी एक शाखा नव्हती. या व्यक्तित्वात अनेक आशयदार पैलूंचे मोहक शाखा संमेलनच भरले होते. एकाचवेळी हे व्यक्तित्व मोहकही होते आणि दाहकही होते. या व्यक्तित्वाचा प्रचंड दरारा होता. मनोमनी आदरही होता. अपरंपार भीति आणि प्रिती या व्यक्तित्वाविषयी एकाचवेळी वाटे. या मनाच्या सायंदालनात जसा रसगंधांचा खिन्न–प्रसन्न सोहळा सुरू असे तशी दुसऱ्या प्रखर लोकसन्मुख दालनात विद्रोहाची आणि क्रांतीची गणिते मांडली सोडवली जात असत. या दालनाच्या कानाकोपऱ्यात वादळ संचारलेले असे. कधी मोहकतेचेही दालन दाहकतेच्या दाहीदिशांनी दीक्षित होई आणि लेखनात हीच केंद्रियता आशय–अभिव्यक्तिच्या संमिश्रणाचा जिवंत आरसा होऊन जाई.

म्हणूनच डॉ. वानखडे आमचे प्राचार्य होते ही त्यांच्या आणि आमच्या नात्याची संपूर्ण ओळख नव्हे. कवी आणि विचारवंत यांची करुण–कोमलता आणि प्रज्ञा–प्रखरता ऊरभर सांभाळत आयुष्यभर हा प्राचार्य जगला, या विशेष सिद्धी–शक्तीमुळे हा प्राचार्य अधिकारवाणीने आमच्या मनोविश्वाचा सन्माननीय नागरिक झाला. हे त्यांचे प्राचार्यपण

आमच्यासाठी असे अनेकवचनी होते. बहुवाणी होते. दलित साहित्याच्या प्रबोधनवास्तूचे प्रेरणांकन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले आणि डॉ. म. ना. वानखडे जणू या वास्तूचेही पहिले प्राचार्य ठरले. डॉ.वानखड्यांचे प्राचार्यपण आमच्यासाठी खरे रक्ताचे प्राचार्यपण होते.

या आपल्या प्रिय प्राचार्याचा १ मे, १९७८ रोजी अनपेक्षित मृत्यू झाला आणि दलित साहित्याच्या प्रथमखंडाचा पूर्णविराम शोकसंवेदनांनी अधोरेखित झाला.

डॉ. वानखड्यांचे मिळवता आले ,तेवढे सर्व लेखन आम्ही मिळवले. त्याचे लेखन प्रथमच या ग्रंथाच्या रूपाने एकत्रित प्रकाशित होत आहे. आम्हाला त्यांच्या लेखा–भाषणांचा हे संग्रहण मराठी वाचकांच्या हाती देताना गुरुऋणातून अल्पांशाने का होईना मुक्त झाल्याचे समाधान आणि आनंद वाटत आहे.

दलित समाज आणि साहित्याच्या चळवळीतील एक थोर विचारवंत आणि साहित्य विमर्शक म्हणून डॉ. वानखडे यांचे नाव अक्षर झाले आहे. या पुस्तकातील समग्र लेखन आणि त्या लेखनाचा काळ डॉ. वानखडे आणि दलित साहित्य ह्यांच्या हार्दिक आणि तार्किक संबंधाचे उद्‌घाटन करीत आहे. या समग्र लेखनातून दलित उपेक्षितांच्या उत्थानाचे विज्ञान जसे विखुरले आहे, तशी दलितांच्या भावानुभावाच्या आविष्काराची वाङ्मय घटनाही शिलिपत झालेली आहे. डॉ. वानखडे या मूल साहित्य घटनेचे शिल्पकार आहेत.

या सर्वच लेखनातून आपला संवाद घडतो तो दलितांच्या सामाजिक आणि वाङ्मयीन उत्थानाच्या चळवळीशी. या चळवळीचा भक्कम आशयपट या लेखनातून आपुल्यापुढे उलगडला जातो. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकराच्या लोकशाही समाजवादाच्या रचनाप्रकल्पकाचे सेंद्रिय अधिष्ठान या लेखनाला आहे. बाबासाहेबांच्या लोकशाही समाजवादाच्या रचनाप्रकल्पाचे विज्ञान डॉ. वानखड्यांच्या विचाराचे रक्तमांस झाले होते. वानखडे हे मूलतः आंग्ल वाङ्मयाचे प्रगाढ पंडित होते. (१९६२ते६६) निग्रो वाङ्मयाने डोळस आणि विद्रोही मोरपिसारा त्यांच्या अभिरुचिला होता. अमेरिकेतून पी. एच. डी. ही सर्वोच्च

पदवी घेऊन भारतात परत आल्यावर औरंगाबादेला त्यांनी एका नव्या वाङ्मयीन संस्कृतीची घटना सिद्ध केली. त्यानिमित्ताने अधिक आस्थेने मराठी साहित्य, भारतीय समाजजीवन आणि दलित जीवनाचे उत्थापन या संबंधी मनःपूर्वक चिंतन त्यांनी केले. दलित साहित्याच्या चळवळीला त्यांनी सुघटीत आकार दिला. (त्याचे व्यक्तिमत्वच एवढे प्रभावशाली होते की, चर्चा अस्मिता इ. त्यांनी सुरू केलेल्या उद्घाटनपर उपक्रमांच्यामुळे दलित साहित्य हा मराठी साहित्यात सार्वत्रिक आणि गंभीर चिंतनाचा विषय ठरला) दलित साहित्याचे जीवन आणि कला दर्शन–दिग्दर्शन प्रथम करणारे डॉ. वानखडे दलित साहित्याच्या समीक्षेतली शुभारंभाची कहाणी झाले आहेत.)

त्यांचे सर्वच लेखन वाङ्मयातील आणि जीवनातील प्रबोधनाच्या प्रतिज्ञाच शब्दबद्ध करीत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा ज्ञानतृषेचा वारसा वाङ्मय आणि समाज याही संदर्भात गंभीरपणे चालविणारी माणसे दलित समाजात अत्यंत विरळाच आहेत. डॉ. वानखडे या विरळांपैकी एक अग्रगण्य होत. डॉ. वानखडे यांच्या मृत्युने दलितांचे एक गौरवशाली विचारपीठच, एक शक्तीपीठच दलितांना अंतरले आहे. आणि त्यांच्या या लेखनाच्या रूपाने एक विचार म्हणून डॉ. वानखड्यांचे आयुष्य आता दलितांच्या आयुष्यात नावरूप मिळवते झाले आहे प्रस्तुत निबंधसंग्रहातील लेखन एका डोळस अभ्यासू आणि लोकशाही समाजवादाच्या तंतुंनी ज्याचा दृष्टिपट विणला गेला होता. अशा दिग्दर्शकाचे विचारदर्शन होय. एका विद्रोही आयुष्यविश्वाचे हे चिंतन होय.

म. ना. वानखडे यांचा जन्म १९२४ साली झाला. वडील नामदेवराव वानखडे सरकारी नोकरीत असल्याने शिक्षणासाठी त्यांना वडिलांच्या स्थलांतरांबरोबर भ्रमंती करावी लागली. शालेय आणि महाविद्यालयीन जीवनात अत्यंत बुद्धिमान विद्यार्थी म्हणून त्यांचा लौकिक होता... कांतीमान चाफेगौर वर्ण. दृष्टिला सौंदर्योत्सव वाटावे असे रूप. टाय, कोट ज्या चार दोन माणसांना शोभतो त्या चारदोनात डॉ. वानखडे आहेत. आणि शास्त्रकाट्याच्या कसोटीवर उतरेल

अशी टापटीप, सुंदर भारी आणि साहेबी थाटाच्या कपड्यांचे डॉ.बाबासाहेबासारखेच व्यसन आणि चालण्यात, बोलण्यात, वागण्यात, पेहरावात सर्वच बाबतीत एक अमराठीपणा होता. आणि 'इंग्रजीपणा' होता. लाखामध्ये एखाद्याच्याच ठिकाणी जाणवावा असा या मनोहर व्यक्तित्वाचा विलास होता. महाविद्यालयात डॉ.वानखडे आपल्या खास चालीने आणि शैलीने प्रवेशले की संबंधीत क्षेत्रात इंग्लीश हवा पडत असे. त्यांच्या येण्यामुळे मैफलीत, सर्वत्र उत्साह, एक सुसंस्कृतता आणि हवेत ' ऐलिश्य ' निर्माण होत असे. शेकडो माणसे डॉ. वानखड्यांना पाहण्यासाठी केवळ आलेली आम्ही पाहिली आहेत.

नागपूरच्या तेव्हाच्या मॉरीस कॉलेजमधून इंग्रजी विषय घेऊन बी.ए ऑनर्सच्या परीक्षेत ते सर्वप्रथम आले. त्यांनी सुवर्णपदक मिळविले. काव्यात्म पिंडप्रकृती, इंग्रजी वाङ्मय आणि भाषा यावर प्रभुत्व आणि इंग्रजीचे नटमोगरी मोहक इंग्रजी उच्चारण. वानखड्यांचे भाषण एकाच वेळी दृश्य आणि श्राव्य काव्य असे, कानांना आणि डोळ्याना ती इंग्रजी पंचपक्वानांची पर्वणी असे . . . . . . त्यामुळे केवळ बी. ए. ऑनर्सच्या बळावरच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांना मिलिंद महाविद्यालयात इंग्रजीच्या अध्यापनासाठी पाचारण केले होते. डॉ. वानखड्यांच्या व्यक्तित्वातील उड्डाणशीलता आणि विषयनैपुण्य बाबासाहेबांनी नेमके हेरले होते आणि डॉ. बाबासाहेबांनी उच्च शिक्षणासाठी विलायतेला पाठविण्यासाठी ज्या चौदा विद्यार्थ्यांची निवड केली होती. त्यात म. ना. वानखडे यांचाही गौरवपूर्ण अंतर्भाव केला गेला होता. यावेळी प्रकृती अस्वास्थ्यामुळे आपला नियोजित अभ्यासक्रम पूर्ण करू शकले नाहीत. पण १९६२ साली ते अमेरिकेला गेले. त्यांनी यावेळी सन्मानाने ए.एम्. आणि पीएच.डी.या वाङ्मय विभागातील बहुमानाच्या सर्वोच्च पदव्या संपादन केल्या. अमेरिकेतील विद्यापीठातून काही काळ त्यांनी इंग्रजीचे अध्यापनही केले. अमेरिकेला जाणाच्या आधी व वरील उच्च पदव्या मिळण्याच्या आधीच मिलिंद महाविद्यालयात ते इंग्रजीचे प्राध्यापक होते. आणि एम ए.च्या विद्यार्थ्यांना इंग्रजी शिकवित होते. एक उत्तम सर्जनशील प्रतिभेचे प्राध्यापक म्हणून याहीवेळी त्यांचा लौकि होताच.

१९५८ पासून ते मिलिंद महाविद्यालयाचे प्राचार्यही झाले होते . . . . १९६२ते६६ या काळात ते अमेरिकेत होते. आणि तेथून परत आल्यावर पुन्हा ते मिलिंदमध्ये प्राचार्यपदी विराजमान झाले . . . अमेरिकेतील वास्तव्यात त्यांनी विश्वविद्रोही अशा निग्रो साहित्याच्या चळवळीचे सूक्ष्म असे अध्ययन केले, निग्रो साहित्याचे रसिकावलोकन केले. या चळवळी सांस्कृतिक भूतकाळाचा आणि भविष्यातील आकांक्षारेखांशाचा उत्कट पोटतिडिकेने त्यांनी परिचय करून घेतला. आणि मोरपिसाऱ्याला आग लागलेले मन घेऊनच ते भारतात आले. त्यांच्या अभिनंदनासाठी जाणाऱ्या अनेक साहित्यप्रेमी लोकाजवळ निग्रो चळवळीचे प्रबोधक अनुभव ते तळमळून सांगत असत.

डॉ.वानखडयांच्या परत येण्याने मिलिंद परिसराच्या अंगप्रत्यंगात आता वादळे जागू लागली होती. आता हा परिसर भरतीच्या लाटांवर आरूढ झाला होता. यावेळी त्यांची पहिली व्याख्यानमाला मिलिंद महाविद्यालयात १९६७ च्या जानेवारीमध्ये ३०, ३१ ला आणि फेब्रुवारीच्या १ तारखेला मिळून तीन दिवस झाली. कवितेशीसमीक्षेशी संबंधीत तीन विषय होते. आमचे मराठीचे सर्वात आवडते प्राध्यापक रा. ग. जाधव हे त्यावेळी आमचे एकमेव मार्गदर्शन होते. त्यांनीच विषय सुचविण्यापासून शेवटपर्यंत आम्हाला दिग्दर्शन केले. व्याख्यानमालेच्या शेवटच्या दिवशी चर्चा झाली. त्या चर्चेत रा. ग. जाधव, प्रा. रायमाने, श्री. वाघ अशी मिलिंद परिसरातील वाङमयाशी संबंधीत सर्वच मंडळी हजर आणि सहभागी होती. दलित साहित्याच्या घटनासिद्धित या व्याख्यानमालेलाही शुभ मुहुर्ताची कहाणी म्हणून अनन्य महत्व आहे. काही प्रकाशनपीठ, वाङमयीन चळवळ आपण उभी केली पाहिजे, असा उच्चारही त्यांनी प्रथम इथेच केला होता.

मधल्या काळात परिसरातील नवोदितांच्या व्यथा त्यांच्यापर्यंत पोचल्या होत्याच. पुढे ३०–४–६७ ला भुसावळ येथे झालेलेल्या बौद्ध साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष झाले, याहीवेळी नव्या लेखकांची धडपड त्यांनी डोळयांनी प्रत्यक्ष पाहिली. प्रकाशनपीठाअभावी, एखाद्या मासिकाअभावी त्यांची होणारी कुचंबणाही त्यानी हेरली. त्यानीच

मिलिंद परिसरात या दिशेने प्रथम वातावरण तयार केले मासिकाचा संकल्प त्यांचाच, त्यांच्याच तळमळीचा उच्चार आहे. आणि त्यांच्याच प्रेरणेने मिलिंद साहित्य परिषदेची स्थापना औरंगाबादेच्या मिलिंद परिसरात झाली. २७ नोव्हेंबर १९६७ रोजी तिचे उद्‌घाटन झाले. डॉ. म. ना. वानखडे हे प्रारंभ काळात या परिषदेचे अध्यक्ष होते.

प्रा. वा. ल. कुळकर्णी, प्रा. रा. ग. जाधव इ. विद्वानाशी वानखड्यांचा विचारविनिमय सुरू होताच. बंद प्रश्न मांडले जात होते. अडचणी अंथरल्या जायच्या, तर कधी मनातील उत्तरांचे पट उलगडले जायचे. एखादे समर्थ नियतकालिक, एखादे माप नेणारे समर्थ प्रकाशनपीठ, पावसाळून आलेल्या प्रतिभांना, विजाळून आलेल्या प्रज्ञांना एखादे आविष्कारपात्र निर्माण व्हावे ही गोष्ट त्यांनी खूपच मनावर घेतली होती. वाङ्मय हा विषय आता, त्यातील विद्रोह आणि प्रबोधनासहित त्यांच्या मनाच्या परिसरात सारखा बर्दळू लागला होता निग्रो साहित्याच्या पेटले आभाळ शद्वात घेणाऱ्या चळवळीने त्यांच्या मनाची अवघी दालनेच धगधगू लागली होती आणि दलितांमधले जेम्स बॉल्डवीन, रिचर्ड राईट, राल्फ एलिसन त्यांना दिसायला लागले त्यांच्या शद्वातून आंबेडकरांच्या स्वप्नाकारात विद्रोह झडताना दिसू लागला. कलेच्या पात्रात न सामावणारी क्रांती महापूर झालेली त्यांना दिसू लागली. मराठी साहित्यातील वादळांची स्वप्ने त्यांना पडू लागली, दलितांमधला वॉल्ट व्हिटमन पाहण्यासाठी त्यांचे मन तडफडू लागले. अधिर, व्याकूळ झाले. या स्वप्नांचीच सत्ता अमेरिकेतून भारतात येताना आणि आल्यावर त्यांच्या मनावर होती भारतात उतरले ते या स्वप्नांचे पंख घेऊनच. आणि आल्या आल्या त्यांनी या स्वप्नाला ‘दलितांनो विद्रोही वाङ्मय लिहा’ असा शद्व दिला. जागपणीचे ते स्वप्न आता मातीशी मस्ती करू लागले. हे घडले ते साल होते १९६६. दलिताच्या साहित्यायुष्यातली ही युगप्रवर्तक क्रांतीघटना आहे. दलित साहित्यिकांना मिळालेला हा आव्हानाचा शद्व होता. वानखड्यांच्या तळमळीतून बदलत्या युगानेच दलितांना साद घातली होती. एका नव्या मन्वंतराची नौबत झडली होती. दलितानो विद्रोही

वाङमय लिहा ! या युगवाणीतून बाबासाहेबानंतरचा दलितांचा दुसरा प्रेषितन वाङमयाच्या क्षितिजावरून ठिणग्या उधळीत गरजला होता.

दलित साहित्यातील मन्वंतराचे दुसरे निशाण त्यांनी एका मूलगामी चर्चेच्या रूपाने फडकाविले. ही चर्चा दलित साहित्याच्या वाङमयीन घटनासिद्धिच्या प्रक्रियेतील आद्यचर्चा म्हणून आता दलित साहित्याच्या क्रांतीमान इतिहासात वज्रलेप झाली आहे. ही चर्चा अस्मितादर्शच्या पहिल्या अंकात म्हणजे अस्मितेत प्रकाशित झालेली आहे. महाराष्ट्रातील आज उद्याचा सांस्कृतिक संघर्ष आणि वाङमयीन समस्या हे या चर्चेचे नाव आहे. अस्मितेचा पहिला अंक निघाला. ही चर्चा स्वत: वानखडे यांनीच घडवून आणली. स्वत: धडपडून ही चर्चा दलित साहित्याचा एक ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून आम्ही या पुस्तकात घेतली आहे. ह्या चर्चेतील सर्व विचारमंथन वानखड्यामुळे घडले. दलित साहित्य हा या चर्चेने प्रथमच मराठीत विचारविषय झाला. महाराष्ट्रातील विद्वानाच्या चिंतनक्षेत्रात या चर्चेद्वारा त्यांनी दलित साहित्य हाही विषय अंतर्भुत केला. दलित साहित्याच्या चिंतनाची क्षेत्रमर्यादा आणि महत्त्वमर्यादा या चर्चेमुळे महाराष्ट्राएवढी विस्तृत झाली. भारत आणि भारताबाहेर दलित साहित्याची वस्ती निर्माण होण्याच्या शक्यता निर्माण झाल्या. ही चर्चा म्हणजे दलित साहित्याच्या शुभारंभाच्या कहाणीचा जाहीरनामा आहे. ही चर्चा म्हणजे मराठी साहित्यिक व विचारवंत यांच्यापुढे टाकलेला प्रश्नांचा पट. उभारलेला आव्हाने. या चर्चेने दलित साहित्याच्या चळवळीला विद्रोहाची देणगी दिली. त्याचे मनआंगण कक्षासंपन्न केले. या आधीच्या चळवळीचे रूप हे एखाद्या कुजबुजीसारखे होते. दलितांपुरती ही अस्पष्ट कुजबुज मर्यादित होती. या चर्चेने दलितसाहित्य चळवळीला खणखणीत,दणदणीत उच्चार दिला आणि या उच्चारास डोळस गंभीर विद्रोहाचा आशय दिला.

प्रकाशनपीठाअभावी दलित साहित्यिकांची होणारी कोंडी वानखड्यांना यातना देत होती. पण आतून त्यांची मन:शक्ती पल्लवीत होत होती आणि परिणामत: मिलिंद महाविद्यालयाच्या मैदानावर सायंकाळी विचार विनिमयाची प्रभात उमलत असे. पहिल्याच बैठकीत. . . .

. . . मिलिंदची प्रचंड प्रेरणादायी वास्तु. समोर विस्तीर्ण मैदान कोपऱ्यात भव्य रंगमंदिर. त्याच्यासमोर युगंधर बाबासाहेबांचा स्फूर्ति देणारा पुतळा, बैठकीच्या रूपाने आमच्या झपाटलेल्या मनाचे स्वप्नवेधी पक्षी या मैदानातर मनसुब्याचे मोहोर घेऊन आले. सायंकाळचा संधिप्रकाश स्वप्नांतर करू लागला. या मिलिंदच्या मातीला जण ऐतिहासिक मोलाच्या वेणा सुरू झाल्या. दलितांच्या साहित्यिक भवितव्याचे, भव्य चळवळीचे बांधकाम या मिलिंदच्या मैदानावर पिसारले. आणि बाबासाहेबांच्या प्रेरणेचे निष्ठावंत पाईक असलेले डॉ. वानखडे आम्हा सर्वांना नायकपदी होते. मार्गशोधकही ते होते. मार्गदर्शकही ते होते. आणि आम्हा सर्वांची पाऊले त्यावेळी हे एकनिष्ठ पाईकपण भूषणावह मानीत होती. या प्राचार्य रा. ग. जाधव, प्रा. रायमाने, सुखराम हिवराळे, श्रीयुत पानतावणे इत्यादी लोक या बैठकीना येत. आम्हीही त्यात होतो. नंतर बैठकी कधी वानखडे साहेबांच्या घरी, कधी ऑफिसात तर कधी मिलिंद – मैदानावर अशा सुरू झाल्या आणि त्रैमासिक काढायचा संकल्प डॉ. वानखड्यांच्या मुखातून सुटला. कल्पना डॉ. वानखड्यांची धडपड त्यांचीच. संकल्प त्यांचाच. संघटन, जागरण त्यांचेच. माणसांना कार्याला प्रवृत्त करण्याची त्या प्रवृत्तीला वेग आणण्याची योजना–तळमळ त्यांचीच आर्थिक संदर्भात भार पेलण्याचे धाडस व्यक्त करून इतराना बळ दिले ते त्यांनीच - - - आणि सम्मादिठ्ठी या ठरलेल्या बोजड नावाऐवजी ‘अस्मिता’ नावाने त्रैमासिक काढण्याची योजना त्यांच्या अधिनायकत्वाखाली उभारली गेली. आणि डिसेंबर १९६७ साली ‘ अस्मिता ” या नावाने सुमारे एक वर्षाची सर्व धडपड, स्वप्ने आणि संकल्प प्रकाशित झाले. अस्मितेचे सल्लागार, प्रेरक, सूत्रधार वानखडेच होते. प्रकाशक–संपादकही तेच होते ‘ अस्मितेचे ’ कार्यकारी संपादक होते. प्रा. रा. ग. जाधव अस्मिता हे नाव शासनाकडून मंजूर झाले नाही. त्याऐवजी अस्मितादर्श हा सूचवलेला बदल मंजूर झाला. आणि दुसऱ्या अंकापासून “ अस्मिता ” “ अस्मितादर्श ” या नावाने प्रकाशित होऊ लागली. अस्मितेचा आणि अस्मितादर्शचा हा संबंध आहे.

वानखड्यांचे धीर गंभीर आंग्ल विद्याविभुषित असे अत्यंत रुबाबदार आणि प्रभावशाली व्यक्तिमत्व, त्यांचे प्राचार्यपद, त्यांच्यातला शिस्तप्रिय प्रशासक या सर्व गोष्टींचा परिणाम म्हणून त्यांनी उभारलेल्या वरील सर्व गोष्टींना एक वजनदारपणा आपोआपच लाभत गेला. त्याला आदरणीयत्व व गांभीर्य प्राप्त झाले. १९६८ साली जालना येथे भरलेल्या मराठवाडा साहित्य संमेलनात दलित साहित्यावरील पहिला परिसंवाद घेतला गेला. १९६९ साली भालेरावांनी मराठवाड्याचा दिवाळी अंक दलित साहित्य विशेषांक म्हणून काढला आणि असे दलित साहित्य क्रमाने दलितेतरांच्या चिंतनकक्षेत प्रवेशत गेले. महाराष्ट्रभर ठिणग्या पसरल्या याचे श्रेय वानखड्यांना अस्मितेने केलेल्या जागृतीला तिच्या निमित्ताने झालेल्या खळबळीला तिच्यातून मोठ्या परिश्रमाने वा. ल. कुळकर्णी, मे. पुं. रेगे, प्रा. रा. ग. जाधव, म. भि. चिटणीस अशा विद्वानांची जी चर्चा घडवून त्यांनी तिला प्रकाशित केली आहे. आणि या क्षणांच्या जन्मांपासून दलितांच्या साहित्याकडे दलितेतर जाणकार मराठी समीक्षक पाहू लागले. एका विवक्षित दृष्टीने पाहू लागले. त्याआधी होणारी शंकरराव खरातांची समीक्षा वेगळ्या दृष्टीने होई. अण्णाभाऊ, ना. रा. शेंडे इ. सर्वच लेखकांचा विचार वेगळ्या दृष्टीने होई याचा पुरावा म्हणून १९६३ साली प्रकाशित झालेल्या बाबुराव बागूलांच्या ' जेव्हा मी जात चोरली होती ' ची प्रस्तावना वाचावी दलितांच्या या सर्वश्रेष्ठ साहित्यिकाकडे पाहण्याची दृष्टी कशी होती याचे हे प्रातिनिधीक उदाहरण आहे तेव्हा इतर लेखकांचा आणि आधीच्याही लेखकांचा विचार कुठल्या दिशेने होत असेल याची कल्पना करता येण्यासारखी आहे.

पण डॉ. वानखड्यानी जे नवे वातावरण घडवले तिचा आणि ती चर्चा, अस्मिता यांच्या वादळाचा परिणाम होऊन दलित साहित्याला चेहरा मोहरा–देह आकारच प्राप्त झाला. आणि आता खरात, शेंडे, अण्णाभाऊ, बाबुराव सर्वांकडेच वेगळ्या दृष्टीने पाहिले जाऊ लागले. त्यांच्यात वेगळी अन्वर्थकताही दिसू लागली. दलितांच्या साहित्याकडे पाहण्याचा एक वेगळा परस्पेक्टिवच वानखड्यांच्या या घडपडीतून

साकार झाला होता. मन्वंतरच पडले. लेखक लाटा होत होते. किनाऱ्यावर येत होते. लेखक प्रभात होत होते. क्षितिजावर येऊन वाङमयात झेपावत होते. दलित साहित्याला ही आयडेंटिटी, अस्मिता लाभताच दलितांच्या प्रतिभांना दिशा लाभल्या, आणि उड्डाणांचे आशय ठरले. डॉ. वानखडे हे अनात्म–प्रतित्य समुत्पादवादी कलावादाचा अभ्यासपूर्ण प्रतिवाद मांडणारे, हिंदु देवदैवतांवर प्रहार करणारे. आजवरच्या दलित साहित्याला डॉ. वानखडयांच्या या मूल्यांनी युक्त अशा लेखनाचा आकार आहे. अशी सगळी मूल्यांची स्पष्टता, कलेतील भूमिकांची स्पष्टता आणि दलितांच्या साहित्याला देह आणि चेहरा डॉ. वानखडयांच्या धडपडीतून प्राप्त झाला. आणि जातीत असलेले, भारत –जनता यापुरते असलेले दलित साहित्य आता बुद्धाभीमाने निर्मिलेली क्रांती हत्यारे घेऊन मराठीच्याच नव्हे, भारताच्याच नव्हे तर विश्वाच्या रंगपटावर येऊन समाज आणि वाङमय प्रबोधनासाठी क्रांतीसाठी उभे राहिले.

दलित साहित्याचा विचार म्हणजे अवघ्या जीवनाचाच विचार आणि त्याचा परिपाक असलेल्या अविष्काराचा विचार. जीवनासंबंधी अत्यंत गंभीर आणि सुंदर आस्था डॉक्टरसाहेबांना होती. त्यांनी नेहरू-करांना दिलेल्या मुलाखतीत म्हटले आहे ते या संदर्भात मोठे। अन्वर्थक आहे. ते म्हणतात– ' विचारवंत विचार करतो. आपले विचार कल्पना दुसऱ्यांना देतो. त्याचे हे विचार चैतन्यपूर्ण असतात. ते सर्वसामान्य नसतात. मला वाटतं विचारवंतानी बाहेर फेकलेल्या कल्पना विचारा-तूनच जगातील सर्व चळवळींचा उगम झाला आहे. ' आणि त्यांनी नागपूर दलित साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात लेखन हे केवळ लेखन नव्हे तर कृतीही ( ॲक्ट ) आहे ' हे सात्रंचे वचन उद्धृत केले आहे. त्यानुसारच डॉ. वानखडे हे जिवंत मनाचे व विचाराचे विचारवंत होते. एक जिवंत प्रेरकता त्यांच्या विचारात होती. आणि दलित साहित्याला, चळवळीला त्यांचे विचार विशेष प्रेरक आणि मार्गदर्शक ठरू शकले. त्यांचे लिहिणे म्हणजे लेखनही होते आणि कृतीही होते. दलित समाजाच्या, भारतीय शोषित समाजाच्या सुखदु:खांशी आणि

भावभावनांशी, त्यांच्या उत्थानाच्या प्रक्रियेशी ते मनाने सामर्थ्याने एकरूप झाले होते. बाबासाहेबांच्या धार्मिक चळवळीत बाबासाहेबांच्या नंतर जे आनंद कौसल्यायन यांचे स्थान तेच जिवंत स्फोटक आणि सजग स्थान बाबासाहेबप्रेरित वाङमयीन चळवळीत डॉ. बानखडे यांचे आहे. दलित साहित्याची चळवळ स्वातंत्र्योत्तर काळातील एक युगप्रवर्तक आणि सर्वात जिवंत चळवळ आहे. बाबासाहेबांनी प्रेरित केलेल्या धार्मिक राजकीय चळवळीची त्यांच्यानंतर हेळसाड झाली. पण ज्या दलित साहित्याच्या चळवळीने भारतीय प्रस्थापित मनांना अभूतपूर्व हादरे दिले दिले त्या आंबेडकरप्रेरित दलित साहित्याच्या चळवळीचे सरसेनापतीपद डॉ. बानखडे यांनी मोठ्या समयोचीतपणे सांभाळले, अस्मिता ही ॲक्टिव्हिटी त्यांच्यामुळे सुरू झाली. तिच्यातील आदिचर्चा त्यांनी घडवून आणली. मिलिंद साहित्य परिषदेच्या स्थापने-मागील प्रेरणा त्यांची या आधीच्या दलित साहित्याच्या चळवळीचे स्वरुप पाहावे आणि या नंतरचे स्वरुप पाहावे निश्चित गुणात्मक फरक जाणवतो. त्या आधीच्या दलितांच्या लेखनाला चळवळीचा चेहरा नाही. एका कोणत्या नेमक्या दिशेचा जागर नाही गरज नाही. एका दालनाचे प्रांतांचे पृथगात्मतेचे अलंकार ते लेखन ल्याले नव्हते, खरात, अण्णाभाऊ साठे, शेंडे, बंधु माधव आणि यांच्याही आधी किसन फागू वगैरेसारखे लेखक लिहित होते. पण हे सर्व प्रयत्न विखुरलेले, एकजीव न झालेले, एका चळवळीची जाणीव नसलेले लेखन होते. अस्मिता, तिच्यातील ती आदिचर्चा यांनी दलित साहित्याला चळवळीचे अधिष्ठान दिले, सर्वांना एका केंद्राने बांधण्याची किमया साधली. विखुरलेला, रानोमाळ असलेला दलित साहित्यिकाचा क्रांतीमंत मेळा एकजटीने पुढे आला. एक स्वप्नाची, स्वतंत्र सुभ्याची, परगण्याची जाणीव अस्मितेने आणि त्या आदिचर्चेने लेखकांना करून दिली. मराठवाडा दिवाळी अंकात मोठा परिसंवाद ६९ मध्ये आला, ६८ मध्ये जालना साहित्यसंमेलनात पहिला परिसंवाद घेतला गेला. ही सर्वच प्रतिक्रिया अस्मितेची, तिच्यातील त्या सर्व प्रश्नांच्या मुळांना हात घालणाऱ्या आदिचर्चेची होती. आणि दलित साहित्य हे आंबेडकर

प्रेरणेचा अविष्कार मानणाऱ्या एका निष्ठावंत आंबेडकरवाद्याची, त्यांनी सुरू केलेल्या अस्मिता या ॲक्टीव्हीटीची.

दलित साहित्याची जीवनमूल्ये आणि वाङ्मयीन मूल्ये डॉक्टर म. ना. वानखडे यांच्या लेखनात अधिकारवाणीचे वैभव घेऊन आविष्कृत झाली आहेत. अनेक लेखकांचे लेखन त्यांच्या विचारचिंतनाने प्रभावित झाले आहे.

सुबुद्ध वाचकाला या पुस्तकातील शब्दाशब्दातून जाणवत राहील की हे लेखन आंबेडकरवादी जीवननिष्ठांनी भारलेल्या सुसंस्कृत मनाचे लेखन आहे. प्रतिगामी हेतु उरात जपणाऱ्या कलावादाच्या विरुद्ध दलित साहित्याला उभे करण्यात जसे डॉक्टरसाहेबांचे ऐतिहासिक कार्य अंतर्भूत आहे तसे सुस्पष्ट सांस्कृतिक आणि वाङ्मयीन मूल्यांचे बुद्ध–आंबेडकरप्रणीत चालते बोलते दीपस्तंभ या साहित्याच्या पावलांपुढे सिद्ध करण्यातही त्यांचे एक क्रांतदर्शित्व आहे. त्यामुळे लिट्ल मॅगॅझिन्स-मधून लिहिणारे, पारंपरिक थाटाघाटाचे लेखन करणारे दलित लेखक पटापट या नव्या स्रोतात जमा झाले. आणि गतिमान झाले. आणि मराठी साहित्यातील मूल्यवर्गविग्रह स्पष्ट झाला साहित्याच्या कुरुक्षेत्रावर मराठी साहित्य दोन छावण्यात विभागले गेले. या छावण्याच्या संस्थापनात डॉ. वानखडेचांचा वाटा सरसेनापतीचा आहे.

उमेदीच्या वयात डॉ. वानखडेचांनी दर्जेदार नियतकालिकातून काव्यलेखन केले. पीएच. डी. चा वॉल्ट व्हिटमनवरील प्रबंध, त्यांचे आधेअधुरे आत्मचरित्र हे सर्वच लेखन अप्रकाशित आहे.

प्रस्तुत ग्रंथात डॉ. वानखडे यांच्या काही मूळ इंग्रजी लेखांची भाषांतरे आलेली आहेत. त्यापैकी झेन आणि बीट जनरेशन आणि मराठी पोवाड्यातील देवदेवतांचे दर्शन ही दोन भाषांतरे वाईच्या विश्वकोशातील अ. र. कुलकर्णी यांनी तातडीने करुन दिलीत त्याबद्दल त्यांचे आम्ही हार्दिक आभार मानतो. ' म. शिक्षण आणि सामाजिक सुधारणा ' हे भाषांतर म. य. उपाध्य, बाबा दळवी यांनी करून दिले याबद्दल आम्ही बाबांचेही ऋणी आहोत. इतर कार्यात प्रा. प्रकाश, कुमारी मालती जंजाळ यांनी आम्हास सहकार्य केले

त्यांचे आम्ही आभारी आहोत या ग्रंथाचे मुद्रक श्रीप्रसाद मुद्रणालयाचे चंद्रकांत तापस व त्यांचे कर्मचारी,चित्रकार पुंजे,मयुर आर्टसचे फरकाडे यांच्या सहकार्याबद्दल आभार.

बलितांचे विद्रोही वाङमय : डॉ. म. ना. वानखडे

# आंबेडकरी विचाराचे लावण्य

मित्र धनराज डाहाट यांच्या 'फुले – आंबेडकरी चळवळ' या वैचारिक लेखांच्या पुस्तकाला ही छोटीशी प्रस्तावना मला अत्यंत आनंद होतो आहे.

धनराज डाहाट हे आंबेडकरी चळवळीतील एक धडाडीचे कार्यकर्ते आहेत. 'जयभीम' परिवारातील एक सक्रीय सभासद ते आहेत ही त्यांची ओळख आंबेडकर समाजाला आहेच. अधूनमधून ते लेखनही करतात आणि ते लेखन विचाराला जागवणारे आणि चालना देणारेही असते, याही अंगाने त्यांनी आपले नाव जाणकार वाचकांच्या मनात नेऊन उभे केले आहे. या पुस्तकाच्या रूपाने ते एक ताकदीचे वैचारिक निबंधलेखक म्हणून मराठी वाचकांपुढे येत आहेत. साहित्य क्षेत्रातील निबंध या दालनात त्यांचा प्रवेश होत असताना या प्रस्तावनेच्या रूपाने टाळी वाजवून मी उत्स्फूर्त दाद देत आहे

वैचारिक निबंध ही एक शक्ती आहे. या शक्तीची उपासना म्हणजे खरे तर समाजपरिवर्तनाचीच उपासना असते. समाजाला वैचारिक निबंधामुळे गती प्राप्त होते. समाज गतिशीलता असतो. असे आपण म्हणतो पण ही गतिशीलता त्याला वैचारिक उठावांमुळेच प्राप्त होते.मनुष्य चालू शकतो. धावू शकतो कारण तो जिवंत असतो. त्याच्यात प्राण असतो. विचार म्हणजे समाजाचा प्राण. हा त्या समाजात असेल तर समाज चालू शकेल. योग्य दिशेने चालू शकेल. प्रगतीच्या वाटेवर

धावू शकेल. ज्या समाजात विचार असतो तोच समाज जिवंत असतो. अशाच समाजाला गतीशील समाज म्हणता येते. हे नसेल तर समाज अगतिक होतो. गतीशून्य होतो. स्थितीशील होतो. अशा समाजाला थांबलेला समाज म्हणतात. समाजाचे असे थांबणे म्हणजे त्याची मृतावस्थाच होय. ही मृतावस्था कधी शेकडो वर्षे संपत नाही. कधी ती हजारो वर्षे संपत नाही. कधी कधी समाजाला या मृतावस्थेचीच अशी सवय जडते की या सवयीचा परिणाम म्हणून तो जिवंतपणाचा भयंकर तिरस्कार द्वेष करायला लागतो. असा समाज, समाज म्हणून अस्तित्वात असणेच नाकारीत असतो.

असा समाज विचाराचे स्वागत तर करू शकत नाहीच पण त्याहीपुढे जाऊन तो विचार करण्याचीच नव्हे तर विचार सहन करण्याचीही शक्ती गमावून बसतो आपल्या समाजाचा इतिहास फार मोठ्या प्रमाणात विचार न करण्याचा आणि त्याहून विचार सहन न करण्याचा इतिहास आहे. विचार सहन करता न येण्याचा इतिहास हा समाजाच्या मृत्यूचाच इतिहास असतो. व्यक्तीच्या पातळीवरही असेच म्हणता येते. विचार न करणारे आणि विचार सहन न करू शकणारे मन हे मेलेले मन असते. हे मन जिवंत शरिरात गाडलेले असते एवढेच !

निबंध ही विचार प्रक्रिया आहे. उच्चतर जीवन जगण्याची प्रक्रिया आहे. व्यक्तीच्या वा समाजाच्या जगण्याची उंची त्या व्यक्तीच्या वा समाजाच्या निबंधातील विचारावरून निश्चित करता येते. लोकहितवादी, जोतीबा फुले, गोपाळ गणेश आगरकर, मानवेंद्रनाथ रॉय आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आपल्या समाजातील थोर वैचारिक पराक्रम होत. त्यांच्या विचारांनी आपला समाज प्राणवत झाला. त्यांच्या विचारांच्या पावलांनी हा समाज प्रकाशवाटेवर चालायला लागला. हे असे वैचारिक मंथन त्या त्या वेळी ज्या प्रमाणात झाले त्यात्यावेळी आणि त्या प्रमाणात आपला समाज सळाळून निघाला.

अलीकडच्या काळात बाबासाहेबांच्या विचारांनी केलेले पराक्रम आपण पाहिले. हजारो वर्षे मृतवत जिणे जगणाऱ्या उपेक्षितांना त्यांच्या विचारांने सुंदर आणि विद्रोही जगणे बहाल केले. विचारांनी तपासून

घेतलेले जगणे हेच अर्थपूर्ण जगणे होय ही जाण बाबासाहेबांच्या विचारांनी अनेकांना दिली. अनेक मनांना विचार करण्याच्या, वैचारिक झुंजीच्या प्रेरणा दिल्या. आंबेडकरवादी साहित्यात जसा ललित साहित्याच्या लावण्याचा प्रपंच उलगडला तसा अलीकडच्या काळात वैचारिक निबंधाच्या निर्मितीलाही वेग आला. अर्थात चांगले कसदार वैचारिक लेखन करता येणे हा तपस्येचा, दीर्घकालीन व्यासंगाचा भाग आहे हे खरेच. आंबेडकर समाजात आता कुठे जशा विद्याव्यासंगाची परंपरा हळूहळू निर्माण व्हायला लागली आहे. साहित्यिकांच्या मागच्या पिढीतही असे गंभीर लेखन करणारी नावे थोडीच आहेत. नव्या पिढीत अशी नावे आता रंगपटावर येवू लागली आहेत. धनराज डाहाट हे त्यातले एक अत्यंत महत्वाचे नाव आहे असे मला वाटते. आंबेडकरी वैचारिक निबंधवाङमयात मित्र धनराज डाहाट यांच्या रूपाने कसदार वैचारिक पिळ असलेला एक निबंधलेखक दाखल होतो आहे या गोष्टीचा मला स्वतःला मनापासून आनंद होतो आहे.

या आनंदाचे एक विशेष कारण असे की धनराज डाहाट यांचे सदर पुस्तकातील लेखन निखळ आंबेडकरवादी वैचारिक लेखनाच्या परंपरेत सन्मानाने बसू शकणारे लेखन आहे. आज दलित म्हणवल्या जाणाऱ्या सर्वच लेखकांचे वैचारिक लेखन आंबेडकरी वैचारिक लेखनात निर्विवादपणे समाविष्ट करता येण्यासारखी परिस्थिती नाही. वरील लेखकांचे वैचारिक लेखन पुढील तीन प्रकारांमध्ये विभागता येते. काही लेखक 'आंबेडकर + मार्क्स' अशी बेरीज करतात. हा हा लेखकांचा एक वर्ग झाला. काही लेखक 'आंबेडकर + हेडगेवार' अशी बेरीज करतात हा दुसरा लेखकांचा वर्ग. तर लेखकांचा तिसरा वर्ग 'आंबेडकर + फुले + बुद्ध' अशी बेरीज करतो. या संदर्भात संभवणारा चौथा पण दलितेतर विचारवंताचा एक छोटा वर्ग आहे. हा वर्ग 'मार्क्स + फुले + आंबेडकर' बेरीज करताना दिसतो.

या सर्व बेरजांमागे वेगवेगळी प्रामाणिक-अप्रमाणिक अशी उद्दिष्टे संभवतात. वेगवेगळी प्रकट-अप्रकट धोरणे संभवतात. यापैकी काही धूर्तपणाची असतील. काही धोरणे भाबडेपणाची असतील तर काही

धोरणांमागे खोल राजकीय लपंडाव दडलेले असतील.पण वरील बेरजा अस्तित्वात आहेत हे उघड आहे.

हे काहीही असले तरी आता आंबेडकरवादी विचारवंतांवर एक प्रचंड ऐतिहासिक जबाबदारी येऊन पडलेली आहे.या विचारवंतांनी आपले वैचारिक शील प्राणपणाने जपायला हवे, ही ती जबाबदारी होय. वैचारिक शिस्त आणि तार्किकसुसंगती या अंगांनी आंबेडकरी तत्त्वसरणीला आपल्या हातून कोणतीही इजा होणार नाही खबरदारी घेण्याची आज मोठीच गरज आहे. आंबेडकरवादाच्या वैचारिक कक्षा आणि दिशा यांची स्वच्छ रेखाकृती या लेखकांपाशी असायला हवी. भावनेच्या बावटळी त भिरंगत राहणे निराळे आणि तर्कालाच आंबेडकर मानून त्याचा तोल बिघडू न देता निश्चित वाटचाल करणे निराळे. आंबेडकरवादी विचारवंताला न डगमगता या तर्काच्या दोरीवरून चालता आले पाहिजे. भावनेच्या सुखस्वप्नांमधून जनमानसाला बाहेर आणणे आणि त्याला या वैचारिक निबंधकाराला करायचेच आहे पण क्रांतीविरोधी असलेल्या एकूणच भारतीय समाजाला क्रांतीमनस्क करण्याचे कार्यही त्याला करायचे आहे. आपण आंबेडकरवादी का आहोत या प्रश्नांचे अत्यंत समर्पक उत्तरही त्याच्याजवळ असले पाहिजे. भारतीय समाजक्रांतीचे सर्वात यशस्वी आणि उपकारक, मनुष्योपयोगी आणि राष्ट्रोपयोगी, मानवतावादी आणि शास्त्रीय असे मॉडेल केवळ आंबेडकरवादाजवळ आहे हे या लेखकाला स्वच्छपणे पटवून देता यायला पाहिजे. आपण आंबेडकरवादी असण्याचेही तेच कारण आहे हे त्याला स्पष्ट शब्दात सांगता आले पाहिजे.

यासाठी जाणत्या आंबेडकरवादी लेखकांनी पुढली दहा-पंधरा वर्षे आंबेडकरवादाच्या मांडणीसाठी खर्ची घातली पाहिजेत. हे कार्य गंभीरपणे आणि जबाबदारीने अनेक व्यासंगी लोकांनी करायची गरज आहे आजच्या राजकारण्याचा हातून हे होणार नाही. धर्मकारण करणाऱ्या भिक्षूंच्या आणि तत्सम इतरांच्या हातून हे होणार नाही. सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या हातूनही हे होण्याची आशा नाही. आपल्या बहुतांश प्राध्यापकांच्याकडून असे काही घडेल

याची चिन्हे दिसत नाहीत. आता राहता राहिला लेखकांचा वर्ग. यांच्यामध्येही वर सांगितल्याप्रमाणे काही अत्यंत विघातक बेरजा करणारे लोक आहेत. त्यांच्याकडूनही हे होईल असे समजण्यात अर्थ नाही. यामधला जो 'आंबेडकर+ फुले +बुद्ध' अशी बेरीज करतो त्याने काही खबरदारी घेतली तर त्याच्या हातून हे कार्य होण्याची आशा बाळगायला हरकत नाही. याही लेखकाला आंबेडकरी निरीश्वरवादाला विरोधी जाणाऱ्या सर्वच गोष्टी वरीलप्रमाणे बेरीज करतानाही काटेकोरपणे काढून टाकता आल्या पाहिजेत. हे आंबेडकरवादी वैचारिक लेखकच करू शकतो. एवढा वैचारिक निर्दयपणा या लेखकालाच शक्य आहे.

वरील सर्व विवेचनाच्या पार्श्वभूमीवर आपण मित्रवर्य धनराज डाहाट यांच्या या पुस्तकातील लेखनाचे महत्त्व काळजीपूर्वक लक्षात घेतले पाहिजे. या देशातील बुद्ध हा पहिला थोर सत्यशोधक, फुले हे दुसरे थोर सत्यशोधक आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर या महान सत्यशोधकांच्या परंपरेला शक्तीशाली करणारे, या सत्यशोधकी परंपरेवर कळस शोभणारे आजचे सर्वश्रेष्ठ सत्यशोधक होत असा निष्कर्ष लेखकाने काढलेला आहे तो लक्षात घेण्याजोगा आहे. बुद्धांच्या काय किंवा फुल्यांच्या काय सत्यशोधक समाजाला या देशातील ब्राह्मणेतरांनी पुढे नेले नाही तर या सत्यशोधक समाजाच्या वादळांचा खराखुरा विकास डॉ.आंबेडकरांनी केला हा लेखकाचा अभिप्राय मान्य व्हावा असाच आहे.

या पुस्तकातील लेखांमधून डाहाट यांनी आजचे राजकारणी आणि फुले, धर्म आणि धम्म, मंडल आयोग, सत्यशोधक समाज, हिंदू धर्म, ब्राह्मणशाही, गांधीवाद, ब्राह्मणेतर समाज, समाज प्रबोधनाची परंपरा, शिवसेना, रा. स्व. संघ, साहित्य, शिवाजी महाराज या आणि अशा अनेक विषयांचा परामर्श या पुस्तकातील लेखांमधून घेतला असला तरी या सर्व विषयांच्या विवेचनामागील त्यांचे सूत्र एकच आहे. ते सूत्र म्हणजे बहुजन समाज आणि दलितसमाज हे दोन्ही समाजच नव्हेत तर या देशातील इतरही सर्व अल्पसंख्य समाज एकत्र यावेत हे होय. हे असे एकत्र येणेच भारतीय समाजक्रांतीच्या दिशेने वाटचाल करण्याला उपकारक ठरू शकेल असे मनापासून या लेखकाला वाटते.

या देशातील क्रांती कुठे अडली आहे ? तर ती बहुजन समाज परंपरावादी असणे, जातीवादी आणि बुद्धांच्या-फुल्यांच्या आणि आंबेडकरांच्या विरोधात असणे या वस्तुस्थितीच्या बांधाला अडली आहे. हा अडसर दूर कसा होईल हाच खरा आजच्या वैचारिक लेखकांसमोरचा आणि परिवर्तनवाद्यांसमोरचा प्रश्न आहे. या बहुजनसमाजाला धर्माचे विष पाजून ब्राह्मणशाही ही एकाचवेळी स्वत:चे हितसंरक्षण आणि दलितांसकट इतर सर्वच अल्पसंख्याकांचा काटा काढणे हे दुहेरी कार्य बहुजन समाजाकडून करवून घेत आहे. बहुजन समाजाने विद्रोही व्हावे. फुल्यांच्या–आंबेडकरांच्या क्रांतीविचाराचा अंगिकार त्याने करावा. यातच सर्व क्रांतीकारी शक्तींचे हित आहे. यातच बहुजनसमाजाचेही खऱ्या अर्थी हित आहे. हा खरा भारत-जोडो विचार आहे या पुस्तकातील सर्वच लेखांमधून हे सूत्र डाहाट यांनी अत्यंत प्रभावीपणे क्रमाने अधिकाधिक ताकदीने फुलवीत नेले आहे.

धनराज डाहाट हे नव्या दमदार पिढीचे वैचारिक लेखन करणारे लेखक आहेत. या लेखकाजवळ आंबेडकरी विचाराची अत्यंत अचूक दिशा आहे. त्याची बेरीज त्याला आंबेडकरांपासून दूर नेत नाही तर ती त्याला अधिकच खोल आंबेडकरात घेऊन जाते. या लेखकाजवळ जशी ही उजेडाची आदरणीय दिशा आहे तशी त्याच्याजवळ बौद्धीक कुवत आहे, व्यासंग आहे आणि डोक्यात जमा झालेले सर्व विचार अत्यंत विश्लेषणात्मक पद्धतीने मांडण्याची क्षमता आहे. हे लेखन वाचताना या सर्वच प्रकारच्या क्षमता या पुस्तकात दिसामासी वाढत गेलेल्या दिसतात. फुले–आंबेडकरांच्या, बुद्धाच्या आणि गाडगेबाबांच्या समाजाला आनंद आणि गौरव वाटावा असेच या लेखसंग्रहातील डाहाट यांच्या विचारप्रतिपादनाचे स्वरूप आहे. मी तर निश्चयाने असे म्हणेन की आंबेडकरी विचारांचे लावण्य धनराज डाहाट यांच्या लेखनातून प्रत्यही झळाळत आहे. डाहाट यांना या वैचारिक लेखनाच्या पुस्तकाच्या निमित्ताने मनापासून सदिच्छा !

**फुले–आंबेडकरी चळवळ : धनराज डाहाट**

# आंबेडकरी कवितेतील गाणारे वादळ. . .

कविवर्य भाऊ पंचभाई यांच्या कवितेतील चांदण्यांची आग पिऊन जाणिवेच्या कळा तीव्र आणि सुंदर करून जगण्याची संधी प्राप्त करून दिल्याबद्दल या प्रस्तावनेचे मी मनापासून आभार मानतो. हे ' हुंकार वादळाचे' भाऊ पंचभाई या कवीला आंबेडकरवादी कवींच्या थेट पहिल्या रांगेत आणून सन्मानित करीत आहेत. त्यामुळे या पराक्रमी हुंकारांचे मराठी कवितेच्या चाहत्यांनी कृतज्ञ असले पाहिजे. या काव्यसंग्रहाच्या प्रकाशनानंतर मराठी कविता आणखी एका कवीचे नाव आपल्या मुकुटावर खोदून घेणार आहे. ते नाव कवी भाऊ पंचभाई यांचे असेल. आंबेडकरवादी कवितेच्या पहिल्या पिढीचा कवी या नात्याने उरातील गौरवभाव उंचावून या वादळांच्या हुंकाराचे मी अभिनंदन करतो.

आंबेडकरवादी साहित्य ही दुनियेच्या साहित्यव्यवहारातील आज सर्वात अन्वर्थक घटना मानली जाते. या साहित्याने दुनियेतल्या सर्वात घृणास्पद शोषणाचे अत्यंत प्रभावी चित्रण केले आहे. मानवी जीवनाच्या अपूर्व आशयाची अनंत दारे या साहित्याने उघडून दिली. परंपरावाद्यांची जुनी सौंदर्यशास्त्रीय मापकोष्टके धुडकावून या साहित्याने आंबेडकरवादी सौंदर्यशास्त्राचे नवे भव्य बांधकाम उभारले. नवे जीवन घडविण्याच्या प्रक्रियेतून जन्माला आलेले हे 'नवे साहित्य' होते. माणुसकीची प्रतिष्ठा निर्विघ्न करू पाहणाऱ्या आंबेडकरी आंदोलनातून उफाळून आलेला हा ज्वालामुखी होता. त्याच्या एका हातात दुःखांचा वणवा होता आणि दुसऱ्या हातात नव्या मनुष्यतेचे बी–बियाणे होते.

अवघ्या दुनियेला अज्ञात अशा क्रॉनिक शोषणव्यवस्थेचे शवविच्छेदन डॉ. आंबेडकरांनी केले आणि या भीषण समाजव्यवस्थेचे क्रौर्य आंबेडकरी प्रेरणेने पेटलेल्या दलित प्रतिभांनी आपल्या ललित साहित्यातून मांडले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे या साहित्याचे आदिपुरुष आहेत आणि जडवादनिष्ठ समता हे या साहित्याचे नीतिशास्त्र आहे. गतिमानता ही जीवनाची प्रकृती आहे. थांबणे ही विकृती आहे.

सौंदर्याकडे व सामर्थ्याकडे धावत राहणे ही जीवनाची प्रकृती आहे. या प्रकृतीला विरोध करणे ही विकृती आहे. समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय आणि विज्ञान या मंगलाकडे झेपावणे ही जीवनाची प्रकृती आहे. या प्रकृतीकडे पाठ फिरविणे, तिला अडवण्याचा प्रयत्न करणे हा द्रोह तर या द्रोही प्रकृतीविरुद्ध संघर्ष करणे म्हणजे विद्रोह. धम्म ही प्रकृती आहे. धम्मविरोध ही विकृती आहे. धम्मविरोधी असणे हा द्रोहतर या द्रोहाचा बिमोड करण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करणे म्हणजे विद्रोह. आंबेडकरवादी साहित्य प्रकृतीत:च विद्रोही आहे. नास्तिक्य + मैत्री व करुणा=धम्म. धम्म हेच आंबेडकरवादी साहित्याचे महावाक्य आहे.

द्वितीय महायुद्धोत्तर काळात मराठी साहित्यिकांपुढे मनू, मार्क्स, गांधी, सार्त्र आणि आंबेडकर या प्रेरणांचे पंचक होते. आंबेडकरवादी साहित्याने आधुनिक मराठी साहित्यातले दुसरे मूलभूत प्रबोधन साकार केले.(अंधाराच्या उरावर थयथया नाचत या साहित्याने मराठी साहित्यात प्रकाशाचे सुंदर पिसारे फुलवले.)

आंबेडकरवादी साहित्यात पहिले तुफान उसळले, ते कविता म्हणून जगभर सुविख्यात झाले. आंबेडकरवादी कविता नव्या सांस्कृतिक तहानभूकेच्या आक्रंदनापोटी जन्माला आली. दुनियेतल्या क्रूरतम दु:खांचे आभाळाएवढे गाठोडे या कवितेने मराठी कवितेत मोकळे केले. ही कविता स्वप्नांचे जगणे मागत नव्हती तर नव्या जगण्यांचे स्वप्न उरात वागवत होती. वर्तमानाच्या नकारपहाडात या कवितेने आंबेडकर नावाच्या छिन्नीहातोड्याने विद्रोही संस्कृतीच्या लावण्यलेण्या खोदल्या. ही कविता युद्धार्थ बुद्धाची कविता आहे.

या कवितेने वास्तवाचे काळीजच शब्दात भरले. वास्तवाचा प्रस्थापित आशय आणि दिशा बदलून त्याला शोषणमुक्त माणसाच्या निर्मितीशी जोडले. रंजनाला वा रचनेच्या खुळ्या विरंगुळ्याला ही कविता भरल्या पोटी संभवणारे सुखवस्तूंचे चोचलेच मानते. भारत देशाची जमीन एका पातळीत अंथरणे आणि समताध्येयी परिवर्तनाला वैरी मानणारे संस्कारविष नष्ट करणे ही या कवितेची जन्मप्रतिज्ञा आहे. कला-सौंदर्याचे अवघड गड या कवितेतील ऊर्जा लीलया चढून

जाते. आशयाच्या सामर्थ्याने ही कविता पृथ्वीच्या पोटातून ज्वालामुखी बाहेर यावा तशी बाहेर येते. पण हे उत्कट आणि अटळ येणेच तिला घाटाचे सौंदर्यही बहाल करते.

आंबेडकरवादी कविता दुःखाच्या कोषातून दुःखाबाहेर येणारी व मानवी सुखाच्या विश्वघटनेला कवटाळणारी कविता आहे. या कवितेला जन्म देणाऱ्या प्रतिभेचे दिशाकोणच निराळे आहेत जे मन या कवितेतून बोलते आहे ते मन आंबेडकर–मन आहे. या प्रत्येकच कवीच्या मुखातून जळता–उजळता आंबेडकरच बोलतो आहे.

अशा या आंबेडकरवादी कवितेत प्रारंभापासूनच काही अपप्रवृत्ती शिरलेल्या आहेत त्यामुळे प्रदूषणाची टांगती तलवार या कवितेच्या माथ्यावर नेहमीच होती. आंबेडकरवादी कवितेत एक पाट अनियत-कालिकांच्या चळवळीतून ढसाळांच्या कवितेच्यारूपाने आला.

१ ' माणसाने प्लेटो आइन्स्टाईन आर्किमिडीज सॉक्रेटीस
मार्क्स अशोक हिटलर बिटलर कामू सार्त्र कामूका
बोदलेअर रेम्बो इझरा पाउंड हापकिन्स वगैरे
दोस्तोव्हस्की मायकोव्हस्की मॅक्झीम गॉर्की
एडिसन मेडिसन कालिदास तुकाराम व्यास शेक्सपीअर
ज्ञानेश्वर वगैरे वगैरेंना त्यांच्या शब्दांसकट गटाराचे
मेनहोल उघडून त्यात सलग सडत ठेवावे. '

२ अ : ' किती विलक्षण तुझ्या सृष्टीची अद्‌भुतता
भ्रांत होतो-लुब्ध होतो-अर्थाअनर्थापलीकडे
कलाकुसर दुस्तर माझ्या मायेची घागर. (गोलपिठा)
तुझ्या मूळ रूपाला कस्सं विसरता येईल ?'

आ : ' ईश्वर माझा मेंढपाळ आहे ' (गांडू बगीचा)

३ अ : ' तुझी सैल मोकळी स्तनाग्रं '

आ : ' पोरी देहावरली चंद्रवेल बाजूला सार
...सत्य आहे तुझ्या देहाचा अंधार '

इ : ' आमच्यासारखाच तूही झोपलास बायकोबरोबर
पोरं काढलीस... ' (तुझी इयत्ता कंची)

आंबेडकरी कविते पुढील धोके



क्रमाने पहिल्या अवतरणातील आंधळा सर्वनकार आंबेडकरी जीवनदर्शनात बसत नाही. दुसऱ्या अवतरणातील अध्यात्मही बसत नाही आणि तिसऱ्या अवतरणातील भूमिकाही आंबेडकरवादात बसत नाही. हे परत सर्वच सार्त्र–कामूच्या अस्तित्ववादाच्या विरोधातही आहे. पुन्हा हे सर्व मार्क्सवादातही बसू शकत नाही. ढसाळ हे अनियतकालिकांच्या चळवळीतले कवी आहेत. वरील सर्वच गोष्टी त्या प्रवाहात बसतात. ढसाळांची कविता आंबेडकरवादात न बसणारी आहे. ही प्रवृत्ती आंबेडकरवादी कवितेत शिरून प्रदूषण माजवणारी, आंबेडकरवादी कवितेचा चेहरा विद्रूप करणारी प्रवृत्ती आहे.

आंबेडकरी कवितेत या नावाजलेल्या प्रवृत्तीने जसे प्रदूषण निर्माण केले व आंबेडकरी कवितेतील विद्रोहाचा चेहरा विद्रूप केला त्याप्रमाणे आंबेडकरवादी कवितेला आणखी एका प्रवृत्तीने कुरूप करण्याचे कार्य मागील वीसेक वर्षांपासून धूर्तपणे चालविलेले आहे. ती प्रवृत्ती म्हणजे 'समरसता प्रवृत्ती' होय. ही प्रवृत्ती आंबेडकरी विद्रोहावर चिखलफेक करते. या प्रवृत्तीने आंबेडकरी कवितेला विद्रोहशून्य करण्याचा प्रयत्न केला. आस्थेकदम तिचे पौरुष ठेचून तिला निर्बिज करण्याचा प्रयत्न केला. आवर्ताचा उगम इथे होता. पण या कुटील प्रयत्नाला आंबेडकरवादी कविता बळी पडली नाही. ती वेळीच सावध झाली आणि तिने आंबेडकरांच्या धम्मक्रांतीशी स्वतःला जोडून घेतले. एका महाअरिष्टापासून आंबेडकरवादी कविता वाचली. आंबेडकरवादी म्हणून मिरवणाऱ्या शास्त्र्यांच्या कारस्थानापासून ही कविता सुटली. या संदर्भात कविवर्य सुरेश भट यांच्यासारख्या मित्रांचे आभार मानायला हवेत.

खरी आंबेडकरवादी कविता वरील प्रदूषणापासून कटाक्षाने दूर राहिली. प्रस्थापितांच्या प्रशंसेला त्यामुळे ती पारखी झाली पण तिने आंबेडकरी विद्रोहाचा वसा सोडला नाही. उपेक्षेच्या वादळवाऱ्यातही आपला अग्निपिसारा ती जिद्दीने फुलवीत राहिली. यशवंत मनोहर, वामन निंबाळकर, दया पवार, केशव मेश्राम, त्र्यंबक सपकाळे, ज. वि. पवार, प्रल्हाद चेंदवणकर, अर्जुन डांगळे, शरणकुमार लिंबाळे, प्रकाश जाधव या कवींनी अत्यंत नेकीने आंबेडकरवादाचा गड लढवला आणि

राखला. आता या कवींच्या छावणीत भाऊ पंचभाई हे आपले 'हुंकार वादळाचे' घेऊन सहभागी होत आहेत. त्यांच्यानंतरच्या पिढीतील प्रसेनजित ताकसांडे, विलास भवरे, अशोक कांबळे, उषाकिरण आत्राम, भुजंग मेश्राम, सतेश्वर मोरे अशा अनेक नावांनी आंबेडकरवादी कवितेचा आविष्कार होतो आहे. या कवींची आंबेडकरवादी कविता अध्यात्माच्या सापळ्यात अडकत नाही. समरसता प्रवृत्तीच्या चक्व्यात बहकत नाही, आणि मनूचे समर्थन करीत नाही. सर्व नकाराच्या खुळेपणात खेळत नाही आणि लैंगिकतेच्या पिसाटपसाऱ्यात फसत नाही. भाऊ पंचभाई यांची कविता वादळांचे हुंकार गळ्यातून फुलवीत मराठी आंबेडकरवादी कवितेच्या रंगमंचावर सन्मानाने प्रवेशत आहे. आजवरच्या आंबेडकरी कवितेत साकार झाली आहेत त्याहूनही अनेक नव्या वैशिष्ट्यांचा मुकूट घालून ही कविता एखाद्या सम्राज्ञीच्या पावलांनी आंबेडकरी कवितेच्या मैफलीत येत आहे. आपला वेगळा बाज, आपला मोहक ढंग आणि आपले दाहक रंग घेऊन ही कविता येत आहे.

मागील एका तपात भाऊ पंचभाई यांची कविता आपले आगळे-वेगळे व्यक्तिमत्व शिल्पित करण्याचा प्रयत्न करीत आहे. दहाएक वर्षांपूर्वी महाराष्ट्रातील विद्रोही कवितेची प्रमुख छावणी मेडिकल चौक ही होती. हा चौक तेव्हा कवितेचा गुलमोहर झाला होता. मी होतो. वामन निंबाळकर होते. प्रकाश ओंकार, खरात, नीलकांत कुलसंगे, रमेश जनबंधू, प्रसेनजित ताकसांडे, चंद्रकांत वानखडे, युवराज सोनटक्के ही तरुण कवी मंडळी होती. ही वादळे एकत्र येत आणि निखाऱ्यांच्या रांगोळ्या तयार होत. चौकाचे तापमान वाढे, रस्ते गरम होत आणि आसवांनी ओल्या झालेल्या बैठकी विद्रोहाने अंगारू लागत इथे काव्यवाचन होई. त्यावर चर्चांच्या तलवारी फिरत. हिंसा वा अहिंसा यांची तमा कोणीच बाळगीत नसत. शिवाय वाङ्मयीन चर्चा होत आणि समाजपरिवर्तनाचेही वादविवाद झडत. कधी पाहुण्यांसोबतही या चर्चांचे युद्ध होई. त्यात कधी बाबुराव बागूल असत, कधी रावसाहेब कसबे असत, कधी डॉ. म. ना. वानखडे, तर कधी श्य. वि. सरदेशमुख असत. महाराष्ट्रातील असे मान्यवर असत आणि मग

आंबेडकर–मार्क्स, साहित्यातील आशयाचे साहित्यसौंदर्यातील स्थान, साहित्य आणि प्रचार अशा नाना प्रश्नांचे अंत पाहिले जात. गावोगावी कविसंमेलने रंगत. आंबेडकर जयंतीच्या भाषणांनी हजारोंच्या सभा उत्कटवल्या जात. ठिकठिकाणच्या संमेलनांमधून ही मंडळी विजांसारखी तळपत. प्रवास कोटघांनी, काव्यमय वाणीने प्राजक्तासारखी फुले. आम्ही सर्व तेव्हा एकाच झाडाच्या फांद्या झालो होतो. ज्याची त्याची सुखे ज्याच्या त्याच्या खाजगी खात्यावर जमा करून परस्परांची दुःखे एखादीच भाकर चार जणांनी खावी तशी वाटून खात होतो. डोळे भिजलेले असायचे, या काळातले सर्व सूर्य या भिजलेल्या डोळयातूनच उगवलेले आहेत. यावेळी काळ अडचणींना हसत धावत होता. मेडिकल चौकात उतरणारी ही सर्व मने यावेळी निखाऱ्यांनी फुलत होती. सर्व मनांतून आंबेडकरविद्युत धावत होती. प्रत्येक गळयात यावेळी कवितेचे ढग दाटून आलेले असायचे आणि ओठावर आलेल्या प्रत्येक वाक्यात झपाटलेली कविता असायची. तो काळ गुलमोहर होता. तो काळ निखाऱ्यांचा प्राजक्त होता. तो काळ विजांच्या पैजणांनी नाचायचा. या काळाच्या सर्वच फांद्या गात होत्या कवितांनी फुलत होत्या. (भाऊ पंचभाई ही त्या सौंदर्यवृक्षाची एक फांदी! तिथून ती वादळ झाली आणि आज ती वादळाचे हुंकार झाली.)

भाऊ पंचभाई यांची कविता वाचताना मी प्रकर्षाने अनुभवात भिजलो तो लावण्याच्या ! पंचभाईंच्या गळयात स्वरांची फुगडी सुरू असते. या कवीचा गळा मोठा नटरंगी आहे. वडावर पाखरांनी खेळ मांडावा त्याप्रमाणे या कवीच्या गळयात स्वरांचे अनंत स्वभाव तल्लख खेळ मांडतात. शहरात असो, खेडयात असो, पंचभाई कविता गायला उठले की हजारो श्रोत्यांचे जीव एकाच वेळी त्यांच्या गायनाच्या लाटालहरींवर नावा डोलाव्यात तसे डोलत राहतात. भाऊ पंचभाईंची कविता एका श्रेष्ठ लोककवीची कविता आहे. 'तुझ्या तेजानं झाकजो', 'भीम कुठं पाहू', 'मरणाच्या आधी', 'संपन' 'संग संग राहू', 'जगताना', 'नोको पुसू बापा', 'काही खरं नाय. . .', 'वाळलेली काडी', 'फुले. भीमाईची . . .' या लोकलयींनी नाचणाऱ्या कविता आणि 'पोवाडा

भीमाचा ' हे प्रशस्ती काव्य या सर्वांचा विचार मराठी लोककवितेच्या संदर्भात करायला हवा. यातील भाषा काटोल तालुक्यातील बोलीतील लावण्याचा गजरा माळते. येजो, तुह्या, माही, तुव्हा, पिरमानं, लेकरू, गावामंदी, बापाईच्या, लई, दानवड, मले, सपन, कोनी, थ्या, ह्या, व्वं, सपनबी, भेवाले, ईज, नोको, मंग, गावगोहन, भारा, दानापानी इत्यादी शब्दांनी मला माझ्या बालपणातून फिरवले. नागपूर जिल्ह्याच्या काटोल तालुक्यातली दलित बोली मराठी कवितेत पंचभाईंनी प्रथम आणली त्यामुळे खूप बरे वाटले. लोकांच्या भावनांना अनेक कवितांमधून हा कवी लोकांच्या बोलीतून जागवतो. त्यांना बावीस कलमी भीमायन शिकवतो, पंचभाईंची ही कविता वामनदादानंतरचे श्रेष्ठ लोककवितेचे धनीपण साकार करते.

पंचभाईंची कविता बांधिलकी हा आपला सत्कार मानणारी कविता आहे. बाबासाहेब आंबेडकर हा या कवितेचा प्राण आहे. म्हणूनच ही कविता ' भुकेकंगालांच्या वस्तीत भूक बनून गात असते. ' आणि–

इथल्या देवालयातील दगडांना
छिन्नविछिन्न करीत
ती गात असते
ती गात असते घणांच्या तालावर,
ती गात असते पुरोहितांच्या छाताडावर

' बावीस कलमी भीमायन ' यावेळी तिच्या गळयात असते. आणि अशी विद्रोहाची मैफिल सजत असते. पण हे गायन संटच्या स्वरांचे नसते. या स्वरांचे लावण्य पंचभाईंनी आपल्या काव्याने शतगुणित केलेले असते. स्वरसौंदर्य आणि काव्यसौंदर्य याचा हा प्रेमविवाह असतो.पंचभाई यांच्या कवितेतील हे सौंदर्यमीलन आंबेडकरी कवितेत नवे खानदान जन्माला घालते.

' गाणे उपेक्षितांचे
त्यांनीच कैद केले . . .'

पंचभाई हा कवी कालवर कैद असलेले उपेक्षितांचे गाणे गातो आहे. पण भाऊ पंचभाईंचे गायन गायनास नाही,ते आहे मेलेले रान जागवण्यासाठी!

'एक निष्पर्ण शुष्क वृक्ष
आता भडकणार आहे'

आणि तो तातडीने व वेगाने भडकावा यासाठी हे गायन आहे. हे गाणे नपुंसक नाही.आंबेडकरी क्रांतीचे मोठे जहाल बीज या गाण्यांमधून प्रखरून धावत आहे आणि–

' मी करू हे सूर कोणाच्या हवाली ?
ऐकणाऱ्यांच्या घरांची राख झाली. . .'

असे पंचभाई म्हणत असले तरी घरांची राख होऊनही मनांची राख ज्यांनी होऊ दिली नाही त्यांनीच भाऊंचे हे ' शूर सूर ' जिवाचा पदर करून झेलले आहेत. या आनंदाने नाचता नाचताही त्यांच्या गळ्यातील सूर आसवांनी गदगदून गेले असतील. 'वाळलेली काडी ..', ' पत्र भीमाचे. . .', ' तुझ्या तेजानं झाकजो. . .', ' हे गाव कुणाचे आहे. . . ? ' या त्यांच्या कवितांचे गायनरूप मोठे लोभस असते. या कवितांमधील शब्दात तर गाणे आहेच पण अर्थातही गाणेच आहे. या गाण्यात कविता आहे आणि या कवितेत गाणे आहे. हाच अनुभव त्यांच्या गझलांच्या चांदण्याची आग पितानाही येतो. कविवर्य सुरेश भटांच्या नंतर स्वरसौंदर्याच्या देखण्या पालख्यांमधून आस्वादकांच्या मनात गझल घेऊन जाणारा हा एक समर्थ कवी आहे. भटांची गझल आस्वादकाला जाणिवांच्या अनेक वस्त्यांमधून फिरविते. सामाजिक वास्तवाचा जळता स्तर हा त्यातील पुढारी स्तर असतो. भाऊ पंचभाईंनी आपल्या गझलेतील सामाजिक वास्तवाचा जळता स्तर आंबेडकरी आशयाने गजबजून टाकला. कवी सुरेश भटांच्या नंतर मराठी गझल आणखी एका नव्या क्षितिजातून ताकदीने उगवली. एका वेगळ्या दु:खांचे ओझे या गझलेतून मराठी कवितेत उतरले. जिंदगीला पुन्हा हाक मारू, कसे, डोळे, निखारा कधीचा, भुवयांच्या अंबरी, कोणीच यार नाही, मद्यक्रांती, जुने लोक, कौल्य, गाऱ्हाणे, कुणी नाही, आयुष्य मागले नाही, स्वप्न ताजे, आम्ही लढू नव्याने इत्यादी गझलांनी पंचभाईंच्या सामाजिक मनाचे दु:ख साकार केले आहे.

या कवीच्या कवितेत दुःखाचे दुहेरी आक्रंदन साकार झाले आहे.

‘ चल दूर कुठेही जाऊ घरकूल उभारुन घेऊ
जे काही आपण चुकलो ती चूक सुधारुन घेऊ. . .
. . .थोडेसे म्हणणे माझे तू मांड तुझेही थोडे
सुखदुःख झाकण्यासाठी आभाळ पांघरुन घेऊ . . . ’

इथे कवीची व्यक्तिगत यातना मुखरीत होते. असेच दुःख–

‘ ही संपली कधीची माझी तुझी कहाणी
धावू नकोस आता कलती उन्हे धराया ’

अशा काही ठिकाणी आपणास भेटते. हे दुःख गडद आहे. गुंतागुंतीचे आहे. मोठं कडवटही आहे तरी या दुःखाला कवी एका मर्यादेपलीकडे गोंजारीत नाही हेही खरे आहे. पण या कवितेत दुःखाचे दुसरे आक्रंदन साकार होते ते मात्र कवीच्या सामाजिक मनाचे आहे. इथे कवी एका बंधमुक्तीसाठी संगरात उतरलेल्या समूहाचा घटक आहे.

‘ घायाळ गावचे पक्षी आक्रोश कराया आले ’
‘ कां बरे अद्याप माझा गाव हा जख्माळला?’

हा कवी अशा घायाळ गावाचा किंवा जख्माळलेल्या गावाचा नागरिक आहे. त्याचे दुःख मात्र सर्व संस्कृतीभर पसरले आहे. ह्या दुःखाला अनेक काटेरी संदर्भ आहेत. एक संदर्भ विषाची रोपटी असलेल्या गावाचा आहे. तिथे घरांची राख आहे, मजुरांचा कटणारा गळा आहे, तोंडची भाकरी ओढणारे सभ्य आहेत.

किती युगे झाली तरी वनामंदी आहे
आदिवासी भाऊ माहा जंगलात राहे.

ही यातनाही आहे, भिकारी मुले आहेत, युगायुगांची लक्तरे, आहेत, गांजलेले मुके आहेत, चातुर्वर्ण्याचे वेदयालय आहे. शिवाय बावण्या, बारवया, कोसऱ्या, लाडवन हे पोटजातीचे आणि जातीसंस्थेचे नरक आहे. मदिरेत न्हालेल्या चळवळी आहेत. शिवाय

‘ स्वातंत्र्य भोगणारे आकाश हे न माझे ’

हे एलिनेशन आहे.

'कालही होता तसा अन् आजही आहे असा
मार्ग माझ्या झोपडपांचा आपदांनी ग्रासला...'

हा भूत–वर्तमानातील यातनांचा डोह आहे.

'कुठे जन्मभूमी ? कुठे देश माझा ?
कुठे राष्ट्रध्वज ? अन् कुणाचा दिलासा ?
इथे बेलछी पेटते हर घडीला
मला कोण आहे इथे आपलासा ?
कुणी मोडला हा कणा चळवळींचा ?
कसे रोज फुटते घरणच इथे . . .'

अशी दलितांना मिळणारी अमानुष वागणूक आहे. असे सर्व घरच मोडलेले असल्याची यातना आहे.

'आजकाल गावोगावी अकाल पडला
दीन दुःखितांचा वाली दारूत अडला
इनमिन तीन भाऊ तीन गावा गेले
सुखाचे सपन माहे वाऱ्यात विरले
भाऊ नाही बंधु नाही माय नाही बाप
जातीयतेचेच रोज चावतात साप'

असे पुढाऱ्यांचे अधःपतन आहे. जातीचे दंश करणारे सर्प आहेत.

'परत फिरवू आपल्या होडचा
किनारा चुकला हे जाहीर करू एकदा ...'

असे किनारा चुकल्याचेही दुःख आहे. माणसांच्या गावाची लाज उघडयावर पडली आहे. असे भूतकाळापासून वर्तमानापर्यंत पसरलेल्या संस्कृतीत कवीच्या दुःखाचे खोल संदर्भ आहेत. या कवीची भाषा अशी इतिहासाच्या यातना तनामनावर गोंदून वर्तमानातील यातनांच्या झडीतून भवितव्याकडे धावत आहे. त्याला खात्री आहे की :–

'सर्व शंबुकांना सोबत घेऊन
आंदोलन उभारणीचे दिवस आले आहेत...'

कारण लुळेपांगळेही लढू लागले आहेत असे ताजे स्वप्न त्याला पडू लागले आहे.

'इथे पोळलो मी कितिदा तरी
दिव्यांशीच नाते जडू लागले'

असेही घडू लागले आहे. आणि त्याला हेही दिसले आहे की :–

'फाटल्या झोळीच्या आवाजाने
आकाशाला भीती वाटली इथे'

या कवीला आंबेडकरी आंदोलनाने नवी नजर दिली आहे. नवी नाती दिली आहेत.

'वीज माझी आई आणि
सूर्य माझा पिता'

ही ती नवी नाती होत. हा कवीचा नवा विद्रोही जन्म होता. व्यक्ती भाऊ पंचभाईंचे आईवडील पूर्वास्पृश्य होते. पण कवी भाऊ पंचभाईंचे वीज आणि सूर्य हे मायबाप आहेत. या नव्या मायबापांचा मुलगा 'झुंजणारे निखारे स्वीकारतो' आहे.

'मी कशाला कोणताही रंग मागू ?
माझिया रक्तामध्ये माझीच लाली'

असे शक्तीसौष्ठव त्याला लाभले आहे. आपल्याच रक्ताच्या जाळ्यात तो अग्निवृक्ष होतो आहे.'बदनाम जिंदगीला पचवीत' तो वाटेत शवांच्या तिरडीस खांदा होतो. 'फाटक्यांचे आभाळ तो शिवत राहतो. सगळे मावळल्यासारखे वाटते आणि यातनांनी घेराव केला तरी तेही खरे नव्हते हेही तो जाणतो कारण:–

'कुणा वाटले लोपले दीप सारे
कुणा वाटले पाकळ्याही गळाल्या
त्यांना कुठे कल्पना या तरूंची
आता कुठे सर्व झुंडी मिळाल्या. . .'

हा भरतीचा अनुभवही त्याचे मन कवटाळून घेत आहे. तो शक्तीने उंच होतो आहे. तो माणसांचे अंकुर रोखीत जातो आहे. कारण त्याला हेही माहीत आहे की:–

'जन्मत:च नसते शक्ती
सर्व वादळांना तोंड देण्याची

महासागरी वादळात
झोकून द्यावे लागते स्वत:स
कोलंबस होण्यासाठी ...'

म्हणून तो 'शिल्पकार वाटसरू सारे माझे भाऊ, शब्द नवे, अर्थ नवे मुक्या प्राण्या देऊ' अशी प्रतिज्ञा करतो आणि आपल्या भावांना कळवळून सांगतो की –

'अता कधी विझू नका, मशाल व्हा क्षणोक्षणी
प्रकाश चोरला जिने, ती पेटवावी छावणी

त्याला मनोमन वाटते की ही समाजरचना बदलावी आणि अंधाराची कारकीर्द उलथून टाकावी त्यासाठी :-

'कोणी तरी उठा रे उचला पुन्हा कुऱ्हाडी
झपल्या नव्या विषाची छाटा तमाम राने
बेवारशी मुलांनो गोटे तरी उगारा
फोडा तमाम त्यांचे फसवे दिवाणखाने'

अशी संतापाच्या भाषेत तो क्रांतीची निवडही बोलून दाखवितो. तो या व्यवस्थेचे आव्हान स्वीकारतो.

'जुलुमांच्या वस्तीमध्ये मी कितीतरीदा हरलो
पण मागे वळण्यासाठी आयुष्य आणले नाही'

म्हणूनच हा कवी जिंदगीला हाक मारणे थांबवीत नाही. गावकुसाबाहेरच्या सर्व अपमानितांच्या यातनांना तो आपला शब्द देतो.

'येवू दिले न आम्हा गावामध्ये जयांनी
छातीवरी तयांच्या नाचून आज गावू
...आम्ही लढू नव्याने मरणास झुंज देऊ
झेलून वार सारे आम्ही जिवन्त राहू'

अंगणात आलेली एक वाळलेली आणि पुढे पेटलेली काडीही त्याला

'रान उठव मनाली
गाव पेटव मनाली'

भाऊ पंचभाईंची कविता दलितांसकट सर्व संस्कृतीची समीक्षा करते. उपरोधाचे पाते विरोधकांच्या गळ्यावरून सफाईने फिरविते. ही कविता

स्वरांच्या मांडवाखाली उभी असली तरी आपला प्रखरपणा ती कायम ठेवते. ती नाजूक पाकळ्यांची जिवबंधात्म गुंफण जशी करते तशी सदर विचारानुभवालाही नादाच्या मह्रिपींनी खुलवते. विद्रोहाचा रौद्रराग आळवीत असली तरी ही कविता आंबेडकरी सुसंस्कृतपणाशी फारकत घेऊन शिवराळ होत नाही. अश्लीलतेच्या माळा गळ्यात घालायचे ती कटाक्षाने टाळते. अंगभूत संयमाने ती शालीनता जपते. अध्यात्माच्या गुहेत ती शिरत नाही. अध्यात्माचे परिवर्तनविरोधी व जुलमी कॅरेक्टर तिला माहीत आहे. ही कविता दुःखाच्या डोहात उतरते पण डोहाचा पैलकिनारा गाठून ती युद्धभूमीवरही धावून जाते. दुःखांची दासी होत नाही तर ती दुःखांनाच दास बनवून भवितव्याची मालक बनू इच्छिते. ही आंबेडकरकुलाची श्रेष्ठ कविता आहे. आशयाचे गांभीर्य व रचनेचे लावण्य हे दोन्ही ध्रूव एकत्र बांधणारी ही सुंदर कविता आहे.

भाऊ पंचभाईंची कविता ही हुंकारांनी भडकलेल्या वादळाची कविता आहे. हा आहे आंबेडकरवादी कवितेतील विद्रोहाच्या गायनाचा अपूर्व अजिंठा ! या कवितेच्या पावलांनी आंबेडकरवादी कविता आणखी एक नवे शिखर चढून गेली आहे.

१९५६ च्या धम्मक्रांतीने अनंत मुक्या प्रतिभांना विद्रोहाचे पंख व क्रांतीची मूलगामी दिशा दिली आणि कालपर्यंतची गरीब राख निखारे होऊन उजेडामागे धावू लागली. तिने सूर्याची नवी व्याख्या केली. नवा उजेड जन्माला घातला.

भाऊंच्या कवितेने या आंबेडकरकुलाच्या कवितेचे आणखी एक अनोखे क्षितिज उघडून दिले आहे. तिने विद्रोही कवितेच्या छावणीत स्वरसौंदर्याची मैफील गाजवली आहे. भाऊंनी विद्रोहाला स्वरांच्या मोहक आणि दाहक पालख्यांमधून आणले आहे. आंबेडकरवादी कवितेत ही गायनगुंफा अपूर्व आहे.

गती आपल्याला नवी आकृती आणि प्रगती आपल्याला नवी प्रकृती देते. नवा आशय देते. थांबलेल्यापाशी कविता कधी थांबतच नाही. कविता गतीपुत्रांची सखी होते. हे ज्याला कळते तो आंबेडकरी कवितेच्या अग्निप्रवाहाचा नागरिक होण्यास पात्र ठरतो. समरसता

परिषदेचे संयोजक होणे, तिथे मनूचे समर्थन करणे हे ज्यांना निष्ठापूर्वक जमते त्यांनी अखिल भारतीय दलितसाहित्य संमेलनांच्या अध्यक्षांची भाषणे आपल्या नियतकालिकातून न छापणे हे साहजिकच आहे.

'आधी होती दासी पट्टराणी केले तिशी
तिचे हिंडणे राहिना मूळ स्वभाव जाईना'

तसे हे आहे. मूळस्वभाव काही जात नाही. आंबेडकरवादी कवींनी या मुळावर येणाऱ्या मूळस्वभावापासून जपून राहयला हवे. मनूशी व इतर प्रतिगामी शक्तींशी समरसता साधण्यापेक्षा आता आपण फुले व आंबेडकरांशी नाते जोडायला शिकले पाहिजे. ही वाटच आपणाला क्रांतीकडे घेऊन जाईल. आंबेडकरपुत्रांनी या मनूच्या वारसदारांपासून सांभाळून राहिले पाहिजे. गोड बोलण्याच्या व चळवळीला निर्जिव करण्याच्या त्याच्या धूर्त कारस्थानाचे आपण बळी ठरणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. भाऊ पंचभाईंची कविता या धूर्त कारस्थानाची बळी ठरली नाही. केवळ आंबेडकरांशी सर्वस्वी समरसता हेच या कवितेचे ब्रीद आहे. या कवितेच्या शब्दांमधून हुंकारत आहे. ते केवळ आंबेडकर नावाचे वादळ; म्हणूनच . . .

'विषाची जिथे रोवली रोपटी, त्या गावातले दूध प्यावे कसे ?'

असा या कवितेचा 'त्या' गावातले दूध पिणारांना व पाजणारांना सवाल आहे.

भाऊंची कविता आंबेडकरवादी कवितेच्या नव्या जिंदगीची कविता आहे. आंबेडकरवादी गझलेची समर्थ घटना ही कविता साकार करते. स्वत: वादळच या कवितेतून विद्रोहाचा राग आळवीत आहे. अनंत दु:खे, अनंत यातना, अनंत वैफल्ये यांनी पेटलेल्या उराची ही कविता आहे. ती हलाहल पचवीत चाललेल्या मनातून जन्म घेते. ":आम्ही लढू नव्याने... आम्ही जिवंत राहू... " ही क्रांतीची कार्यक्रम पत्रिकाही ती आपल्या हाती देते. आंबेडकरवादी कवितेच्या विजयाचे आणखी हे एक नवे निशाण...

**हुंकार वादळांचे : भाऊ पंचभाई**

# मुक्तियुद्धाचे पडघम वाजविणारी कविता

'मुक्तियुद्ध' हा कविमित्र श्री. दिवाकर बोबडे यांचा पहिलाच काव्यसंग्रह आहे. या काव्यसंग्रहाला प्रस्तावना लिहिताना दोन कारणांसाठी मला आनंद होत आहे. एक काहीसे गौण कारण असे की काटोल या माझ्या जन्मतालुक्यात या मुक्तियुद्धाला आशय आणि आकृती प्राप्त झाली आहे आणि दुसरे महत्त्वाचे कारण असे की मुक्तियुद्धातल्या शेकडो ठिकाणांनी मुक्तीच्या सौंदर्याचे काव्य माझ्या जाणिवेत फुलविले आहे.

वर काटोलचा निर्देश आला. मराठी कवितेला हे गाव चांगले माहीत आहे. कवितेवर मनापासून प्रेम करणाऱ्या काही प्रतिभा याही गावात नांदल्या. अविनाश बरोकर, वामन इंगळे आणि नीलकान्त ढोले या मोठ्या नावांबरोबर इतरही अनेक नावे काटोल आणि काटोलच्या परिसराचे मन मराठी कवितेत दाखल करीत होती आणि आहेत. कवी दिवाकर बोबडे यांची कविताही अत्यंत उज्ज्वल पद्धतीने या वारशाला अर्थपूर्णता बहाल करीत आहे.

मागील काही वर्षांमध्ये मराठी कविता शहराबाहेर पडली आणि खेड्यात गेली. अलीकडच्या काळात ग्रामीण जीवनात गेलेली कविता सोबत काही जीवनदृष्टी घेऊन गेलेली आहे. त्यामुळे हवेतून चालण्याऐवजी जमिनीवरून चालण्यात या कवितेला अधिक स्वारस्य वाटले. जी कविता केवळ काव्यपरंपरेत, काव्यकक्षेत उभे राहून लिहिली जाते ती कविता हवेतून चालण्याशिवाय दुसरे काहीही करू शकत नसते. हवेतून चालण्याशिवाय दुसरे काही करायच नसते अशा खुशालचेंडू मनांना ही कविता मोहिनी घालीत असते. अशा मनांना जमिनीत उगवणारी, जमिनीवरून चालणारी आणि जमीन जागविणारी कविता संकटासारखी वाटत असते. दिवाकर बोबडे यांची कविता काव्यातून जन्माला येत नाही तर ती जीवनातून जन्माला येते. काव्यातून जन्माला येण्याऐवजी जीवनातून जन्माला येणारी कविता अधिकच काव्यमय असते. कारण ती अधिकच जीवनमय असते. बोबडे यांच्या कवितेतील काव्यमयतेला या जीवन-

मयतेमुळेच अधिक सामर्थ्य प्राप्त होते. आनंद याचा वाटतो की काटोलसारख्या आडगावात हा कवी राहतो आणि तरीही आपल्या काव्यलेखनाला मराठी कवितेतील युगसंवेदनांची आग वाहून नेणाऱ्या मुख्य प्रवाहापासून वेगळे राहू देत नाही, ही गोष्ट सामान्य नव्हे. यामागे एक सजगता उभी असते. एक जिवंतता उभी असते आणि युगासोबत चालण्याचा निर्णय घेतलेला एक स्वभाव यामागे उभा असतो.

कवी दिवाकर बोबडे यांचा स्वभाव निर्णयपूर्वक युगासोबत चालणारा स्वभाव आहे. या स्वभावाच्या घटनेचे शिल्पकार आहेत जोतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले. ' मुक्तियुद्ध 'मधील जोतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्यावरील कविता यासाठी साक्ष म्हणून पुढे करता येतील.जोतिबा-सावित्री यांच्यामुळे बोबडे यांच्या कवीस्वभावाची दिशा स्पष्ट झाली आहे ' मुक्तियुद्ध ' मधील सर्वच कवितांमधून व्यक्त होत आहेत ते या स्वभावाचे पैलू, या स्वभावाचे काही कोपरे.

' माझी कविता ' या कवितेत कवीने आपल्या कवितेचे 'स्वभाव-चित्रण'केलेले आहे. कवी याच पद्धतीने आपल्या कवितेचे स्वभावचित्रण करतो याला कारणही त्याचा काव्यस्वभाव हेच आहे.

' सत्य–श्रद्धा ' याशिवाय
दुसरं काही मनात नाही '

या ओळींमधील ' सत्य 'कवीला जोतिबा फुल्यांनी दिले आहे. ही ' सत्यश्रद्धा ' सार्वजनिक सत्यधर्मातून आलेली आहे. त्यामुळेच

' काळया रात्रीच्या चांदण्याची
भूल तिला पडत नाही
नित प्रकाशपूजा केल्याशिवाय
माझी कविता राहत नाही '

हा प्रकाशपूजनाचा वसा या कवितेने असा पत्करलेला आहे. काळया रात्रीच्या चांदण्यातून प्रतिगामित्व, भोगवाद, पुनरुज्जीवनवाद अशा सर्व विघातक गोष्टींचा निर्देश कवीने केलेला आहे. ही कविता दु:खितांना दिलासा देणारी, दिशाहिनांना दिशा दाखविणारी आणि अंधारात खितपत पडलेल्यांना प्रकाश वाटणारी कविता आहे. अन्याय

अत्याचारावर चिडून उठणारी आणि दीन-दुःखितांचे अश्रू पुसणारी ही कविता आहे. सूर्यकुलाच्या कवितेचे कुलशील सांभाळणारी ही कविता आहे. आपल्या सूर्यकुलाच्या घराण्याला कुठेही कमीपणा येणार नाही अशीच या कवितेची चालचलन आहे. समाजनिरपेक्ष अनैतिक वृत्तीने वागणारी केवळ सौंदर्यमनस्क असलेली कविता नटरंगी नारीसारखी असते. तिचे चालणे नकली असते. ती सारखी पेहराव बदलते. रंगढंग करते. कवी बोबडे यांची कविता मात्र ' कपाळीचे कुंकू अन् गळ्यातील मणी. . .' हाच दागिना मानते. केशवसुती सूर्यकुलाची ही रीती आहे. जोतिबा फुलांच्या ' सत्य ' कुलाची ही नीती आहे. हा दुहेरी बारसा जपणारी ही कविता आहे. ' पावलापावलावर चांदणे शिंपीत,बोलते ती फुले उधळीत 'या स्वभावाचे ' मज्जेची निज जो फुले पसरितो आयुष्य-मार्गावरी ' शी कौटुंबिक नाते आहे. पण ही कविता,

' आपल्याला आता हे बन जाळून
या मातीला सूर्यदर्शन घडवायचे आहे
अन्
निर्जन बेटातल्या या मोकळ्या जागी आपल्याला
माणसांची वस्ती वसवायची आहे. . .! '

हा फुले – आंबेडकरी ध्येयवाद उरात बाळगणारी असली तरी ' आपण कविता आहोत 'आणि आपल्याला आपले असणे कायम ठेवूनच एवढंच नव्हे तर ते अधिक अन्वर्थक करून वरील ध्येयवादाचे अग्निध्वज समाजाच्या जिंदगीतून फिरवायचे आहेत. हे भान या कवितेला आहे, म्हणूनच

' चालते ती ताल घेऊन
बोलणं तिचं गाणं आहे '

असे चालणे – बोलणे तिला सहज जमते. आजच्या युगसंवेदना व्यक्त करणाऱ्या कवितेचे हेच मर्म आहे व बोबडे यांच्या काव्यदृष्टीला ते स्वच्छपणे उमगले आहे ही माझ्यासाठी अत्यंत आनंदाची बाब आहे.

'मुक्तियुद्ध' मधील कविता एक जबाबदार समाजभान असलेल्या कविमनाची कविता आहे. बहुतेक सर्वच कवितांमधून कवी मनाची ही सामाजिक स्पंदने साकार झाली आहेत. ' एवढे मात्र खरे ', ' कथा

एका नगराची ', ' माणूस', ' नवे वर्ष ', ' ती ', ' चारच दिवसात ' आणि 'असे भोवती जीवन' अशा अनेक कवितांमधून कवीने विषमतेने, दैन्याने, अन्यायाने, शोषणाने ग्रासलेले आपले वर्तमान समाजवास्तव स्पष्ट शब्दांमध्ये मांडलेले आहे.

' असे भोवती जीवन
दुःखे भरला सागर ।
. . . असे भोवती जीवन
माझे दुःख त्यांच्यासाठी ।'

या भोवतीच्या जीवनाची कथा म्हणजे नगराचीच कथा होते–

' या शहरामधले कोणी
हर्षाची गाती गाणी
कंगाल आयुष्याची
कुणी सांगे कर्मकहाणी '

असे या नगराचे वर्गीय वास्तव आहे. ती दोन जगेच आहेत. एकाचा दुसऱ्याशी संबंध आहेच पण एकाने दुसऱ्याला वापरून घ्यावे आणि दुसऱ्याने विनातक्रार स्वतःला वापरू द्यावे असा तो संबंध आहे. धर्माच्या नशेने या गुलामांना एकाच वेळी आंधळेही केले आहे आणि मुकेही केले आहे. त्यामुळे एकतर त्यांना त्यांचे शोषण दिसत नाही. ' आंधळे दळते आणि कुत्रे पीठ खाते ' तसे हे आहे. पीठ खाणारे कुत्रेच दिसत नाही त्यामुळे तक्रारही नाही. त्यामुळेच

' बैलाची वेसन बदलली नाही त्याच्या की
गाठीचं धोतर बदललं नाही
चिमटीत धरल्यास चामडी येईल सोबत
सारं रक्त याचं वावरात आटलं ! '

तरी ' भाऊ ' 'स्थितप्रज्ञासारखा वागतो आहे.' आपले पीठ खाण्यासाठी कुत्र्यांची योजना कोणी केली हे त्याला कळत नाही म्हणूनच

' ज्ञानोबा–विनोबांच्या विचाराचा तो
त्याला मी काय म्हणू ?
भोळा की खुळा ? '

असा प्रश्न कविला पडतो. चारच दिवसात चितेला बांधल्या गेलेल्या विवाहितेचे चित्रण हृदयद्रावक आहे. 'उपेक्षित' मधील जातीयतेच्या आगीत जळणारा आणि गौतमासारखा नव्या उजेडाच्या शोधासाठी गेलेला उपेक्षित चटका लावतो. असंख्य नजरांचे बलात्कार टाळणारी 'ती' अस्वस्थ करते. अन्यायाची अशी अनेक चित्रे कवी काढतो. पण तो तिथेच थांबत नाही. हे बदलेल, बदलले पाहिजे असे त्याला मनापासून वाटते. 'आमच्या घराघरात सूर्य उगवणार आहेत,' नांगरांनी धुरे उठवायचे आहेत,' 'काढू प्रकाशाचे पीक,' 'ते हिमखंड आता वितळू लागले आहेत,' 'कोटी कोटी दुर्बलांच्या मनामनांतील कोटी कोटी सूर्य आपल्या दाहक तेजाने या साऱ्या अत्याचारी अमानवांना भस्म करणार आहे,' 'काळागोरा उंचनीच भेदाभेद पळून जाईल, समता स्वातंत्र्याचे सारेजण गाणी गाईल'

'या मातीला सूर्यदर्शन घडवायचे आहे . . .
अन् निर्जन बेटातल्या या मोकळ्या जागी आपल्याला,
माणसांची वस्ती वसवायची आहे ...!'

समाजाचे जुने वास्तव अमानुष आहे आणि ते बदलणार आहे. या प्रकारच्या विश्वासाने मुक्तियुद्ध या कवितासंग्रहातून कवीचे मन धावत आहे. क्रांती होणारच त्या दिशेनेच हा प्रवास सुरू आहे हा कवीचा विश्वास आहे. कवीस्वभावाचा हाही एक पैलू मुक्तियुद्धामधून साकारतो. त्याने म्हटले आहे–

'कधी कधी इतिहास घडतो म्हणे भूकेमुळे
मात्र भूक लागायला पाहिजे. . . .'

हे कवीचे म्हणणे अगदी खरे आहे. हा समाज भूक न लागणारा समाज आहे. आणि भूक न लागण्याचा इतिहास हाच त्याचा इतिहास आहे. त्याला कडकडून समतेची भूक लागत नाही. क्रांतीची भूक लागत नाही. त्याला उजेडाचा इतिहास घडविण्याची भूक लागत नाही. तरीही 'युद्ध होईल अज्ञानाशी, युद्ध होईल दास्यत्वाशी, लाचारीशी, दारिद्र्याशी, बेकारीशी, महागाईशी, वैफल्याशी, नैराश्याशी, असत्याशी, वैरत्वाशी, अनीतीशी, सर्व प्रकारच्या प्रश्नांशी,

'अंधाराशी झुंज होणार आहे
महायुद्ध सुरू होणार आहे.'

ही खात्री कवीला आहे. अर्थात तोवर यातनांचे-विषाचे घोट पिणे त्याला भागच आहे. इमानाचे नाव बेईमान ठेवले जाणार नाही याची काळजी कवी घेणार आहे. तोवरच्या विपरीत परिस्थितीत 'माझ्या हाताने बांधीन माझ्या आयुष्याचा गाव' ही धमक तो ठेवणार आहे.

'मुक्तियुद्धा'तील प्रेमकवितासुद्धा मुक्तियुद्धातल्या सैनिकासारखी बोलते. ती प्रचलित अर्थाची प्रेमकविता नसून फुले-आंबेडकरी युद्ध-छावणीतील कवीची प्रेमकविता आहे. 'प्रियेच्या निमित्ताने' ही कविता क्रांतिप्रेम व्यक्त करणारी कविता आहे. 'निर्जन बेट', 'काळा सूर्य', 'जखमा' या कवितांमधून याचा प्रयत्न येतो.

सावित्रीबाई फुल्यांवरील आणि जोतिबा फुल्यांवरील कविता लक्षणीय आहेत.

'शब्दात तुझ्या जादू होती
अनेक मुके बोलत होते
नजरेत असा स्नेह तुझ्या
अनेक आंधळे पाहत होते'

ही सावित्रीबाईची थोरवी कवीने स्पष्टपणे व्यक्त केली आहे आणि फुल्यांवरील कवितेला तर भेदक असे उपरोधककाव्याचे रूप प्राप्त झाले आहे. आपल्या समाजातील फुलेप्रेमाची अमानुषता ही कविता प्रभावी-पणे मांडते. 'आई' आणि 'माय' या दोन्ही कविता चांगल्या आहेत.

('ऊठ शंकरा', 'दान' आणि 'कुणासाठी' या कविता मात्र या संग्रहातील कुरूप जागा होत. एकूण फुल्यांच्या 'सत्या'ला या कविता पार फाडून टाकतात. शंकर अन्याय नाहीसा करू शकतो व त्यासाठी तो कवींच्या विनवणीची वाट पाहतो असे असेल तर अन्यायासंबंधी शंकराची स्वतःची भूमिका काय आहे ते तपासले पाहिजे. शंकर काय किंवा देववाद्यांचा कोणताही देव काय, या नपुंसक गोष्टी केवळच विघातक नाहीत तर त्या क्रांतीची भूक लागू न देणारी गोष्टी आहेत.

'मुक्तियुद्धात'त पालो, करोटी, हिव, तनफुगी, शेरपसा, नोका असे अनेक ग्रामीण शब्द येतात आणि 'हात तिचे रावत असते', 'आम्ही आपले गरीब माणसं', 'गोष्टी करत राहो', 'सारे वाद संपुष्टात येईल', 'माणसाजवळ माणसे येईल' अशी अनेक वाक्ये येतात. ही वाक्यरचना चुकीची नव्हे. ही काटोलच्या परिसरातील शुद्ध रचना आहे. कवी हे जाणीवपूर्वक करतो. त्यामुळे कवितेचा गोडवा वाढतो. तिच्यातील देशीयतेचा ढंग खुलत जातो. सर्वसामान्य माणसाशी संवाद साधण्याच्या कवीस्वाभावाचा हा भाग आहे.

कवी दिवाकर बोबडे यांची कविता मुक्तियुद्धाच्या वाटेवरून चालणाऱ्या मनाचे मोहोर शब्दात बांधणारी कविता आहे. 'युद्ध सुरू झाले आता'च्या सुगंधाने या कवितेचे अस्तित्व भरून गेले आहे.

ग्रामीण जीवनाचे अत्यंत ताजे संदर्भ या कवितेत फुलतात. ज्या कवीमनाच्या सुखदु:खांची मैफल ही कविता होते ते मनच या कवितेचे निवेदक आहे. त्यामुळे ग्रामीण भाषेचा सहज ढंग कवीच्या अनुभवा-सोबत या कवितेत शिल्पित होतो.

मराठीतील सूर्यकुलाच्या कवितेचा वारसा जपणारी ही कविता असल्याने प्रकाशपूजन हे या कवितेचे जन्मध्येय झालेले आहे. या ध्येयानेच तिला पावलोपावली चांदणे शिंपित व फुले उधळीत बोलण्याची ताकद लाभते. त्या ध्येयामुळेच या कवितेच्या रक्तात प्रकाशाचे पीक काढण्याच्या प्रतिज्ञा पेटलेल्या आहेत.

'मुक्तियुद्धा'त अनेक सामर्थ्यस्थळे आणि सौंदर्यस्थळे आहेत आणि काही नवखेपणाही आहे पण त्यातून बाहेर पडण्याची जागरूक धडपडही आहे. त्यामुळे कवी बोबडे यांची कविता पुढल्या काळात अधिक सामर्थ्यवान होईल याची खात्री 'मुक्तियुद्ध' मधून मिळते. पुढल्या वाटचालीत कवीला मनापासून शुभेच्छा.

मुक्तियुद्ध : दिवाकर बोबडे

# मराठीतील सावित्रीकुलाची कविता

सुगंधाताई धेंडे यांचे काव्यलेखन गेली अनेक वर्षे सुरू आहे. एक समाजसेविका म्हणून, एक प्रशासकीय अधिकारी म्हणून आणि साहित्यक्षेत्रातील एक प्रतिष्ठित व्यक्ती म्हणून त्यांच्या पाठीशी मोठे संचित उभे आहे. सुगंधाताईंना अशा अनेक नात्यांनी समाजामध्ये सन्मानाचे स्थान प्राप्त झाले आहे. या सन्मानामध्ये किमान अर्धा वाटा त्यांच्यातील लेखिकेचा आहे.

मागल्या सुमारे वीस वर्षांपासून त्यांचा–माझा परिचय आहे. या काळात अत्यंत धिमेपणाने पण निष्ठेने त्यांचे लेखन चाललेले मी बघितले आहे. त्यांच्या या वाङमयीन व्रताबद्दल मला नेहमीच कुतुहल आणि आदर वाटत आलेला आहे. 'अग्निशिखा' च्या प्रस्तावनेच्या निमित्ताने मी त्यांचे मनापासून अभिनंदन करतो.

खऱ्या अर्थाने अग्निशिखाच असलेल्या सावित्रीबाई फुले यांच्यावरील कवितेने या संग्रहाला प्रारंभ व्हावा ही बाब मला मोठी अन्वर्थक वाटली. 'अग्निशिखा आभाळी भिडली क्रांतीची ज्वाला' अशी सावित्रीबाईंच्या कर्तृत्वाची गगनगामी प्रतिमा त्यांनी चितारली आहे. आजच्या सर्व परिवर्तनवादी समाजसेविका आणि परिवर्तनवादी लेखिका सावित्रीबाई फुल्यांच्याच लेकी आहेत. 'कन्या तुमच्या म्हणुनि आजला वाटतसे अभिमान' असे या एका लेकीने सावित्रीबाईंच्या इतरही लेकींच्यावतीने आईला साभिमान कळविले आहे. सुगंधाताईंच्या कार्याचा, युगस्त्री सावित्रीबाई फुले पुरस्कार देऊन महाराष्ट्राने त्यांचा गौरव केला आहे. या गौरवाने त्या सावित्रीबाईंच्या कन्या आहेत ही बाब विशेषत्वाने अधोरेखित झाली आहे.

स्त्री–मुक्ती चळवळीची अग्निध्वजा म्हणजे सावित्रीबाई. सावित्रीबाईंच्या जिद्दी कृतीउक्तींनी स्त्रीमुक्तीच्या तत्त्वज्ञानाचा मार्गदीप महाराष्ट्राच्या परिवर्तनाच्या हातात दिला. मराठी कवयित्रींच्या कवितेला सावित्रीबाईंनीच पहिल्यांदा मठा-मंदिरांमधून बाहेर आणले.

मराठी स्त्रीचा ऐहिक स्त्रीआदर्श आणि मराठी कवयित्रींचा विद्रोही आदर्श सावित्रीबाईंनी प्रथम महाराष्ट्रभूमीत उभा केला. तेव्हापासून स्त्रीजीवनाची अंधारयात्रा संपण्याच्या मार्गाला लागली. स्त्रीजीवनातील प्रकाशपर्वाला प्रारंभ झाला.

१ : ' दूर फेकुनि रूढी द्वारे
परंपरेची मोडुनि दारे
लिहिणे वाचणे शिकुनि घ्यारे
छान वेळ आली / इंग्रीजी माऊली आली '

२ : ' अविचार अज्ञान मूर्खत्व जेथे
कसे काय राहील धर्मत्व तेथे '

३ : ' नसे बुद्धि ज्याला नसे ज्ञान काही
अशा मानवाला कधी सुख नाही. '

या अवतरणांमधून मराठी कवयित्रींच्या कवितेत विद्रोहाची लावण्यवती पहाट कशी उगवत होती ते पाहता येते. मराठीतील या सावित्रीशिखा काव्यपरंपरेशी सुगंधाताईंच्या कवितेने नाते जोडले आहे.

' अग्निशिखा आभाळी भिडली क्रांतीची ज्वाला
शतशत वंदन साध्वी सावित्री करीतसे तुजला'

या गौरवशाली शब्दांमधून सुगंधाताईंनी सावित्रीबाईंना वंदन केले आहे.

अग्निशिखामधील ज्वालांचे सौंदर्य न्याहाळताना सुगंधाताईंच्या ' स्व 'निष्ठ कवितांनी विशेष खिळविले. सुख–दुःखांच्या घर्गीनी या कविता अधिकच सौंदर्योत्कट झालेल्या आहेत. या कवितांनी अनेक सूक्ष्मतरल पातळ्यांवरून मला सहल घडविली. एका शांत मनातील अशांत ढगांशी बोलण्याचे सुख मला दिले. एक ठिणग्यांचे कुंजवन या कवितांनी माझ्या मनात फुलविले. वनातील वणव्याने आणि जनातील उष्म्याने व्याकूळ होणाऱ्या जीवाशी माझी भेट घडली. ' जपणूक ' ही एक सुंदर कविता. दुःखाला गोंजारायचे नाही. त्याची खपली काढायची नाही. मनाजोग्या क्षणांची फुले वेचून जपून ठेवायची कारण आयुष्याच्या संध्याकाळी त्यांची ठेवरेव करायची असते. अशी तरल

आर्तता इथे व्यक्त होते. मानवी मनाचा एक जखमी डोह असा डोळ्या-पुढे आक्रंदन मांडतो. ऊब आणि निवारा मनाला कुठून कुठून मिळतो त्याची चित्रदर्शने 'शितल वारा'तून तर रंगीत चित्र रेखता आले नाही याची जळती खंत 'स्मृती'मधून चितारली जाते. आनंदाचे क्षण अस्ताला गेले आणि नजर अंधारून गेली त्याचे बोलके चित्र ' कळले ना ' मध्ये येते. दुःखाने विव्हळणाऱ्या मनाची साथ करण्याची अटळता सांगणारी ' साथ ' ही कविता या भागातील एक उत्तम कविता आहे. ' व्यथा ' मधूनही मनाचे शोकार्त पक्षी चितारले जातात. आठवणींच्या पाखरांचे पुन्हः पुन्हा जिवघेणे चिवचिवणे ' क्षण ' मधून येते. अलक्षित वेलीपरी जगण्याची हौस अपुरी राहते आणि जगणे प्रश्नार्थक होते. ' वडवानल ' हीसुद्धा अशीच एक यातना आहे. ' कशापायी ' मध्येही जीवन भकास करणारे काही हरवल्याची खंत संयत पातळीवरून चितारली जाते आणि काळीज तुटत राहते. 'भूतकाळ' या उत्तम कवितेतही असेच काही हरपते व आयुष्याचा धावता ऊनवारा तिथेच मोडून-थांबून जातो. 'चांदणशेले' हीसुद्धा या भागातील एक लक्षणीय कविता आहे. 'चंदन' या शेवटच्या कवितेत आपले दुःख ओठ शिवून सोसायचे, खपली काढायची नाही. अशी स्वतःचा छळवाद मांडणारी प्रतिज्ञा केली जाते. पण याच वेळी

' हरवलेल्या जनांना, दुःखितांना
बोलाची गोड खैरात, नाही जाहिरात '

हे व्रतही घेतले जाते ' रेती ' मध्ये मनाच्या मोहकतेपासून दाहकतेपर्यंत झालेला प्रवास चितारला जातो. सुगंधाताईंच्याजवळ अशा उत्कट, दाहक कविता लिहिण्याची शक्ती आहे या दिशेने त्यांची प्रतिभा झेपावत गेली तर निश्चितपणे मराठी कवयित्रींच्या परंपरेत वैशिष्ट्यपूर्ण आणि मौलिक कविता घेऊन त्यांना उभे राहता येईल. ही खरे तर त्यांची प्रकृती आहे. या जाणिवेच्या प्रांगणात त्यांचे मन आतून फुलते. या संदर्भात सुगंधाताई एका बाजूने सावित्रीबाईंशी नाते जोडतात तर दुसऱ्या बाजूने पद्मा गोळे आणि इंदिरा संत या कवयित्रींशी नाते जोडतात. या कवितांप्रमाणेच सामाजिक जाणीव व्यक्त करणाऱ्या कविताही मोठ्या सुंदर आहेत.

पहिल्या पातळीवर ही सामाजिक जाणीव या संग्रहात लोकनेत्यांना अभिवादन करणाऱ्या कवितांमधून व्यक्त होते. सावित्रीबाई फुले (अग्निशिखा), लो. टिळक (केसरी), तुकडोजी महाराज (राष्ट्र-संतास), जवाहरलाल नेहरू (रुंजी), लालबहादूर शास्त्री (जय जवान जय किसान), पंडिता रमाबाई (पंडिता रमाबाईस),कर्मवीर भाऊराव पाटील (कर्मवीर, वटवृक्ष), डॉ. बाबासाहेब आंबेडकर ( इन्सान हो तो ऐसा), सरोजिनी नायडू (तुलसीपर्ण) इ. कवितांमधून कवयित्रींची वैचारिक जाण व्यक्त होते. उपरोक्त लोकनेत्यासंबंधीचा आदरभाव सुगंधाताईंच्या जीवनदृष्टीचेही अधोरेखन करतो. ही जीवनदृष्टी नेहमीच काटेकोर राहत नाही. ती दोलायमान होते हे 'देवाघरच्या बागेमध्ये बाण तयाचि पडली'(फुलण्या आधी)अशा ओळींमधून व'आण' सारख्या कवितेवरून दिसते. एरवी या कवितेतील सामाजिक जाणिवेचे नियंत्रण सावित्रीबाई फुल्यांच्या कार्याद्वारेच होताना दिसते ' सांज ' सारख्या कवितेतून एखाद्या ग्रामीण मुलीच्या मनोगतातून ही जाणीव व्यक्त होते. भारतीय संविधानाची शक्ती जीवनाचा सांधा बदलण्यासाठी समर्थ आहे हे भान या कवयित्रीला आहे. तीच आघाडी आपल्यापरीने या कवितेने उभी केली आहे. त्यासाठी 'धगधगतील कधी मशाली' असे तिला झाले आहे. समतेचा गवसे शेला पांघराया' अशा सुंदर प्रतिमेतून समतेचे सौंदर्य आणि वैभव सांगितले जाते. सामाजिक जाणिवेचा असा अनंत पाकळ्यांचा आविष्कार या कवितेतून होतो. पण ' बा वसंता...' या कवितेत मात्र कवयित्रीने बहार केली आहे. ही या संग्रहातील एक मौलिक कविता आहे असे मी मानतो. वसंत ऋतू चराचराला पुलकित करतो.त्यांच्यावर माणिक रत्ने उधळून देतो पण त्याला दु:खितांची कीव येत नाही. त्याच्या अवकळा तो दूरक रीत नाही. इतर सुखवस्तु वसंताच्या वरील करामतीचे स्त्रोत्र गात असतील पण गरिबांच्या जीवनात–

' संपन्नतेचे हरित पसरवी
वीरश्रीचे बुट्टे जडवी
तेज सौरभा सर्वांगी भरवी
प्रमुदित होऊ मग गाऊ थोरवी '

असे तेज फुलविणाऱ्या वसंताची भोरवी गाण्याचे सुगंधाताईंनी ठरविले ते त्यांना फार प्रखर करून जाते. ही आंबेडकरी जाणीवही मला या कवितेत दिसली.

सुगंधाताईंच्या संवेदनशीलतेचे तिसरे अंग माझ्या विशेष लक्षात भरले ते निसर्गाच्यारूपाने. या कवयित्रीला निसर्गात रमण्याचा अंगभूत स्वभाव लाभला आहे. निसर्गाची लय आपल्या रक्तातून धावत असते. तिचा छंद आपल्या श्वासातून वेल्हाळत असतो. अनंत स्पंदनांनी व अनंत संदर्भांनी निसर्ग आपल्या तनामनातून मोहरत असतो. सुख–दुःखांच्या, अंधार–प्रकाशाच्या, उगवण्या–मावळण्याच्या नाना तऱ्हांनी आणि अनंत स्वभावांनी त्याने आपल्या जीविताला तोल दिला आहे. अशा या निसर्गाची संवेदनलीला या कवितेत इतक्या पातळ्यांवरून झंकृत होते की सुगंधाताईंमध्ये एक श्रेष्ठ निसर्गकवयित्री दडून असल्याचा सुखद भास होतो. ' नायगावच्या भूमिमधले इवलेसे बीज ', ' वनात वणवा, जनात उष्मा ', ' भूई तापते तडकून जाते ', ' पक्षी वक्षी घेऊनी गळती पिवळी पाने', ' तरल लहरते उन्ही मृगजळ,' 'अंगनी आभाळ शोभते', ' मुग्ध कळी मी उभी ', ' गाव माझा शोभून दिसेल, वेणीतला गजरा जसा ' ' गजऱ्याची आम्ही फुलं, तरंग कसे लहरत आहेत ' अशी अनंत ठिकाणी ही कविता निसर्गाची भाषा बापरते. सारीपाट, शीतल वारा, जलबिंदू,सावली,आसवडोह,पागोळी इत्यादी कवितांमधून तर निसर्गाची मोठी सुरेख चित्रे कवयित्रीने काढली आहेत.

काही बालगीतेही या संग्रहात आहेत. ' बालक ' या पहिल्याच बालगीतात बालकांच्या शक्तीचे स्तोत्र साकार होते. जिद्द, धाडस, पराक्रम आणि कर्तृत्व यांचा उजेड ही कविता मांडते. कमळकळी, बालकदिन, घरटे, ससा, झेंडा, सोन्याचा वाढदिवस या रचना सुंदर आहेत. बालजगाची मातृभाषा या कवितांना लाभली आहे. साधी अर्थवाही आणि उत्कट अशी ही गीते बालमनांचे रंजन आणि प्रबोधन करण्यास समर्थ आहेत. राष्ट्रीय भावना, निसर्ग संवेदना आणि भाषेचा डौल यांचेही संस्कार ही गीते सहज करू शकतात.

१ ' आणू खेचूनी नाना इंदु तारांगणीचे '
२ ' चिमुकल्यांचा इवल्या हृदयी
भवितव्याची बीजे दडली
वृक्ष होऊनी देतील सावली

या भागातील कविता याप्रकारे मुलांच्या मनात शक्ती फुलवू शकतात. त्यांच्या भवितव्यांचे भव्य मानवतावादी स्वप्न त्यांच्या नजरेत त्या खेळवू शकतात.

सुगंधाताईंच्या या संग्रहामधील मला आवडलेली ही वैशिष्ट्ये नोंदविल्यानंतर या संग्रहामधील सहजही लक्षात येणाऱ्या उणिवांची नोंद करणे आवश्यक आहे. अनेक ठिकाणी या संग्रहातील कवितांचा ताल खंडित होताना दिसतो. लय दुखावली गेलेली आहे अशी अनेक स्थळे या संग्रहात आहेत. सुगंधाताईंनी या संग्रहात खालील गोष्टींचा समावेश का केला तेही कळत नाही ' शुभदा ' या नावाच्या कवितेत मंगलाष्टके आहेत. ' इन्सान हो तो ऐसा ही कविता हिंदीत आहे. ' ode to liberty ' ही कविता इंग्रजीमध्ये आहे. या कवितांमुळे ' अग्निशिखा ' या कवितासंग्रहाकडे पाहण्याची वाचकाची दृष्टी बदलून जाते. मंगलाष्टके महत्त्वाची आहेत पण ती लग्नमंडपात, काव्यसंग्रहात नव्हे ' जपणूक ', ' बा बसंता ', ' जलबिंदू ','कळले ना','साथ', ' भूतकाळ ' अशा काही उत्तम कविता लिहिणाऱ्या या कवयित्रीने या संग्रहात मंगलाष्टके समाविष्ट करण्याचा मोह टाळायला हवा होता. शिवाय या संग्रहात परस्परविरोधी अशा जाणिवांना एकत्र आणले जाते. टिळक आणि आंबेडकर या दोन प्रवृत्ती एका जाणिवेत येऊ शकत नाहीत. अध्यात्मपरंपरेतील शब्दकला आणि आंबेडकरी जाणीव या दोन बाबी एकत्र येऊ शकत नाहीत.असा जाणीवसंकरही सुगंधाताईंनी टाळायला हवा होता. शिवाय हिंदी वा इंग्रजी कविता चांगल्या असतीलसुद्धा पण तरीही या काव्यसंग्रहामध्ये त्यांचा समावेश व्हायला नको होता. शिवाय बालगीतांच्या विभागातच बाबासाहेब आंबेडकरांवरील 'इन्सान हो तो ऐसा' ही कविता येते. ही कविता बालगीत आहे काय ? ' ode to liberty 'या इंग्रजी रचनेला बालकविता म्हणता येईल का ?

'चंदन' ही एक चांगली आणि गंभीर कविता मला वाटते. एका सुंदर आणि व्याकूळ अशा आत्मनिष्ठेचा दाह या कवितेत भरलेला आहे. ही कविताही बालकविता निश्चितच नव्हे. मग या विभागात ती आली कशी ? हे कदाचित अनवधानानेही झाले असेल पण त्यामुळे या कविता-संग्रहाची मांडणी बेडौल झाली हे कबूल केलेच पाहिजे.

सुगंधाताईंच्या कवितेची शक्तीस्थळे काव्यदृष्टया वर मांडून आहेतच. सुगंधाताईंची स्वनिष्ठ कविता आणि या कवितेतील मानवी मनांचे नाना पातळयांवरून हेलकावत राहणे मला मोठे मोलाचे वाटले आहे. सुगंधाताईंनी आपल्या या कवितांमधील भाव-भावनांच्या दिशांनी पुढे प्रवास करावा. उत्कटतेचे आणि तीव्रतेचे हात हातात घेऊन या आपल्याच काळजाच्या जखमांशी झिम्मा खेळावा. त्यांच्या प्रतिभेला त्यांच्या आयुष्याची कविता याच काळीजपथावर गवसू शकेल.

**अग्निशिखा : सुगंधा शेंडे**

# युद्धभूमीकडे निघालेली कविता

आजची कविता प्राधान्यत: विद्रोहमुखी झालेली आहे. हा विद्रोह बिनधास्त पद्धतीने सामाजिक-सांस्कृतिक विरूपतेच्या नावाने आणि या क्षेत्रातील पीडीतांच्या नावाने व्यक्त होतो आहे. ह्या कवितेतील विद्रोह कवीव्यक्तित्वाशी निगडित आहे पण हे कवीव्यक्तित्व एका विद्रोही समूहाचा एकजीव भाग असल्याने अस्मितेने पेटलेल्या एका संपूर्ण समूहमनाचा उच्चार या कवितेतून शिल्पित होतो.

या आंबेडकरवादी विद्रोही कवितेच्या संदर्भात सामाजिक जाणिवेची कविता हे शब्दही तसे मोघमच आहेत. सामाजिक जाणीव नेहमी परिवर्तननिष्ठच असेल असे नाही. परिवर्तनविरोधी सामाजिक जाणीवही संभवते. पण विद्रोही कवितेतील सामाजिक जाणिवेला परिवर्तननिष्ठ असल्याशिवाय गत्यंतर नसते. परिवर्तननिष्ठ साहित्याच्या

संदर्भातच विद्रोह संभवतो आणि विद्रोहाची चर्चा संभवते. परंपरावादी जीवनदृष्टीचे सौंदर्यशास्त्र सामान्यतः विद्रोही कवितेला प्रचारी म्हणून नाक मुरडते. विद्रोही जाणिवेच्या साहित्याला ते सौंदर्यशास्त्र प्रचारी साहित्य म्हणते. हेच सौंदर्यशास्त्र गंगाधर गाडगीळ, गोखले, पु. भा. भावे वा जी. ए. कुलकर्णी यांच्या सामाजिक जाणिवेच्या साहित्याला प्रचारी साहित्य म्हणत नाही दुसऱ्या बाजूने वरील साहित्यिकांच्या सामाजिक जाणिवेचा गौरव करणारी परंपरावादी वृत्ती एक विशिष्ट बांधिलकीही मानत असते पण या वृत्तीने बांधिलकीला विरोध म्हणजे परिवर्तनवादी जाणिवेच्या साहित्याला विरोध अशी सोईची समजूत करून घेतलेली असते.

जीवनाला यथार्थपणे जीवन म्हणवून घ्यायचे असेल तर त्याला विद्रोही असणे आवश्यकच असते. विद्रोह हा जीवनाचा प्राणच असतो. जिवंत असणे आणि विद्रोही असणे या बाबी खऱ्या ऊर्जावंत माणसाच्या-साठी दोन नसतातच. विद्रोही असणे हीच कोणत्याही अस्तित्वाची अर्थपूर्ण ओळख असते. विद्रोह या वृत्तीनेच दुनियेचे आयुष्य फुलवीत, फळवींत आणलेले असते. अवरोध → अवरोधांवर मात → आणि पुढील वाटचाल हेच विद्रोहाचे स्वरूप आहे. बंद असलेली वा बंद केली गेलेली जिंदगीची दारे उघडणे आणि पुढे जाणे या प्रक्रियेतून घडलेला इतिहास हा मानवाच्या विद्रोही वृत्तीचाच इतिहास आहे. माणूस असणे वा माणसाचे असणे हे विद्रोहामुळेच शक्य होते. कलावंतही माणूसच असतो. त्यामुळेच साहित्य ही निर्मिती परिवर्तनानिष्ठ मानवाची ठरते. विद्रोह हा केवळ जीवनाचाच नव्हे तर कवितेचाही प्रतीधर्म असतो. हा विद्रोह कवितेत हजारो रूपांनी, हजारो संदर्भांतून आणि हजारो पद्धतींनी साक्षात होत असतो.

संजू नाईक या कविमित्राचे व्यक्तिमत्व पूर्णतः विद्रोही आहे. हे व्यक्तिमत्व 'युद्धघोष' या त्यांच्या कवितासंग्रहात सामाजिक आणि सांस्कृतिक अवरोधांना धडका मारीत काव्याचे स्फुलिंग उधळीत आहे. या कवीचे पाय बहिष्कृत भारतात घट्ट रोवलेले आहेत आणि इथे असे उभे राहून त्याने आपल्या कवितेतून एक प्रभावी ' युद्धघोष ' मांडलेला

आहे. गतीच्यापोटी या युद्धघोषाचा जन्म होतो. विद्रोहाचा वसंत शोभावा असाच हा युद्धघोष आहे. मराठी कवितेतील युद्धछावणीत संजू नाईक या कविमित्राची प्रतिबद्ध कविता युद्धनिकड जाहीर करीत सामील होत आहे. या नव्या विद्रोही कवितेचे मी मनापासून स्वागत करतो.

एकोणिसशे पंचेचाळीस नंतरची मराठी कविता मोठ्या प्रमाणात पाश्चात्य प्रभावातून निर्माण झाली. तिच्यातील केवळ शैलीच नव्हे तर जाणीवही दत्तकच होती. या दत्तक कवितेचे कौतुक पांढरपेशा मराठी काव्यसमीक्षेने प्रदीर्घ काळपर्यंत केले. पण १९६० नंतरच्या काळात या कवितांचा दराराही संपला. तिच्यासंबंधीचे भ्रमही संपले. याला कारण मराठी साहित्यात मराठी जाणिवांचा झालेला उद्रेक ! मराठीतील नवकविता एकाच वेळी युरोपमुखीही होती आणि भूतकालमुखीही होती. पण १९६० नंतर या कवितेची सद्दी मराठीतील विद्रोही साहित्याने संपविली. तळागाळातील प्रतिभा आता लिहू लागल्या. दीन-दलितांच्या जीवनातील मुके पडसाद शब्दातून वादळू लागले. या प्रक्रियेतून निर्माण झालेली मराठी कविता आंबेडकरवादी कविता म्हणून ओळखिली जाऊ लागली.

मराठीतील विद्रोही कवितेने नव्या जीवनाची, कवितेतील नव्या संस्कृतीची, नव्या सामर्थ्याची द्वाही फिरविली. संजू नाईक हा मराठीतील या तेजस्वी पर्वाचा पाईक आहे.

मंगल देशा
पवित्र देशा
भाकर पाण्याच्या देशा
येशील कारे
स्वप्नी बारे
इथल्या भंगल्या
गावकुसाच्या ! (मंगल देशा)

हे नवे विद्रोही देशस्तोत्र त्यामुळेच तो गावू शकतो. या पार्श्वभूमीवर परंपरावाद्यांनी गाईलेल्या देशस्तोत्रांची दिवाळखोरीही

अधोरेखित होऊन जाते या कवितेत देशाचे मंगलपण म्हणजे काय ? देशाचे मंगलपण कशाला म्हणायचे ? या मंगलपणातून कोणत्या गोष्टी वगळायच्या ? या प्रश्नांचे वेगळे उत्तर संजू नाईकची कविता देत आहे. युद्धघोषणेमधील ' बाभूळगाव ' ही कविताही आपल्या समाजाचा चेहरा स्वच्छपणे मांडते. येथील उपेक्षित समाजाचे जगणे, त्याचे वंचनेत करपून जाणे आणि अभावात बेचिराख होऊन जाणे या सर्व गोष्टींचे चित्र पुढील ओळींत दाटलेले आहे.

" झाडावर अडकल्या
फाटक्या पतंगासारखी
अन्नपाण्यावाचून
शेवटी . . .
जातात फाटून तुटून " (फाटके पतंग)

पण हे सर्व असले तरी भोवतीच्या इतर मनांना त्याचे काही वाटत नाही. त्यांनाही हे सर्व पाहण्याची व काहीही वाटू न देता सहन करण्याची सवय झालेली आहे. भोवतीच्या या संवेदनाशून्य माणसांचे जगणे संजू नाईकला डबक्यातील महोत्सवासारखे वाटते व तो चिडतो.

पायरीची गुलामी
नसानसात
नशा बनलेली

त्याला दिसते. कवी या पायरीची दुःखयात्रा मांडतो. पायरीच्या प्रेतयात्रेचेही स्वप्न मांडतो. आज अनंत मथुरांची कधी शौकाने तर कधी सूडाने अब्रू हलाल केली जाते. या अशा सर्वच वेळी प्रस्थापित समाजाची स्त्रीविषयक करुणा सोयीने द्रौपदीपाशीच थांबून असते ती भूतकाळातून वर्तमानात येण्याचे टाळते. आजच्या द्रौपदीला वाचविण्यापेक्षा कालच्या द्रौपदीबद्दल हळहळ व्यक्त करणे जास्त सुरक्षित आणि सुसंस्कृतपणाचे आहे अशीच त्याची समजूत असावी. अब्रू हीच गरिबांची श्रीमंती असते पण केवळ पाण्यासाठी आईच्या या श्रीमंतीच्या चिंध्या झालेल्या त्याला पाहणे भाग पडते. असे शेकडो वस्त्रहरणांचे नंगे तमाशे गावोगावी होतात. गावोगावचा पाशवीपणा कवीला हैराण करतो, कवी संतापतो.

त्याच्या रक्तात युद्ध पेटायला लागते तो युद्धाची गाणी गातो. तो युद्धघोष करतो. तो आपल्या विजांच्या पावलांनी अस्मानी तुडवीत जातो. या सर्वच शोषणाचा एक राजमार्ग अध्यात्मातून निघतो याचे भान या कवीला आहे. त्यामुळेच तो संस्कृतीच्या आणि अध्यात्माच्या कवचकुंडलांना हात घालतो. युद्ध घोषित करतो. गतानुगतिकत्वाची ओझी, प्रतिष्ठेच्या जुन्या कल्पनांची ओझी समाजाच्या मतावरून काढून फेकल्याशिवाय व्यवस्थांतर साकार व्हायचे नाही याची चांगली जाण या कवीला आहे. आपल्या गावात पाऊस येत नाही कारण पावसाचे रस्तेच हरवलेले आहेत. हे रस्ते हरवलेपणच भोवतीही आणि पुढेही कवीला दिसते.

‘ हे आजूबाजूचं वातावरण
कसं अगदी अनोळखी
परग्रहावरचं ’

हे हवामान कवीला अद्ध्वस्त करते. युद्धघोषमधील अनेक कवितांमधून या संदर्भातील वेदनांचा पाऊस पडला आहे.

दु:ख आहे हे खरेच आहे. पण हा कवी दु:खाने हळवा बनत नाही. तो दु:खाच्या महापुरातही वाहून जाणे नाकारतो. तो या दु:खाने अंतर्मुख होतो. आशावादी बनतो. या आशावादाचा उजेडही त्याच्या अनेक कवितांमधून सांडलेला आहे. बुद्धाची करुणा कवीला एका बाजूने दु:खमुक्तीचा मार्गही सांगते आणि भोवतीचे विपरीत वास्तव त्याला महाकाय योद्धा व्हायला सांगते, आणि तो युद्धघोष करतो. ‘योद्धा’ या कवितेत संजू नाईक या कवीने आपल्या विद्रोही पूर्वजांशी आपले नाते जोडले आहे ते अर्थपूर्ण आहे.

संजू नाईक यांच्या युद्धघोषमधील विद्रोह आंधळा नाही. या विद्रोहाचे तोंड जीवनाच्या सौंदर्याकडे वळलेले आहे कारण भूतकाळात आणि वर्तमानकाळातही साध्या माणुसकीलाही वंचित राहिलेल्या उपेक्षितांच्या जगण्यात उगवलेला तो विद्रोह आहे. विद्रोह करुणेतून जन्माला येतो. माणुसकीसंबंधीची, माणसाच्या सुखदु:खासंबंधीची, करुणा विद्रोहाला जन्म देते. करुणा → विद्रोह → क्रांती असा हा प्रवास

असतो. करुणेच्यापोटी विद्रोह जन्माला येतो आणि विद्रोहाच्यापोटी क्रांती जन्माला येते. संजू नाईक यांच्या कवितेतील विद्रोह संयमीही आहे आणि विवेकीही आहे. सामाजिक परिवर्तनाचा ध्यास हा या कवितेचा मध्यवर्ती ध्यास आहे. ही कविता व्यक्तिनिष्ठ आहेच पण ही व्यक्तिनिष्ठा एका अस्मिता पेटलेल्या समूहाशी इतकी एकजीव झाली आहे की विद्रोहाचा लोकाविष्कार असे स्वरूप या कवितेला येते. ही कविता विद्रोहाच्या नव्या युगात समर्थपणे सामील झाली आहे. युद्धघोष करीत युद्धभूमीकडे निघालेल्या या कवितेला मी मनापासून सुयश चिंतितो.

युद्धघोष : संजू नाईक

■

# दुःखिताच्या कवितेचा अग्निपिसारा

आज मराठी कवितेत विद्रोहाची राजवट सुरू आहे. मूलगामी समाजपरिवर्तनाच्या आणि काव्यपरिवर्तनाच्या ध्येयाने ही लोकशाही राजवट अग्निपिसारा झालेली आहे. कवी अविनाश वरोकर यांची ही कविता म्हणजे विद्रोहाच्याच दिशेने फुलेला अग्निपिसारा होय.

कालपरवापर्यंत मराठी काव्यसमीक्षेत रचण्या-नटण्यालाच कलात्मता म्हणून नाचवले, वाचवले गेले. या मांडणीनिष्ठ रसिकतेची हुकूमशाही प्रथम मार्क्सवादी कवितेने आणि नंतर अधिकच मूलात्म पातळीवरून दलित कवितेने खिळखिळी केली.

मागील काही वर्षांत कवी आणि त्याच्या भोवतीचे समाजवास्तव यांच्यातील अतूट संबंध मूलगामी पद्धतीने प्रकाशित झाले शरीर आणि मन यांचे जे नाते तेच नाते कवी आणि समाज यांच्यात असते. कवितेची नवी पावले परिवर्तनाशी संबंध जोडण्याच्या तिच्या शक्तीतून पडत असतात आणि कलेसाठी कला हा वाङ्मयातला वेदान्त परिवर्तनात पराभव पाहणारानी उद्घोषिलेला असतो हे लक्षात आले.

मराठी काव्यसमीक्षा आता जीवनजाणिवा,अनुभव,आशय यांच्या चर्चेलाच केवळ महत्त्व देऊ लागले असे नाही तर वरील गोष्टींमधील प्रतिगामीत्व आणि प्रगतिगामीत्व लक्षात घेण्याचा,त्यामागील सामाजिक सांस्कृतिक संदर्भ व कवीचे मूल्यवंचरित्र यांचाही शोध घेण्याचा प्रयत्न करू लागली आहे. त्यातून प्रतिगामी असे कवीवर्गही ही समीक्षा लक्षात घेऊ लागली आहे. परिणामतः मराठी काव्यविचार जीवनाला सुरूप करणाऱ्या मूल्यांना 'कवितेची मार्गदर्शक तत्त्वे' मानून पुढे निघाला आहे असेच लोभस चित्र आज दिसत आहे.

कवितेची ही मार्गदर्शक तत्त्वे सिद्ध करण्यात दलित कवितेने सिंहाचा वाटा उचललेला आहे. त्यामुळे मराठी कवितेचा केंद्रिय देखावाच आज पार बदलून गेलेला आहे. आज परिवर्तननिष्ठ दलित जाणिवेचे सभासदत्व शहरी आणि ग्रामीण विभागातीलही परिवर्तनेच्छू मोठ्या प्रमाणात स्वीकारीत आहेत. एरवी ज्या प्रतिभा सरंजामी आणि भांडवली कक्षेत निरूद्देश आणि रंजनी निर्मितीशी बांधिलकी सांगत होत्या आणि ईश्वरशाहीच्या डबक्यात स्थिरावल्या होत्या त्या प्रतिभा आता भोवतीच्या दुःखा–दारिद्र्याशी बांधिलकी सांगत आपले अग्निपिसारे फुलवीत आहेत. कवी अविनाश वरोकरांच्या प्रतिभेचा हा अग्निपिसारा आजच्या जीवनात मूलगामी संग्रामात फुललेला आहे.

केशवसुत व मुक्तिबोधादी मार्क्सवादी कवी आणि दलित कवी या मराठी कवितेतील प्रकाशपरंपरेशी वरोकरांच्या कवितेने आपले कुटुंब–नाते सांगितले आहे. आज मराठी कविता कवितेतील गतिरोधक जाणिवांना छेद देत, मर्ढेकरी अगतिकतेवर नकार–फुल्या मारत गतिसंवर्धन साधीत आहे. मराठी कवितेतले हे युद्धदर्शन आहे.वरोकरांची कविता ही केशवसुती कविता मार्क्सवादी कविता आणि दलित कविता या प्रकाशाकांक्षी काव्यपरंपरेतील समर्थ कविता आहे.

मागील आठ–दहा वर्षांत कवी वरोकर यांच्या कवितेने हे स्थित्यंतर साकार केले. त्या आधी सुमारे १९५५ पासूनची त्यांची कविता स्वयंकेंद्रितच होती. या संदर्भात ते नवखे कवी ठरत नाहीत. त्यांचे नूरन हे खंडकाव्य १९६८ मध्ये प्रकाशित झाले आणि

त्याला मराठी रसिकतेने पसंतीची पावतीही दिली. नागपूर जिल्ह्यातील काटोलसारख्या लहान गावात राहूनही त्यांनी सांधा बदलला, नव्या युगजाणिवेत स्वत:ला झोकले आणि आपल्या प्रतिभेचे तेल त्यांनी खलास होऊ दिले नाही ही बाब निश्चितच गौरवार्ह मानायला हवी. 'अग्निपिसारा' हा त्यांचा स्फूट कवितांचा संग्रह एवढ्या प्रदीर्घ कालानंतर का होईना प्रकाशित होत आहे याबद्दल मला विशेष समाधान वाटत आहे.

वरोकरांची कविता वाचताना डोळ्यापुढे उलगडत जाते ती एक निष्ठावंत प्रतिभा. निष्ठावंत प्रतिभा आणि प्रदर्शननिष्ठ प्रतिभा यांच्यात जमीनअस्मानाचे अंतर आहे. आजही मराठीत फॅशनेबल-प्रदर्शननिष्ठ कविता लिहिली जाते आणि तिची जाहिरात करणारी तरतरीत टीकाही लिहिली जाते. अविनाश वरोकर पक्षधर कवी आहेत. ते कवी होण्यासाठी लिहीत नाहीत तर परिवर्तननिष्ठ जीवननिष्ठांनी फुलत असताना कवीत्व सिद्ध करतात. शोकेसमधील डमी–काव्याच्या चाहत्या रूपवादाला वरोकरांची कविता रूचणार नाही हेच या कवितेचे सर्वात मोठे यश मी मानतो.

आसवांची निरांजनं व्हावीत
तप्त धुळीत रूळणाऱ्या मातीसाठी
अपार सिंधूतही य:कश्चित बिंदू बनून झिजणाऱ्या
उपेक्षित थेंबासाठी
हाडांची काडं आणि रक्ताचं पाणी करणाऱ्या
कोरांटी गंधहीन फुलासाठी !
पुष्पहार व्हावेत करांचे
रक्त पेरूनही विरक्त असणाऱ्या
विकल आत्म्यांसाठी, विगलित देहांसाठी !
अनाथ–अपंगांच्या अभागी आसवांसाठी
मातीचे स्वप्न साकार करून
मोत्याचं दान देणाऱ्या अविश्रांत श्रमाच्या अनिकेत पुत्रासाठी
पायघड्या व्हाव्या मूठभर हाडांच्या

पायांखाली तुडविलेल्या रक्तबंबाळ आतड्यांसाठी
उसवलेल्या उरातील उकळत्या व्यथेसाठी"

ही 'मज्जेची निज जो फुले पसरितो' या केशवसुती कलावंत प्रतिज्ञेशी नाते सांगणारी वरोकरांची प्रतिज्ञा आहे. ही प्रतिज्ञा जशी त्यांच्या अनेक कवितांमधून व्यक्त होते तसे या दीन, दुःखी लोकांच्या जीवनाची दखल न घेणाऱ्या वृत्तीचेही अधोरेखन वरोकरांच्या कवितेतून सिद्ध होते.

१) 'लटकली क्रूसावरी जी लक्तरे लक्षावधी
गाईली का कुणी कधी त्यांना जगी या आरती'

२) 'राबणाऱ्या यातनांचा का असा छळवाद होतो ? ' अशा प्रश्नांनी कवीचे मन व्याकूळ होते आणि गावकुसातील आणि गावकुसाबाहेरीलही शोषितांची उत्कट चित्रणे साकार होतात. वरोकरांची कविता जशी दारिद्र्याची चित्रे काढते तशी जातियविषमतेचीही चित्रे काढते.या अर्थाने या कवितेच्या माणूसकीचा आवाका अफाट आहे.या शोषणाच्या बिजगणिताचाही थांगपत्ता या कवीला लागलेला आहे. तो म्हणतो -

'. . . मी पाहिले आजवर, अनुभवलेत पावलापावलावर
देवधर्माच्या विविक्षित स्वयंनिर्मित चौकटीत
तथाकथित मदांध काफिले, '

विद्रोहाच्या दिशेने वरोकरांनी ही मोठीच मजल मारलेली आहे. याचे कारणही त्यांनी फुले-आंबेडकरांचा क्रांतिवारसा मनाने स्वीकारला हेच आहे. (कवीची काही उपमाने पारंपरिक व्यवस्थेभोवती रूंजी घालतात हेही थोडे खरेच असले तरी फांद्यांशी फारकत घेणारे त्यांचे मनही इथे सामर्थ्याने व्यक्त होते.)

वरोकरांच्या वृत्ती निसर्गातही विलक्षण उत्कटपणे फुलतात. विविध निसर्गप्रतिमांनी ही कविता नटलेली आहे तशा केवळ निसर्गचित्रे काढणाऱ्या कोलकास, गॉलगाथाचं रक्तवर्ण टेकाड, कोठारा, ताडोला नॅशनल पार्क, कोवलम बीच अशा काही कवितांनी या संग्रहाला वैविद्धयाचे एक परिमाण पुरविले आहे.

फुले–आंबेडकर हे कवीचे वैचारिक माहेर आहे. त्यांच्यावरील कवितांनी कवी आपल्या जीवनदृष्टीचे अधोरेखन करीत आहेच परंतु

लालबहादूर शास्त्री, बावा आमटे, बलराज सहानी यांच्यावरील कवीतांही रेखीव उतरल्या आहेत. परंतु कवीच्या एका 'शतकाचा प्रवास संपला ' 'आई', 'भाऊ', आणि 'दोन आसवं निखळतील या कविता विशेष भावपूर्ण उतरलेल्या आहेत.

कुठे तू अन् कुठे मी, तृषार्त 'तू' अन तृषार्त 'मीही' अशी प्रेमाची ओथंबणारी यातनाही इथे आहे. या कवितेत अनेक वेधक वैशिष्टचे आहेत. प्रतिमांची देखणी गुंफण आहे. तिच्यात सामाजिक विद्रोह आहे आणि दंभावर ओढलेले कोरडे आहेत. निसर्गाच्या सौंदर्य कल्लोळाशी साधलेली समरसता आहे आणि प्रेमाची व्यथावैजयंतीही आहे. पारडसिंगा या जन्मगावासंबंधीचे अनेक ठिकाणी उलगडलेले भावूक पदर आहेत. कधी कवी व्याकूळ झाला आहे कधी तो उपरोधाने पेटलेला आहे. अशी मराठीतील श्रेष्ठ विचारकवितेशी सन्मानाने नाते सांगणारी ही कविता आहे. आजच्या कवितेत वरोकरांचे नाव एक सन्माननीय नाव म्हणून गणले जाईल असा मला विश्वास आहे.

इथे असावा घुमत पारवा शहीद सरणा भवती मानवते ! तुज निवेदिन या यज्ञातील आहुती ! अशी या कवितेची सकलच संदर्भात प्रतिज्ञा आहे आणि तिची ही प्रतिज्ञा या काव्यसंग्रहात समर्थपणे सफल झालेली आहे. ही कविता आत्मनिष्ठ आहे. (कवीची खरी कविता हे त्याच्या भावजीवनाचे आत्मचरित्रच मांडत असते.) अग्निपिसारा हे वरोकरांचे काव्यसुंदर आत्मचरित्र आहे.

हेलावत गेलो, कधी ओलावत आलो
आली पायाखाली आर्ज तेव्हा पेटत राहिलो
असे पेटणे, भेटणे पुन्हा आपुल्या दुःखाला
तो हा अग्निचा पिसारा आला शब्दांच्या हाताला !

अग्निपिसारा झालेल्या या कवीच्या पक्षधर भावजीवनाचे आत्मचरित्र उत्कटपणे मांडणाऱ्या या कविता मराठीतील प्रकाशाकांक्षी कवितेत मानाचे स्थान मिळवितील असा विश्वास मला वाटतो.

**अग्निपिसारा : अविनाश वरोकर**

# दलित कवितेची 'युद्धाई'

प्रारंभकाळात दलित साहित्य तुच्छतेचा आणि उपेक्षेचा विषय झाले. नंतर क्रमाने ते चर्चेचा आणि अनुषंगाने आरोपाप्रत्यारोपाचा विषय झाले. आता क्वचितच गैरसमजुतींचा रुग्णविलास सोडला तर दलित साहित्य आता चिंतनाचा आणि गौरवाचा विषय झालेले आहे असे दिसते.

एखाद्या निर्णायक महायुद्धासाठी निघालेल्या असंख्य योद्ध्यांचा योजनांचे तळस्पर्शी आराखडे आखत तळ पहावा आणि तो तळही अधिकाधिक मोठा होत राहावा तसे शत्रूहृदयविदारक दृष्यही आज दलितसाहित्याच्या रूपाने मराठी भाषेत साकार झालेले दिसते.

हे महायुद्ध कशासाठी? कुणाविरुद्ध? या प्रश्नांच्या उत्तरांचा स्पष्ट उजेडही या योद्धांनी आपल्या भवितव्य आणि विजय फिदा झालेल्या डोळ्यात घेतलेला आहे आणि हे युद्ध सोपे नव्हे,त्यासाठी प्रचंड तयारीची गरज आहे याचीही नेमकी जाणीव या अंधारांचे महासागर शतकानुशतके पोहून आलेल्या योद्ध्यांना आहे. हा परांपरावादाकडून मानवतावादाकडे,तमोधनाकडून प्रबोधनाकडे आणि भ्रांतीकडूच क्रांतीकडे झेपावत चाललेला हा विवेकवाद्यांचा प्रवास आहे. अन्यायमस्ताविरुद्ध सुरू झालेलीही अन्यायग्रस्तांची लढाई आहे.युद्धजिवींची ही'युद्धाई'आहे.

दलित साहित्य केवळ साहित्याचा प्रांत समृद्ध करण्यासाठी म्हणजे आपले साहित्यिक अस्तित्व सिद्ध करण्यासाठी नाही. बुद्ध, फुले, मार्क्स, आंबेडकर यांच्या संकल्पनांमधील सभ्यमानवी संस्कृतीच्या सर्जनासाठी कटिबद्ध झालेले हे साहित्य आहे. जीवनाच्या पुनर्मांडणीच्या मूलभूत ध्येयाने, जीवनाच्या सुंदर, अशोषक, सुसंस्कृत, सुसभ्य मांडणीच्या ध्येयाने जन्माला येणारे हे साहित्य, साहित्य म्हणून वेगळे, लक्षणीय ठरतेच, पण ही त्याची हेतुत: नसली तरी अपरिहार्य परिणति आहे. केवळ साहित्यनिर्मितीच्या हेतुने निर्मिलेले साहित्य चांगले, श्रेष्ठ साहित्य असेलच हा जसा नियम नाही तसे स्पष्टपणे साहित्यबाह्य

हेतुने निर्माण झालेले साहित्य श्रेष्ठ साहित्य ठरणारच नाही असा अडाणी कायदाही कुणा साहित्यशास्त्राला आजवर जन्माला घालता आला नाही. निदान प्रत्यक्षाचा दुजोरा अशा पोरकटपणाला कधीच नव्हता. उलट साहित्यबाह्य म्हणजे जीवनाच्या हेतुने निर्माण झालेले साहित्यच अधिक जीवनवंत अधिक जिवंत आणि समर्थ कलागुणांचा अविष्कार करणारे ठरले आहे असाच कलावादाला लाज वाटायला लावणारा या संदर्भातील इतिहास आहे.

दलित साहित्यातील विशेष मध्यवर्ती मोलाचा वाङ्मयप्रकार म्हणजे दलित कविता होय. दलित कवितेने आधुनिक मराठी कवितेतले तिसरे युगप्रवर्तन सिद्ध केले आहे. पहिले युगप्रवर्तन केशवसुतांच्या प्रतिभेने सिद्ध केले. दुसरे नवकवितेने साक्षात केले आणि तिसरे युगप्रवर्तन स्वत: दलित कविता झालेली आहे. मराठी कवितेच्या स्वातंत्र्यलढ्यातील अंतिम विजय दलित कवितेने सजिलेला आहे. आणि हे स्वातंत्र्य जीवनाच्या सर्व अंगविभागात पोचविण्याचे अपूर्व सामर्थ्य तिने सिद्ध केले आहे. परंतु दलित कवितेने माथी मुकुट म्हणून मिरवावे असे दलितेतर मराठी कवितेत फारच अल्प आहे. हिंदुमनाचा (वि) चित्रबंध तोडून ज्या थोड्या प्रतिभांनी, ज्या थोड्या वेळी मुक्तीची मांडणी केली त्या तेवढ्या वेळी आणि तेवढ्या प्रमाणातच मराठी कविता चैतन्याने शृंगारित केली. तिला गतिमानता लाभली म्हणजे ही परंपरावादाच्या विरुद्ध मराठी कविता ज्या प्रमाणात गेली, ज्या प्रमाणात तिने हिंदुसमाजव्यवस्थेव्यतिरिक्त दुसऱ्या सभ्य समाज-व्यवस्थेचे आग्रह धरले, त्या त्या वेळी, त्या प्रमाणात मराठी कविता प्राणमयी झाली. कविता कविता झाली, देवपथापासून, दैववादापासून जेवढी कविता दूर गेली तेवढी ती कविता होण्यास पात्र ठरली अन्यथा प्रेतांचा शृंगार करायला भाग पाडून मराठी कवितेने 'शब्दसमाजाचा' सूडच घेतलेला आहे.

दलित कविता ही मराठी कवितेच्या इतिहासातील एक अपूर्व व्यवस्था आहे. केशवसुतांच्या प्रतिभेने पूर्ववती कवितेच्या संदर्भात एक अपूर्व व्यवस्था दिली होती. मर्ढेकर आणि मुक्तिबोधादि नवकवींनी

आणखी एक दुसरी व्यवस्था दिली होती. दलित कवितेने मागील दोन कमी अधिक आदरनीय व्यवस्थांपेक्षा वेगळी अधिक मूलगामी म्हणून अपूर्व व्यवस्था दिलेली आहे. ही व्यवस्था जीवनाच्या संदर्भातील अपूर्व व्यवस्था आहे, म्हणून ती कवितेतीलही अपूर्व व्यवस्था आहे. विषमतेच्या अमंगल पूजा बांधणाऱ्या हिंदु विचार-संस्कार व्यवस्थेशी केशवसुतांचे असलेले नाते, मर्ढेकर-मुक्तिबंधांचे नाते सुर्वे-चित्र्यांचे नाते वेगवेगळ्या प्रकारचे आहे. सूर्व्यासारख्या थोर मार्क्सवादी कवीलाही विषमतेची महापूजा बांधणाऱ्या हिंदु विचार-संस्कार व्यवस्थेतील ब्रह्मआत्म्याची नाड तोडता येत नसते आणि ज्या प्रमाणात हिंदुधर्माचा त्याग केवशसुती कवीतेतून साकार होतो त्या प्रमाणात नंतर सूर्व्या-पर्यंतच्या नव आणि पुरोगामी कवीच्या कवितेतूनही साकार होत नाही. आणि ज्या प्रमाणात एखाद्या प्रतिभचे नाते हिंदुव्यवस्थेशी असते त्या प्रमाणात ती प्रतिभा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचीही सभासद असते त्या प्रमाणात ती संघसांगाती असते, संघनिष्ठ असते संघदक्ष आणि संघसंचालीत असते आणि वरील हिंदु विचारव्यवस्थेचा आमूलाग्र त्याग मराठी कवितेच्या समग्र इतिहासात ज्या कवितेमधून प्रथम आविष्कृत झाला त्या कवितेचे नाव दलित कविता असे आहे.

दुसऱ्या महायुद्धानंतर जन्माला आलेल्या तरुणांच्या प्रतिभांनी दलित कवितेची ही क्रांतिकारी घटना सिद्ध केली आहे. दुसऱ्या महायुद्धाने काय सुखदु:खे भारतीय-महाराष्ट्रीय जीवनाला मिळाली(?) असतील ती असोत. दलित कवींना येथील अद्‌भूत समाजवास्तवाच्या संदर्भात दुसरे महायुद्ध ही घटना निस्सदर्भी वाटते. भारताला मिळालेले राजकीय स्वातंत्र्य मात्र या कवींना अनंत संदर्भात चिंतनाला प्रकृत करणारी ठरली आहे. ह्या महाघटनेच्या पोटात अनेक सुसभ्य शक्यतांचे उर्जस्वल गर्भ त्यांनी कल्पिले होते, त्यांना ही महाघटना आईसारखी वाटली होती आणि ही माता त्यांची मातृभूमीची तहानभूक भागवील, असे भव्य भवितव्य त्यांनी कल्पिले होते. तिच्या मायेच्या सावलीत बसून माणसालाच शोभतील अशी अनंत स्वप्ने त्यांनी पाहिली होती. पण ही स्वप्ने पाहण्याचा क्षण त्यांची मने रक्तबंबाळ होण्याचा प्रारंभ

ठरली होती. भीमस्मृतिला झाकोळून टाकणारी मनुस्मृति पुन्हा नव्या जोमाने मनामनातून मोहोरली होती. तिला खतपाणी देणारे मंगल सोहळे सुरू झाले होते कोडगे समाजवास्तव पुन्हा भारतीय अध्यात्माच्या आणि कर्म विपाकाच्या सर्पमाळा गळयात घालून वैदिकतेच्या वैषम्यग्रस्त वसाहती घडवायला नव्या जोमाने निघाले होते. आर्थिक, सामाजिक विषमतेच्या मंगल सोहळयाचे परंपरावाद्यांना पूजनीय असे स्वरूप भारतीय जनजीवाला आले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हा अफाट आदर्श ह्या प्रतिभांना थरारून सोडीत धारधार बनवीत होता. या प्रतिभांचा संवेदन स्वभाव बाबासाहेबांच्या पुराण मूर्तीचे बेडर भजन करणाऱ्या विचारातून आणि कृतिमधून सिद्ध होत होता. या क्रांतीबिरांचे जळजळते रसायन प्यालेल्या या बंडखोर आयुष्याची पलित्यासारखी दाहक प्रेरणा प्यालेल्या या प्रतिभांना धगधगती धार आली. या प्रतिभावंतानी आपल्या मनातील संस्काराच्या नरकाचे गणपती विसर्जन केले. मानसिक गुलामगिरीच्या अन्नावर पोसलेले आणि परमात्म्याचे अंश असलेले विनाशकारी 'आत्मे' आणि हिंदु ब्रह्मांडाचे घटक असलेले 'पिंड' त्यांनी आंबेडकरी विचारांच्या अग्नीत फेकले आणि त्या क्षणाने, मुक्तीने या पृथगात्मतेच्या क्रांतीप्रक्रियेने ही मने कृतार्थ झाली ही मने हिंदू उरली नाहीत. ती नवी, विद्रोही झाली, विज्ञाननिष्ठ, बुद्धिनिष्ठ झाली, निरीश्वरवादी,आत्मवादी झाली. अपूर्व घडले होते. 'नसल्याचे' 'असते' झाले होते. प्रथमतः जगणे मरायचे विसरले होते.

कवी बाबुराव बागूल, ढसाळ, निंबाळकर, दया पवार, डांगळे, चेंदवणकर, सपकाळे, मेश्राम, प्रकाश जाधव, निमसरकार इ. कवी या स्वातंत्र्योत्तरकाळात भोवतालच्या भयाण अस्पृश्यतेची उपाशी पोटाची, नरकाहून भीषण झोपडपट्ट्यांची, लक्तरलेल्या आयुष्याची, बलात्कारिल्या जाणाऱ्या दलितांच्या आयाबहिणींची, तोडल्या–कापल्या जाणाऱ्या जीवांची, जाळल्या जाणाऱ्या गोरगरिबांची नागव्याने काढल्या जाणाऱ्या बायांच्या धिंडीची-अशा लक्षलक्ष अत्याचारांची, अन्यायांची ससंदर्भ स्पष्टिकरणे मागत होते. हे कवी पाहत होते जीवनाचे हे हिडीस रूप आणि हैराण होत होते कोण कोणाला फसवतो

आहे, लुबाडतो आहे, खातो आहे याचे हृदयभेदक देखावे त्यांच्या डोळयांवर या काळच्या निर्दय परिस्थितीने फेकले होते. या सर्व कवींचे बालपण नरकाशी झगडा देतच त्याच्या मीठीतून बाहेर पडले होते आणि आंबेडकरी आंदोलनाची आग पिऊन ही मने पेटत होती. त्यांच्या काळजांना अग्निपंख लाभण्याच्या शक्यता निर्माण झाल्या होत्या. ज्वालामुखी उसळण्याचा काळ त्यांना येवून भेटला होता. भारताबाहेरच्या जगाचीही पावले त्यांना अभय देत होती. इंग्रजी राजवटीने 'भूदान' केले होते. अपूर्व घडले होते आणि (श्रमाचा, जिद्दीचा पाऊस पाडून जळत्या ज्वालांचे पीक घेण्याचे बाकी होते) आणि त्यालाही प्रारंभ झाला. या कवींच्या मनातील लाव्हा कवितेसंबंधीच्या रूढ कल्पनांना धक्के देऊ लागला होता. एक खरी नवकविता साकार होऊ लागली होती. या मनातील कविता प्रस्थापितांच्या पूजेवर विजांच्या पावलांनी नाचू लागली होती. माणसांना वर्णाच्या तुरुंगात सडवणारी त्या आधीची मराठी कविता लजवंती झाली, शरमेने अधोवदन झाली.

हे कवी मनाने प्रथम परंपरागत धर्म–संस्कृतीच्या विखारी मीठीतून बाहेर पडले. त्यांनी प्रथम हे पाहिले की, इथे आपणाला मारण्याची यंत्रणा फक्त जारी आहे. आणि त्यालाच तत्त्वज्ञाने म्हणण्याची प्रथाही पडली आहे आणि त्यांनी या ख्यातनाम सांस्कृतिक संजिताची अग्निपरीक्षा घ्यायचे मुक्रर केले. बौद्धिकतेच्या संदर्भाने या संचिताचा अडाणपणा त्यांच्या लक्षात आला आणि भयानक उपहासाने हे कवी हसले. त्या उपहासाने मराठी कवितेच्या अंतराळाचा चेहरा मेला. दिग्मंडळाला धडकी भरली. ह्या जुन्या जीवनाचे आदर्श कवितेला नरकाची पूजा शिकवितात. ते कवितेला माणसाची होऊ देत नाहीत. देवांची-नरकाची होण्याला भाग पाडतात. विज्ञानयुगाची परिवाणी मर्ढेकरांनी मराठी कवितेला दिली असेल पण विज्ञानाचे मन प्रथम या दलित कवींनीच कवितेला दिले, म्हणून त्यांनी स्वर्ग नरकाचे, देवांचे, चमत्काराचे, बुवांचे बाळसंस्कार प्रथम नाकारले, पुराणातील अज्ञान करंदीकरांसारख्या थोर कवीलाही नाकारता आले नाही. पण नुकत्याच लिहायला लागलेल्या दलित कवीने मात्र ते स्वभावताच नाकारले. या

अपूर्व चमत्काराने मराठी कविता स्वत:ला प्रथमच शृंगारीत होती. हा दलित कवी या समाजाकडे, जीवनाकडे, व्यक्तिकडे नव्या प्रबोधित डोळयांनी प्रथम पाहू लागला. परंपरागत धर्म, कला, नीती, तत्त्वज्ञान यापासून स्वत:ला त्याने माणससंघर्ष करून सोडवून घेतले. भारतीय अध्यात्म म्हणजे जातीयवादाचा, विषमतेचा मॅनिफेस्टो आहे हे त्याने ध्यानात घेतले. आणि प्राचीन अध्यात्म संस्कृती म्हणजे सभ्यतेची प्रेतयात्रा होय हे त्याला दिसले. हे नागडे सत्य त्याच्या मनात वस्तीला आले आणि भारतीय शोषणाच्या भयानक परंपरांचे वस्त्रहरण करण्याचा, त्यांना देहान्त शासन देण्याचा धगधगता संकल्प त्याने सोडला. या संकल्पाची ज्वलंत सिद्धी म्हणजे दलित कविता होय.

जन्मजात सामाजिक विषमता, सांस्कृतिक अत्याचार ह्या दलित कवींच्या मार्न्यांच्या जागा आहेत. आर्थिक वैषम्याचा प्रश्न हा केंद्रवर्ती आहे. आणि आर्थिक शोषणासाठीच अध्यात्म, ईश्वर आत्मवाद यांची योजना आहे समग्र अध्यात्म हे प्रस्थापितांचे शोषणाचे अर्थशास्त्र होय या अर्थशास्त्राने आत्मवाद जन्माला घालून जन्मजात विषमता कायम केली आणि सामाजिक, सांस्कृतिक विषमतांना चिरंतन केले, पवित्र केले. परंतु ह्या भयानक प्रस्थापिताने शोषण केवळच वर्गीय पातळीवर आणून थांबविले नाही. ते वर्णीय पातळीवर नेले आणि ते केवळ वर्णीय पातळीवर नेऊन थांबविले नाही. ते जातीय याहीपुढे ते पोटजातीच्या पातळीवर नेले आणि क्रमाने परिवर्तनाच्या प्रक्रियेची सर्व प्रक्रिया अशा सूक्ष्मासूक्ष्म गाठी मारत नेऊन अशक्य केली. भारतीय शोषणव्यवस्थेची प्रतिभा ही जी अफलातून शोषणसंस्कृती निर्माण करू शकली ती जगाच्या पाठीवर अजोड आहे. तेव्हा क्रांतीची मांडणी करायची तर पोटजातीपर्यंत हे जे पावित्र्याचे प्रताप पोहोचले आहेत ते प्रथम मारावे लागतील. ते मारण्यासाठी त्यामागील तात्त्विक अधिष्ठाने प्रथम उद्ध्वस्त करावी लागतील. आर्थिक शोषणाच्या समाप्तीसाठीच पोटजातीपासून प्रारंभावे लागेल आणि आत्म-ईश्वरवाद, पूर्वजन्माच्या पापापुण्याची मयसभा मांडणारा कर्मविपाक मनामनातून निपटून काढावा लागेल. दलित कवी आर्थिक शोषणमुक्तिलाच केंद्र मानतात. पण त्याकडे जाणाऱ्या पायऱ्याही

त्यांच्या मनात निश्चित आहेत. दलितेतरांना ह्या सुसंगत रास्त पायऱ्या विसंगत वाटतात. कारण त्यामुळे खरेच आर्थिक शोषण नष्ट होण्याची क्रांतीची भीती त्यांना आहे. त्यांच्या मनातील हिंदुत्व त्यांचे स्वाभाविक ईश्वर, आत्मा या सर्वांचा मिळून तयार होणारा परंपरावाद संपुष्टात येण्याची शक्यता आहे. म्हणून जातीपोटजाती कायम ठेवून आर्थिक शोषण संपविणे शक्य आहे असा हिंदुत्वसंगोपक म्हणून विषमतावर्धक विचार ते आर्थिक शोषणाच्या समाप्तीसाठी मांडत असतात परंतु दलित कवींना आर्थिक विषमता संपवायची असल्याने ते ईश्वर कर्मविपाक यावर तुटून पडतात. आणि जे ही शोषणाची अधिष्ठान उध्वस्तून टाकू इच्छित नाहीत त्यांना काय संपवायचे असते काय, जपायचे असते याचाही चांगला प्रत्यय दलित कवींना आलेला आहे.

अजय रामटेके या तरुण दलित कवीच्या ' युद्धाई ' या कविता-संग्रहातही वरील समग्र संवेदनस्वभाव काव्यांकित झाला आहे. अजय रामटेके या माझ्या तरुण कवीमित्राचे नाव आता ' युद्धाई ' या काव्य-संग्रहाने दलित कवितेच्या युद्धनिष्ठ छावणीत सामील होत आहे याबद्दल मी स्वत: या कवीचे अभिनंदन करतो. तरुणाई विजांच्या वाणीने बोलत असते. दलित तरुणाई तर संतप्त विजांच्या वाणीने, अभिव्यक्त होते. अजय रामटेके या कवीच्या तरुण तप्त भावनांचे उसळते कल्लोळ या संग्रहातील कवितेतून साकार झाले आहेत. रामटेके हे ग्रामीण भागातून आलेले कवी आहेत. समग्र बालपण जर खेड्यात गेले असेल तर प्रतिभेतून ते खेडे कधी मावळत नाही. त्यातील अस्पृश्यता,दारिद्रय अज्ञान, लाचारी, सोशिकता, स्थितीशीलता,भाबडा दैववाद या गोष्टीच्या दाहक मुद्रा या बाळपणावर उमटलेल्या असतात. अजय रामटेके यांच्या कवितेत ह्या झरा झुळझुळताना दिसतो. ग्रामीण विभागाशी संबंधीत कवीच्या मानससृष्टीची घडण वेगळी, संदर्भ वेगळे म्हणून शहरी कवींपेक्षा या कवीची कविता प्रकृतीने वेगळी ठरते. अजय रामटेके यांच्या कवितेत त्या वैशिष्टयांचे सर्व ठसे वातावरण आणि अभिव्यक्ति या माध्यमांतून पडलेले आहेत. दलित कवितेचा विचार करताना हा विवेक बाळगायलाच पाहिजे की, शहरी दलित

प्रतिभा ही वेगळ्या पद्धतीने अविष्कृत होते, ग्रामीण दलित प्रतिभा-वेगळ्या विक्रमांनी साकार होते.

कवी अजय रामटेके यांनी आपल्या या काव्यसंग्रहाचे नाव 'युद्धाई' हे ठेवलेले आहे. ते मोठे अन्वर्थक आहे. गोलपिठा, गावकुसाबाहेरील कविता, उत्खनन, कोंडवाडा, दस्तखत ही या पूर्वीच्या काही दलित कवींच्या कवितासंग्रहाची एका प्रकृतिची नावे होती. तर छावणी हलते आहे उत्थानगुंफा ही काही नावे पुढच्या युद्धप्रवासाचे ससूचन करणारी होती. युद्धाई हे या दुसऱ्या वर्गातील गतिमान असलेले नाव आहे. विठाई, ज्ञानाई, गीताई या शब्दांमध्ये येणारी आई एका व्यवस्थेचे, चेतन्यवादी परंपरेचे, प्रस्थापिताचे प्रकाशन करते. ही आई वैदिक व्यवस्थेची देवदेववादी, विषमतावादी मनाची आई, फुल्यांनी-आंबेडकरांनी ज्यांना शत्रू कल्पिले त्या शत्रूंची ती आई आहे. तिचे दूध वैदिकासाठी अमृत होईल पण दलितांसाठी ते वीष होते. पण भीमाईमधील आई परिवर्तनवाद्यांची ठरते. भीमाईत क्रांतीवाद्यांची, उपेक्षितांची, शोषितांची आई आहे. या आईच्या दुधात आग आहे, जाग आहे. युद्धाईमधील आई अशीच क्रांतीवाद्यांची आई होते. भीमाईच्या उच्चारात एका बंडखोर, परंपराभजक, विद्रोही आईच्या पोटी आपला जन्म झाला, तिने आपले संगोपन केले, असे म्हणण्याचा भाव असतो. 'युद्धाई' च्या उच्चारातही हेच अपेक्षित असते. दलित जन्म म्हणजे जगणे, म्हणजे रात्रंदिन युद्ध. शतकानुशतके हे युद्ध सुरूच आहे. मानहानी, दारिद्र्य, अस्पृश्यता ही जगणे हराम करणारी युद्धेच होत. या युद्धाईनेच आपणाला मोठे केले. तीच यापुढे आपणाला अर्थ देणार, मुक्ती देणार, जगणे शिकवणार आहे. तिच्याशिवाय आपले आता कुणी नाही. 'भीमाईच' आता 'युद्धाई' झाली आहे. अटळ असा मुक्तीचा मार्ग म्हणून सगळ्या अनाथांची, शोषिताची आई म्हणजे युद्धाई. अजय रामटेके यांच्या या संग्रहाचे 'युद्धाई' हे नाव मला मोठेच अन्वर्थक वाटले.

अजय रामटेकेचे मन मिलिंदच्या युगप्रवर्तक मातीने पेशी पेटवलेले मन. मिलिंद स्वत:च एक आंबेडकरी आंदोलन आहे. या आंदोलनाची

आग प्यालेले हे मन आपल्या खेड्यातील, घरातील दारिद्र्याने, दैववादाने हवालदिल होते. त्यांच्या मनात कलहाचे वादळ सुटते. आपल्या बापाला, आईला हा कवी उजेडाच्या वाटांचा परिचय करून देतो. आणि चंद्रावर माणूस गेला पण आपल्या भोवतालचा भारत देवाच्या पायरीवरच थांबून आहे म्हणून तो जीव पाखडतो. कधी व्याकूळ होऊन तर कधी उपरोधात पेटत तो या जगण्यावर मुद्रा उमटवितो. आईची अनेक रूपे या संग्रहात आहेत. तिचे काबाडकष्ट आहेत. पोराला शिकविण्याची जिद्द आहे. भूक आहे भाकर आहे. अपमानाचे, तुच्छतेचे पावलोपावली अनुभव आहेत. सवर्णांची थुंका सतत अंगावर येत आहेच. जात आणि दारिद्र्य शिकल्यासवरल्या मुलाच्या मनाचा कसा कोंडमारा करते त्याचे दाहक देखावे या संग्रहात आहेत. हे सर्वच पाठलाग करीत आहे. भोवताल विषमतेच्या वणव्यात जळत आहे म्हणून हा कवी आपल्या आयुष्याला बुद्ध, फुले, आंबेडकर यांच्या ध्येयाची दीक्षा देतो.

मला व्हायचं एक माणूस
नव्या पिढीची
नवनिर्मिती करण्यासाठी
(मला व्हायचं एक माणूस)

त्यासाठी त्याला दुसरा पुढचा ध्येयवाद पहिल्या ध्येयवादाच्या सिद्धीसाठी मांडावा लागतो तो म्हणतो—

मी ईश्वर हटाव मोहीम सुरू करणार आहे.
(प्रेतयात्रा)

या अद्‌भूत समाजात उजेड जगू शकत नाही. आणि माती दलितांना प्रकाश देण्याचे टाळते तेव्हा पृथ्वीलाच तेजवंत करण्याचे भव्य क्रांती कवी बोलून दाखवितो आणि त्या त्या स्वप्नसिद्धिचा शिल्पकार म्हणून दलितांवर जबाबदारी सोपवितो तो म्हणतो—

आपण सर्व मिळून
या पृथ्वीलाच प्रकाशमान
करायचे आहे

या देशात
कोमजतो ' सूर्य '
फुलासारखा
म्हणून हे दलिता
तू सूर्याला पांघरुण घाल.          ( सूर्य )

मराठवाडा, बेलछी, नागपूर, धाकली, ब्राह्मणगाव अशी दलितांवर अमानुष अत्याचार झाल्याची अनेक उदाहरणे या कवितासंग्रहात आहेत. मराठवाड्यातील हत्याकांडाचा जळता धागा काही कवितांत स्पष्टपणे जाणवणे अत्यंत रास्तच आहे. या प्रतिक्रांतीला उद्देशून I have no homeland या बाबासाहेबांच्या महावाक्याची, महाकाव्याचे बीज पोटी वागवणाऱ्या त्या युगवाक्याची आठवण व्हावी या जळत्या जाणिवेने कवी म्हणतो–

हिच का माझी मातृभूमी ?
हेच का स्वातंत्र्य ?
हीच का समता ?
हाच का समाजवाद ?
हीच का लोकशाही ?

येथील शब्दखोरांच्या, दंभेश्वरांच्या, शोषक शेखरांच्या परस्परांना संस्कृतीस अधोवदन करणारे प्रश्न टाकतो हे प्रश्न अश्रूही,अंगारही आहेत या प्रश्नांमध्ये दुःखाच्या लक्षलक्ष कविता आहेत, यातनांचा सविता आहे.

' युद्धाई 'हा रामटेके यांचा पहिला संग्रह. त्यात भावनांची आग शब्दात भरताना गोंधळ उडतो आहे.सगळा लाव्हा मांडताना कधी शब्द उजळल्या मनाने साथ देत नाही म्हणून प्रारंभीची धडपड ठिकठिकाणी दिसते सरळ सोंड असे रूप तिला येते. तरी या कवितेत हृदयाची सच्ची तळमळ, प्रामाणिकपणा आहे. दलित कवितेच्या प्रमुख अशा विजांच्या महानदीच्या आशय आणि रूपवैशिष्ट्यांशी ती आपला अनुबंध प्रस्थापित करते.

या प्रारंभ काळात यावा तसा अनुकरणाचाही भाग इथे आहे. पण हे अनेकदा स्वभाविकही असते. पण अंकुर, रात्र, शोध, नकार,

काळीज, सूर्योदय, सावध रहा इ. कवितांमधून कवीने स्वत्वसंशोधनाच्या ज्या सूचना सजिल्या आहेत त्यावरून हा कवी स्वतंत्र कवितांची समर्थ सृष्टी नक्की उभारू शकेल असा विश्वास वाटतो.

ही कविता डोळस आहे. बुद्ध, फुले, मार्क्स, आंबेडकर यांचे डोळे तिला लाभले आहेत आणि एक क्रांतीने झपाटलेले मन अनंत अंगांनी या संग्रहात फुलले आहे. नुसतीच आग यात नाही. अश्रूंही आहेत. व्याकुळ मन आहे. पीळ आहेत, पेच आहेत. कालच्या अंधाराचे सलते संदर्भ आहेत. वर्तमानासंबंधी आक्रंदन आहे आणि उद्याच्या सुसंस्कृत, सुंदर जीवनाचे स्वप्नचित्रण आहे. तो म्हणतो–

(१) पण माझ्या
सांडलेल्या रक्तातून
असंख्य माणसे निर्माण होतील
अन् मानवमुक्तीसाठी
विवेकाची तलवार, समतेची ढाल घेऊन
स्वातंत्र्याच्या रणमैदानावर लढतील
उद्याचा इतिहास घडविण्यासाठी – (प्रकाश)

(२) आजचे सारेच रस्ते
उद्याच्या क्रांतीची होणार आहेत रणमैदाने (सावध रहा)

(३) दलिता दलितांनी
दलिता दलितांसाठी
दलिता दलितांचे
हातात हात धरून
क्रांतीगर्भ पोटात धारण करून
मुक्तिलढ्यास सुरुवात केलीच पाहिजे
– – – माझ्या तलवारी प्रसवणार आहेत मानवता
मी तलवार घेऊन निघालेलो आहे
तुम्हीही माझ्या पाठोपाठ यायलाच पाहिजे (सावध रहा)

माझ्या जिवलग कवीदोस्ता लिही मस्त. 'दलिता दलितांनी' म्हणजे सुंदरच. तुला दिशा गवसली आहे. थोर महामानवाचे ध्येय तू उरात

घेतलेले आहेस. तू महाकविताही लिहू शकतोस. एवढी माझी शुभेच्छा घे आणि थांबू नकोस, लिहित राहा. तुझ्याही हातून क्रांतीच्या महाकवितेची काही कांडे लिहिली जाणार आहेत. लिहित रहा. लिहित रहा.

**युद्धाई : अजय रामटेके**

# नव्या संस्कृतीचा गर्भ वागविणारी कविता

लोणे,कवितेसंबंधी माझी काही एक समजूत आहे. ती अनुभवांनीच मला दिली आहे. जखमेतून रक्त यावे तशी आयुष्यातून कविता यावी, डोळयांना आसवांच्या धारा लागाव्यात तशा शब्दांना कविता लागाव्यात कवितेने प्रथम रक्तामांसाच्या चिखलाचे सूक्त गावे. प्रथम कवितेने माणसाच्या होळीवर पावसाचे महाकाव्य रचावे. मेलेल्याच्या सरणावर प्रतिभेची फुले उधळण्यापेक्षा जगणाऱ्याच्या मृत्यूवर हुंबरडा फोडणाऱ्या प्रतिभेचे सार्थक झाले असे समजावे. ईश्वर आणि त्याचे पहारेकरी यांना वाचवण्यासाठी अनेक अमानुष प्रतिभांनी पराक्रमाची शर्थ केली. पण मृत्यूशिवाय इतरच कारणांनी मरणाऱ्या अनंतानंत माणसांसाठी प्रतिभेचा तलवारीसारखा उपयोग करणाऱ्यांच्या परंपरेत समर्थ वीरांची संख्या कमीच आहे. तुम्ही त्यापैकी एक आहात हे मी प्रथमच नोंदविणे आवश्यक समजतो.

पण कविताही'लागायला'हवीच बाण लागतो तशी. चुटपुट लागते तशी, बंदुकीची गोळी लागते तशी. आईच्या मायेची ऊब लागते तशी. फळे लागतात तशी. डोहाळे लागतात तशी. . .कविता लागायलाच हवी.

समाजाचे एक व्यक्तिमत्व असते. त्या व्यक्तिमत्वातील सुखांमध्ये कोणीही सहभागी होईल. त्यातील छंदफंदात कुणी स्वत:ला नशेत झोकून देईल. पण त्या समाजाच्या अशब्द–सशब्द दु:खात वाटेकरी होण्याचे, त्या दु:खाचा निरास करण्याचे शुभमूल्य परंपरेचे आपले व्रत आहे. जोवर दुसऱ्या कुणी तरी लादलेल्या दु:खाखाली माणसे चिरडली

जातच आहेत. तोवर आपल्या कवितेला सुखाचा श्वास घेता येणे कठीण आहे तो अपराध तिच्या हातून घडणे असंभव आहे. तापल्या तव्यावर उभे असलेल्याला ' आनंदी आनंद गडे ' किंवा ' मी आनंदयात्री ' असे म्हणता येणे कठीण आहे. बेलशीत सगळे जळायलाच हवे असे नाही, पण ते जळते जीवन पाहून मनालाही आग लागत नसेल तर माणुसकीचे बेवारस मढेही जळून गेले आहे, असे निश्चयाने समजावे.

सृजन शक्तिची पावले बुद्ध-आंबेडकरांनी सूचित केलेल्या दिशेने पडत असतील तर ही सृजन शक्ती केवळच तेजोवर्धक कवितेचे सर्जन करीत नसते तर नव्या सुंदर संस्कृतीचेही सर्जन करण्याच्या प्रतिज्ञासुद्धा पेरून ठेवीत असते.

लोणे, तुमची कविता वेदान्ती नाही. वेदान्तक आहे. भेदान्तक आहे. शुभमूल्य परंपरेची ती पाईक आहे. म्हणून नव्या सुंदर संस्कृतीचा गर्भ कुशीत वागविण्याचे बुलंद सामर्थ्य तिला लाभले आहे. त्यावर हक्क सांगण्याचे बळ तिला प्राप्त झाले आहे.

' रडू नको तर काय करू ' हे साधे शब्द त्यामुळेच जिवंत होतात. वाचकाला ते कारुण्याच्या लावण्यात भिजवून आणतात. हृदयाची शोकसभा करतात. तुमच्या जवळ मर्मग्राही प्रतिभा आहे. ती प्रदर्शन मांडीत नाही तर मर्मदर्शन घडविते. पोरखेळात खेळण्यात तुमच्या न्यायमनस्क प्रतिभेला स्वारस्य नाही. तिचे आव्हान दुःखसागराला आहे. अन्यायी अनंताला आहे. ज्यानी क्रांतीचे अंकुर नष्ट केले त्यांची याद बंदुकीच्या गोळीसारखी उरात सलवत तुम्ही कविता लिहता म्हणून एक विलक्षण धग, एक जागती बोच तुमच्या कवितेत साक्षात होते. ' राहता राहिले ते बेबीच्या, संस्कृतीच्या देठातून बोलू लागले ' त्यांचे साहित्यच नव्या युगाचे बाळ खांद्यावर घेऊन क्रांतीच्या प्रवासाला निघालेल्या बापासारखे साहित्य होय, दलित साहित्य होय. ' तुझ्या आयची ' मध्ये एका काळोख्या इतिहासाचे स्वभावचित्रण आहे. न्यायमनस्कता हा तुमच्या कवितेचा मर्मबिंदु आहे. पण तरी तुमची कविता काव्याला पारखी असलेली गद्य घोषणा होत नाही.

'घुगऱ्या' या कवितेतील वास्तव मोठे स्फोटक आहे. चोथ्या-सारख्या समाजात, तुमचा जन्म झाला हे मोठ्या कलासंपन्न रीतीने तुम्ही सांगून जाता. या कवितेतील निषेध, तिच्यातील घुगऱ्यांची, चाटूची, फडक्याची आठवण तुमच्या अस्तित्वाला सतत चावे घेते. हे जसे एका अर्थी जिवंत कलावृत्तीचे लक्षण आहे तशी तिच्यातील काळाच्या मानेवर सुरी ठेवण्याची प्रतिज्ञाही क्रांतीवृत्तीचे लक्षण आहे. कलावृत्तीच्या आणि क्रांतीवृत्तीच्या या सुरम्य मीलन सोहळ्याने तुमच्या कवितेला सौंदर्य आणि शूरत्व बहाल केले आहे. अलीकडे लिहायला लागलेल्या अनेक कवींच्या प्रतिभांपेक्षा तुमच्या प्रतिभेची लय स्पष्टपणे वेगळी आहे. तिची प्रकृती वेगळी आहे यातूनच शुभ परंपरेशी इच्छा असो नसो आपले इमान बांधले जाते. जाणता अजाणता आपले प्रबोधनाशी गोत्र निश्चित होऊन जाते आणि न्यायाशी, शुभसंस्कृतीशी, प्रबोधनाशी आपले गोत्र निश्चित होऊन जाते आणि न्यायाशी शुभसंस्कृतीशी आपली गोत्रणूक सिद्ध होते . . . तेव्हा तुमचे अनुभव म्हणजे एका गतिवादी मनाचे अनुभव जगभरच्या जिवंतांशी त्यांचे नाते आहे. क्रांतीशी त्यांचे सोयर आहे. तुम्ही अनुभवाला, आयुष्यालाच विचारावे. गतिवादी जगण्याला विचारावे. त्यांनी दाखवलेल्या वाटाच, सांगितलेले रस्तेच श्रेष्ठ कलेकडे आणि उच्च जीवनाकडे जात असतात. असो. तुम्हाला असे रस्ते गवसावेत ही नम्र सदिच्छा.

**घुगऱ्या : बु. मो. लोणे**

# पालवीच्या रंगाची मैफिल...

---

कवी विशाल भिकाजी ओव्हाळ यांच्या कविता वाचल्या. या संग्रहात काही गेयरचना आहेत काही मुक्तछंदातील कविता आहेत. श्री. विशाल ओव्हाळ यांना काव्यलेखनाची आवड आहे. जीवनाच्या व्यापापासून वेळ काढून ते आपल्या या छंदात रमतात. आणि त्यांना आपल्या छंदाचा आनंद वाटतो. आयुष्यात अनेक मार्गांनी मिळणाऱ्या

सुखापेक्षा या काव्यलेखनाच्या छंदामुळे त्यांना एक निराळा आनंद होत असावा. या आनंदासोबत चार घटका जगता यावे यासाठी ते या छंदाच्या कुशीत शिरतात इथे त्यांना शब्द आणि स्वर यांचे संयुक्त गायन ऐकायला मिळते त्यातून त्यांची कविता जन्माला येते.

या संग्रहात गीतरूप रचना पुष्कळ आहेत आणि सर्वच रचनांवर प्रेमाच्या विविध छटांची प्रभा सांडली आहे.

' भाव व्यक्त करावयाचे अंतरीचे गीत मला गावयाचे '

. . . मानवतेचे खंडकाव्य अखंड गावयाचे

अशी या कवीची प्रतिज्ञा आहे.

प्रेमकाव्याच्या या दालनात कवी विविध भाववृत्ती मांडतो

' मधु मिलनाच्या स्वप्नी तरंगून जावे
निळ्या मेघांच्या रानी विहंगावे '

असे स्वप्नचित्र तो काढतो. अशी त्याची प्रेयसी आहे आणि " आठवणीत तुझ्या काव्य स्फूरते " असे स्थान तिला त्याच्या काव्य-जीवनात आहे. एवढेच नव्हे तर कवी असेही म्हणतो की–

" तुझ्याच स्मरणे स्फूर्ती जागली
तूच कविता स्वतःच झाली. "

अशा स्नेहसहवासात त्याला " अखंड तृप्तीतही अतृप्तच राहावे " असे वाटते. या कवितेत प्रेमाच्या कधी आठवणी येतात. मिलनाचे चित्र येते तर कधी स्वप्ने येतात. कधी हुरहुर येते. तर कधी समाधानाचा गोडवा या कवितेतून साकार होतो. जेव्हा त्याचे प्रेम दुःखात उभे असते तेव्हा तो

" गीत गातो असे भरलेल्या स्वरात " असेही घडते.

जीवनाचे चिंतन काही कवितांमधून कवी करतो.

" कुणीतरी आधार द्यावा "

असे त्याला वाटते पण–

" फाटलेलं वस्त्र जोडायचं असतं.
निकामी शस्त्र फेकावयाचं असतं. "

असे जीवनाचे स्वरूप असते. कधी तर–

" इथे चांगलेही जीवन जगणे कठीण
रोजी रोटीसाठी भटकतोय दीन. "

हे कठोर वास्तव त्याला घायाळ करते. येथील विषमतेने कवी व्याकूळ होतो. " भारतमाता " या कवितेतही त्याची यातना मुखरीत होते. आणि " उद्याचा भारत " या कवितेतून केवळ माणसांच्या आकृत्या दिसतील असे त्याला वाटते. देशातील सर्व लोकांनी मानवतेचा लढा लढायला हवा असे तो कळवळून म्हणतो. आणि नव्या तरुण शक्तीला तो

" तुझ्याचसाठी वाट तुझी असाच जा पुढे "

असे आवाहन करतो. समतेचे व मानवतेचे गाणे सर्वांनी गायला हवे. आजच्या भारतीय मनांना हा कवी असाच मानवतेचा संदेश पुढील ओळीतूनही देत आहे.

" भल्या मानवा निद्राधीन का झालास
जागा हो अर्थहीन रूढी खोडायला
समता, बंधुभाव, माणुसकीच्या बिया
हव्या तुला रोपाया. "

सर्वच माणसे धरतीची लेकरे आहेत. सूर्य, चंद्र धरती सर्वांचीच आहे, सर्व सर्वांचे असावे असे कवीला वाटते ते महत्त्वाचे आहे.

या कवितासंग्रहात काही बालगीतेही आहेत. " दोन महात्मे ", " लपाछपी " व " पाऊस गारा " ही ती गीते होत. ही गीतेही चांगली आहेत.

अनेक कवितांमधून कवीच्या मनातील श्रद्धाभाव,त्याचे आदर्शपुरुष, त्याचे जीवनादर्श यांचे दर्शन घडते. जीवनाची गूढता ही त्याला त्रस्त ठरते. आसमंतात तिमीर दाटतो आहे असे त्याला वाटते आणि उडत्या पाखरासोबत आपणाला सैरावैरा उडायला मिळावे असे त्याला वाटते.

श्री. विशाल भिकाजी ओव्हाळ यांच्या कवितेतून ओव्हाळ यांचे कवीमन असे व्यक्त होते. त्याला अनेक पदर आहेत. अनेक पापुद्रे त्याला आहेत. एका व्यक्तित्वाचे विविध रंग या कवितेतून व्यक्त होत आहेत.

श्री. ओव्हाळ यांना काव्यलेखनाचा छंद आहे. तो छंद त्यांना आनंद देतो हे मला महत्त्वाचे वाटते. त्यांचे मी या संग्रहाच्या निमित्ताने अभिनंदन करतो. या कविता प्रकाशित करावयाच्या आधी त्या एखाद्या जाणकाराकडून शुद्धलेखनाच्या दृष्टीने तपासून घेतल्या असत्या तर बरे झाले असते. पालवीच्या रंगांची मैफिल अधिक चांगली झाली असती.

पालवीचे रंग : विशाल ओव्हाळ

# आंबेडकरवादी कवितेतील सिंहनाद

कवी हृदय चक्रधर यांचा हा पहिलाच काव्यसंग्रह ! नव्या कवींमध्ये हे नाव चांगलेच परिचित आहे. १९७७ मध्ये आसवांनी त्याच्या मनात कवितेचे घर बांधले. त्यावेळी या घराचे तोंड वेगळ्या दिशेला होते. आज ते आंबेडकरदिशेला वळलेले आहे. मधल्या काळात कवीच्या भावजीवनात आमूलाग्र उलथापालथ झाली. या कवीच्या मनाची रंगभूमी आणि संस्कृती बदलली. त्याची प्रतिभा पूर्वी त्याच्या समाजनिरपेक्ष मनापुरतीच होती. आता निर्वाणीच्या समाजसंदर्भांनी ती गुलमोहोर पेटावा तशी पेटली. हे स्थित्यंतर त्याच्या जाणिवेची दिशा बदलून टाकणारे मुलगामी स्थित्यंतर होते. त्याने कवीला सर्वस्वी निराळ्या आकलनाकडे नेले. या बदललेल्या काळजाची किंवा या जागृत कवीस्वभावाची अनेक उत्कट स्पंदने ' भुकेची भूपाळी ' या कवितासंग्रहात आलेली आहेत. ही स्पंदनेही अर्थातच मोठी विलोभनीय आहेत. कवीच्या पुढल्या निर्मितीविषयी तीव्र आतुरता वाटावी इतकी ती आश्वासक आहेत. ' भुकेची भूपाळी ' या काव्यसंग्रहाला प्रस्तावना लिहिताना एका दमदार आंबेडकरवादी कवीचे स्वागत करण्याचा आनंद मला मिळतो आहे.

१४ एप्रिल १९९१ रोजी म्हणजे बाबासाहेब आंबेडकरांच्या शंभराव्या जन्मदिवशी या कवीने आपल्या घरामध्ये बाबासाहेबांच्या

छायाचित्राचे अनावरण करायचे ठरवले आहे. अर्थात फार पूर्वीच तो घरच्या महानुभावीय वातावरणातून बाहेर पडला होता. बाबासाहेबांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने आता तर त्याने आपले घरच आंबेडकरमय करून टाकले. तो प्रकटपणे आता आंबेडकरवादी झाला.

झोपडीत राहणाऱ्या या कवीला फार पूर्वीपासूनच मी जवळून ओळखत होतो. एक लाजरा-भित्रा मुलगा मी त्याच्यारूपाने अनेक वर्षे पाहत आलो. पूर्वी तो आंबेडकरवादी विद्रोही कवींमध्ये क्वचितच मिसळायचा. त्यावेळी त्याचे कवीमित्र वेगळेच होते. त्याचे विश्व आणि भावविश्वही वेगळेच होते. केवळ रस्त्यांपासूनच तो दूर नव्हता तर गरीब असूनही गरिबांच्या वस्त्यांपासूनही तो दूर होता. 'समाजरचनेत' कणभरही आस्था नसलेला हा कवी त्या काळात 'काव्यरचनेत' मात्र खूपच दंग असायचा. पण क्रमाने त्याच्या मनावर होणाऱ्या घावांचे चिंतन करताना त्याच्या लक्षात आले, आपण जन्माला आलो ती समाजरचना अमानुष टोकाची आहे. तिच्याकडे पाठ फिरविणे म्हणजे स्वत:च्या जखमांकडे पाठ फिरविणे होय, आणि स्वत:च्या मनावरील जखमांकडे पाठ फिरविता येणे शक्य नाही. अटळपणे कवीला समाजरचनेत शिरावे लागले. यावेळी त्याच्या लक्षात आले की या समाजरचनेच्या बाहेर उभे राहून मोठी किंवा खरी कविता तर सोडाच पण निदान काही अर्थ असलेली कविताही कोणाला लिहिता यायची नाही. आणि हा कवी वस्त्यांच्या प्रश्नांने बोलणे ऐकू लागला. त्याने स्वत:ला समाजाच्या मध्य-धारेत नेले. तो आंबेडकरवादी झाला आणि त्याने स्वत:ला अर्थपूर्ण करून घेतले. अधिक युगीन, अन्वर्थक व अचूक करून घेतले. कधीतरी या कवीने आंबेडकरवादी कविता ऐकली आणि तो स्वत:ची आंबेडकरवादी कविता आता ऐकवू लागला. आग पाहायला गेला व आग झाला. आंबेडकरवादी कवितेत आपली समर्थ कविता घेऊन येणाऱ्या हृदय चक्रधरचे स्वागत करताना वरील सर्व पार्श्वभूमी माझ्या डोळ्यापुढे तरंगत आहे. म्हणूनच या कवीचे स्वागत करताना मला विशेष आनंद होतो आहे.

'भुकेची भूपाळी' मध्ये एका मूलगामी स्थित्यंतराच्या सीमा-रेषेवरची कविता आहे. ही सीमारेषा ओलांडणारी कविताही मोठ्या

प्रमाणात या कवितासंग्रहात आहे. संधिकालातील आणि संधिकालोत्तीर्ण अवस्थेतील कविता ही या संग्रहात आहे. या कवितासंग्रहातून व्यक्त होणारे कवीचे व्यक्तित्व अनेक शाखापल्लवांचे झाड असावे तसे आहे. या कवीमनाचे अनेक पदर या 'भुकेची भूपाळी'मधून उलगडतात.

प्रेम हा असाच एक आसवांनी भिजलेला या कवीच्या व्यक्तित्वाचा पदर! सुमारे सोळाएक कवितांमधून प्रेमाची कडूगोड चित्रे रेखाटलेली आहेत. 'चेहरा', 'चाहूल', 'वसंत' या कवितांमधून प्रियकराने प्रेयसीजवळ केलेली लाडिक आर्जवे आहेत. प्रियकराच्या मनातील स्वप्नावर यावेळी प्रेयसीची मालकी आहे. अजून प्रेमभंगाचा वणवा दूर आहे त्यामुळे–

" विसरू नकोस आता वचने दिलीस जी तू
त्यांना इथे पुरेसा विश्वास दे सखे तू. "

असा 'विश्वास' तिच्याकडून मिळण्याची यावेळी आशा आहे. त्यामुळेच–

" आज मोहरून जायचे
तू प्रभंजनात ने मला, "

अशी कळकळीची सुंदर मागणी आहे. या प्रेमाची मागणी, हुरहूर, विरह ही मर्यादा आहे. ही सर्वच फुलवण मानसिक पातळीवरील आहे, पण हा चंद्रऋतु फार काळ टिकत नाही. यानंतरची हृदयाची प्रेमकविता–

" ऐक आसवांची माझी कहाणी. "

अशाच आर्त आणि हवालदिल शब्दांमधून बोलते.

" तेव्हा तू मला हवीशी वाटत होतीस
आणि मी सुद्धा तुला !
आकाशात झेप घेताक्षणीच
मी पंखहीन झालो
मृगजळाप्रमाणे तू भुर्कन उडून गेलीस
मी मात्र बघतच राहिलो ! "

नंतर ' उद्ध्वस्त या फुलांना ' बेवारस व्हावे लागते. " प्रेमही दुभंगले, कोणत्या स्वरात हे प्रेमगीत गायचे " असा मोठा उदास प्रश्न कवीला पडतो. अधूनमधून ती भेटते पण ' भेटलीस भेटल्या न सारखी ' अशी, आता घडायला लागते ते हे–

" ही रडाया लागली या आसवांची रोषणाई "
आणि " सांचतो मी ऊर माझे डोळियांच्या चांदराती. "
" जुळती किती मनांच्या तारा तुटावयाला. "
" निष्पर्ण जाहलेली पाहून वृक्षवेली "
" का लागते कळेना डोळे भिजावायला "

आणि कुठलातरी नाईलाज शेवटी–

" पूस डोळे गडे तू, दोष नाही तुझाही. "

असे त्याला म्हणायला लावतो.

या संग्रहात ' निशाणी ', ' प्रणयभंग ', 'रूपरंग' आणि 'कळा' या चार 'नाट्यगझला' आहेत. त्यातील दोन अत्यंत सुंदर आहेत.

" गगनापल्याड का रे गेलास एकला तू
येथे तुझ्याविना मी मरते अजून आहे, "

याप्रकारे या चारही नाट्यगझलांमधून प्रेयसीच्या मनोभूमीकांचे नाट्य कवी चितारतो. या कवीच्या प्रेमकवितेचे वैशिष्ट्य–

" गझल गायची तर गा अंतरीची "

या त्याच्याच शब्दात सांगता येईल– आणि अंतरीचे काही असल्याशिवाय कवितेला काहीही अर्थ नसतो. हृदय चक्रधरने आपल्या प्रेमाच्या अनुषंगाने अंतरीची गझल गायलेली आहे आणि विशेष हा की या प्रेमभंगातूनच त्याला स्वत:कडून युगाकडे जाण्याची वाट सापडलेली आहे.

" प्रीती दुभंगल्याचे उपकार एवढे की
तू जीवनी सजावे युगगीत मी लिहावे "

या ओळींतील ताकद लक्षणीय आहे. सहजी कानावर न पडणाऱ्या या ओळी हा कवी सहज लिहून गेला आहे. दु:खे माणसाला अधिक उन्नत जगणे देतात. मोठी ध्येये देतात. हा कवीही प्रेमभंगाचे उपकार मानतो; कारण या घटनेने, या दु:खाने त्याला युगगीत गाण्याची संधी दिली, प्रेरणा दिली.

काही कवितांमध्ये ' कवी ' आणि ' शब्द ' यांच्याबद्दलचे चिंतन कवी मांडतो. कवी शब्दात हसतो, शब्दात रडतो. ' मी सत्य बोलली तर मारले जगाने ' हा अनुभव घेतो. शब्दहीन वेदना अर्थापर्यंत पोचत

नाही; म्हणून 'सांगण्यास मी व्यथा अक्षरात चाललो' असे तो म्हणतो आपली आसवांची कहाणी तो अक्षर शब्दसांजेतून सांगतो. 'कोणत्या शब्दात सांगू ही कहाणी' असा प्रश्न पडतो, तेव्हा आसवांवर तो स्वरांचे आणि शब्दांचे कार्य सोपवितो.

"आसवांनो ! गा तुम्ही या दुःख बंजारा मनाचे
संकटांनी गायिले रे गीत माझ्या जीवनाचे"

सुखे माणसाला सही रूपात व्यक्त करीत नाहीत. जीवनाचे खरे गीत संकटाच्या मुखांनीच ऐकावे लागते. यातनाच कवितेला खरे कवितापण देतात असे सांगणारा हा कवी 'वेशीवरी सुखाच्या' या कवितेतून कवीची जळण्यातून उजळणारी महाप्रतिमा उभी करतो. आसवेच दुःखात कवीचे घर बांधतात. पाऊसच ग्रीष्मात त्याचे घर बांधतो.

"वेडावले जगाने मरणापल्याड जगता
झुंजार संकटांनी घर बांधले कवीचे"

असे घरच पक्के असते. वादळे आली, भूकंप झाले किंवा कोणी ते पाडण्याचा प्रयत्न केला तरी ते 'अक्षर' राहते. हे खरे तर कवीच्या अक्षरत्वाचेच सुंदर चिंतन आहे.

उरलेल्या सर्वात जास्त कविता सामाजिक जाणिवेच्या आहेत. कवी या कवितांमधून त्याच्या वाट्याला आलेल्या भोवतीच्या जगाचे चित्र काढतो. या चित्रात आपल्या सामाजातील अमानुषता तर तो परोपरींनी मांडतोच, पण परिवर्तनाला सामोरा जाणारा, समतेसाठी धडपडणारा, मोर्चाही तो पाहतो आणि स्वतः या मोर्चात सामील होतो. असे करून एका बाजूने त्या मोर्चाचा गौरव करतो व दुसऱ्या बाजूने स्वतःलाही उचित करून घेतो. त्याच्या वाट्याला मोठे निर्दय जीवन येते. 'दुनियेत इज्जतीच्य विकतात आबरू ते, प्रत्येक ग्राहकाला व्यापार पसंत आहे', 'आश्रयास जाता विकलेच मला त्याने', 'मी कोणत्या सुखाची येथे करू अपेक्षा', 'एकेक हुंदक्याला हिणवून लोक गेले', 'जरी जन्म गेला शहाण्यात माझा,' छळणेच भोगले मी दिलदार जिंदगीचे' पण छळवाद झेलणारा हा कवी जीवन नाकारीत नाही तर–

"फुले वेचता बोचती काटे तरी हर्ष लाभे तुझ्या वाटे"

असा जीवनाचा स्वीकार करतो. 'मनोरमं जिवितं मनुष्याणाम्' असेच बुद्धाने म्हटल्यानुसार त्याला वाटते.

" या दुःखमय जगाने बुद्धास बोध केला
प्रज्ञा प्रकाशताना ज्ञानास मी स्मरावे "

ही जाणीवही त्याला आहे.

पुढे कवी त्यांनी 'दुःखितांच्या ह्या घरांना लावलेली आग . . .', सामूहिक बलात्काराची शिकार झालेली 'ती', आणि जातीय दंगलीने पेटणारे राष्ट्र पाहतो आणि त्याला प्रश्न पडतो –

" हे राष्ट्र माणसांचे की जातपारख्यांचे "

आणखी सुंदर ओळींमधून या समाजातील भीषणतेची चित्रे कवी काढतो. 'पहा आपला गाव पेटलारे', हे कसे गाव अन हे कसे लोकही, बांधवांची घरे पेटवू लागले. या गोष्टी आणि गरिबीमुळे आपल्याच मुलीच्या यौवनाचा सौदा करणारा बाप, राजकारणाच्या बंदुकीतून येणारी महागाईची गोळी आणि–

" का कागदी फुलांनी सजतात लोक येथे
बेसूर रोज गाणी गातात लोक येथे "

हे आणि खोटीच धर्मनीती जपणारे इथले लोक पाहून तो हैराण होतो. 'जरी हाक सूर्यास त्यांनी दिली, प्रकाशास ते घाबरू लागले' असे भित्रे लोक त्याला संतप्त करतात व हे सर्व बदलावे यासाठी तो 'आक्रोश' मांडतो.

"अन्याय सोसण्याचा काळ सरणार केव्हा"
" हृदयात माणसांच्या सत्य बसणार केव्हा"
"राष्ट्रीय एकतेने राष्ट्र फुलणार केव्हा"

असा त्याचा जीव तगमगतो. तो राष्ट्र जोडायला निघतो. 'मारावयास आले जे लोक शस्त्रधारी, मी अंतरास त्यांना जोडायला निघालो.' यातून कवीच्या डोळ्यात नवे क्षितिज तरळू लागते.

" जीवनाला हसू नये जात माझी पुसू नये. "

या ठिकाणाहून त्याला आता आंबेडकर – फुले यांच्या मशाली नाकारणे, ऐक्याच्या गोधडीच्या चिंध्या करणे, नेत्यांचे पांगणे, काहींचे सत्तेत उष्टे खाण्यात रंगणे ही दुःखाची कारणे दिसतात आणि–

" सत्तेने कोणताही सूर लावला तरी
भुकेची भूपाळी गाता येणार नाही "

हे सत्तेचे लक्षण त्याला कळलेले आहे. ' ह्या पेटवी मनुला वणवा निरीश्वराचा, असली विचारक्रांती समजून पाहिली मी' आणि 'जगच होते आहे आंबेडकर ' या जाणिवेने तो स्वत:ला धार लावीत जातो. ' जयभीम गर्जनेने हे रान-झाड पेटते ' या दर्शनाने त्याच्या आयुष्यात आता समतेची लढाई सुरू होते, आणि–

"माझ्यासवे भुकेशी लढतो समाज आहे "

याप्रकारे ती महारूप धारण करते. ही ' भुकेची भूपाळी ' झोपलेल्या भुकेकंगालाच्या दु:खांना आणि त्यांच्या मनातील ठिणग्यांना आळवीत आहे. क्रांतीला जागवीत आहे. स्वत:च्या माणुसकीला आणि प्रतिभेला कवीने युगाच्या घुमश्चक्रीत उभे केले असून तो आता मुळाला भिडलेला आहे. प्रस्थापित समाजाच्या उलट्या काळजालाच त्याने हात घातलेला आहे.

हृदयाची कविता रस्त्यावर आलेली आहे. ती वस्त्यांच्या प्रश्न-कल्लोळात शिरली आहे. गुलामीचे अलंकार निर्माण करणारे कारखाने आणि हे अलंकार गर्वाने धारण करणारा विराट समाज यांच्या संबंधाच्या मध्यधारेत हा कवी उभा आहे. याप्रकारे कवीने स्वत:ला सही साबीत केले आहे.

कवीच्या या युगीन मनाची अनंत अस्वस्थ स्पंदने, त्याच्या जखमा, त्याचे आक्रंदन, त्याची कुंठा आणि आंबेडकरवादाने चेतवलेला नवा माणूस जन्माला घालण्याचा ध्यास या सर्व कळांचा अत्यंत प्रभावी आविष्कार ही कविता करते. ही कविता म्हणजे कवीच्या ' अंतरीची गझल ' आहे. ' माझ्याच आसवांचा मी कोरला अजिंठा ' अशी ही कविता आहे.

१. "मी सत्य बोललो तर मज मारले जगाने
आता जिवंत माझा एकेक बोल आहे."

२. "संतापलो असा की धरती थरारते ही
गगनी झपाटलेला मी सिंहनाद झालो"

या चार ओळींतून त्यालाही आणि त्याच्या कवितेलाही शक्ती आणि जिवंतपणा कसा प्राप्त झाला याची मोठी सुंदर नोंद तो करतो.

हृदयाची ही सामाजिक गझल पाहिली की वाटते या दिशेने हा कवी नेटाने पुढे जात राहिला तर मराठीला अज्ञात अशी सुंदर 'विचार-गझल' तो देऊ शकेल. त्याच्या कवितेत विचार दाटत चालला आहे यावरून हे भाकीत करावेसे वाटते. पुढच्या प्रवासात या कवीला माझ्या हार्दिक शुभेच्छा !

**भुकेची भूपाळी : हृदय चक्रधर**

# रमाई : करुणेचे महाकाव्य

कविमित्र सिद्धार्थ तलवारे यांनी 'रमाई' या काव्यसंग्रहाच्या संपादनाच्या रूपाने एक इतिहासमोलाचे कार्य केलेले आहे. 'रमाई' वरील सर्व कवितांचे संपादन करण्याची कल्पना त्यांच्या डोक्यात रुजली आणि ही सुंदर रुजवात त्यांनी या संपादनाच्यारूपाने प्रत्यक्षातही उतरवून दाखविली याबद्दल त्यांचे या प्रस्तावनेच्या निमित्ताने हार्दिक अभिनंदन करतो.

रमाई ही तमाम आंबेडकरवाद्यांची सांस्कृतिक माता आहे एवढ्या मोठ्या परिवर्तनवादी समूहाच्या मातृत्वाची 'रमाई' ही एक आदरणीय 'मिथ' झालेली. जगातली ही अशी पहिलीच मिथ आहे. मातृत्वाच्या नात्याचा विश्वातला हा एक विलक्षण प्रकार आहे. या देशातील दलित-पीडितांच्या तीन सांस्कृतिक माता आहेत. यशोधरा, सावित्री आणि रमाई ! या तीन माता म्हणजे उजेडाकडे धावणाऱ्या तीन वादळांच्या तीन सावल्या होत. या देशातील सूर्यकुलाच्या तीन महापुरुषांच्या त्या तीन अर्धांगिनी होत. रमाई या तीन महान मातांपैकी, महापतीव्रतांपैकी एक आहे.

एखाद्या मातेला कोट्यावधी लोकांनी अगदी उत्स्फूर्तपणे आणि जिवाच्या आर्ततेने आपली माता म्हणावे ही घटनाच अपूर्व आहे. पुढल्या अनंत कालासाठी रमाईचे हे मातृरूप चिरआदरणीय आणि चिरस्मरणीय झालेले आहे. एका गरीब माणसाची ही मुलगी एका वणव्याशी लग्न-बंधनाने जोडली गेली आणि त्या वणव्यात उजळून 'रमाई' झाली पण हे वर्णनही काहीसे तोकडेच ठरेल असे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व रमाईला आहे. अत्यंत आर्तगुणी असे ते व्यक्तित्व आहे. रमाई ही करुणेची स्वयंभू आहे. Poem of pity आहे. रमाईच्या व्यक्तिमत्त्वाला आसवांच्या मुक्या नदीचा मोठा सुबक आकृतीबंध आहे. एका अथांग दुःखाच्या शिल्पाचे लावण्य म्हणजे रमाई. एका नगण्य अशा गरीब कुटुंबातली ही पोर आपल्या त्यागाच्या श्रीमंतीने, कारुण्याच्या वैभवाने आणि आर्ततेच्या दौलतीने कोट्यावधी लोकांच्या काळजावर आई म्हणून कोरली जाते, अनेक प्रतिभांना तिच्यावर उत्स्फूर्तपणे कवितांची कृतज्ञताफुले उधळावीशी वाटतात ही गोष्टच मोठी अपूर्व आहे.

रमाईवरील हा काव्यकुंज आंबेडकरवादी विद्रोही कवितेचा एक भाग आहे. ज्वालामुखीच्या शेताच्या एका बाजूला हा कारुण्याचा वाफाही फुललेला आहे इतकेच. आंबेडकरवादी कविता ही आंबेडकरवादी साहित्यातील एक अग्रगण्य अशी वाङमयीन सिद्धी आहे. बाबासाहेबांच्या प्रेरणेने मराठी बोलांनी एक विद्रोहाचे वादळ कवटाळले ते आंबेडकरवादी कविता म्हणून मराठी कवितेत आता सन्माननीय झाले आहे. आंबेडकरवादी कवितेच्या स्वभावाचे कारुण्य हेही एक मूलभूत वैशिष्टच आहे. ते 'रमाई'या संग्रहाच्या रूपाने अधिक उज्ज्वल रूपात व्यक्त होत आहे.

रमाई हे कारुण्य बाबासाहेब आंबेडकरांच्या भावजीवनाचे एक अविभाज्य अंग आहे. "रमू तु मला सोडून गेलीस" असा हुंबरडा बाबासाहेबांनी रमाईचे निधन झाले तेव्हा फोडला. रमाईच्या मृत्यूने ते वेडेपिसे झाले. अनावर शोकसागरात बुडाले. २८ डिसेंबर १९४० साली प्रकाशित झालेला थॉटस् ऑन पाकिस्तान हा ग्रंथ बाबासाहेबांनी रमाईला–

**Incribed To The Memory of Ramu**

As a token of my appricciation of her goodness of heart her nobility of mind and her purity of character and also for the cool fortitude and rediness of suffer along with me which she showed in those friendless days of want and worries which fell to our lot.

या कृतज्ञतापूर्ण शब्दांत अर्पण केला ती रमाई बाबासाहेबांच्या आयुष्यात कशी आली ? कशी जगली ?

धुत्रे आडनावाच्या भिकू आणि रुक्मिणी या दांपत्याच्या पोटी १८९९ सालाच्या सुमारास रमा ही मुलगी जन्माला आली. धुत्र्यांना वणंकरही म्हणत असत. भावंडामध्ये रमा ही सर्वांत लहान. दाभोळ-जवळच्या वणंदगाचे हे कुटुंब ! रमाचे आई–बाप लहाणपणीच वारले. या पोरक्या रमाला मामा आणि काकाने सांभाळले. भीमरावाचे आणि रमाचे लग्न १९०८ साली झाले. यावेळी भीमराव मॅट्रिक झाला होता व त्याचे वय सतरा वर्षांचे होते. रमा नऊ वर्षांची होती. काले नंद या लोककवीने म्हटल्याप्रमाणे १९०८ साली–

" माझ्या भीमाच्या नावाचं
कुंकू लाविलं रमानं " आणि–

कवी हृदय चक्रधर या कुंकवात–

" मज ज्ञानसूर्य दिसतो
या कुंकवात भीमा. "

याप्रकारे दलितांच्या क्रांतीपुरुषाला पाहतो. रमाईने लावलेल्या या कुंकवाला असे सूर्यप्रतिमेचे रूप प्राप्त झाले.

विवाहानंतर अनेक वर्षे रमाईला उपासतापास, हालअपेष्टा, दुःख व दारिद्र्य यांच्याशीच अविरत भांडावे लागले. लहानपणीच मायबाप मेल्याने काळजात कारुण्याची कविता रूजली होती. आता विवाहोत्तर कुंठांसोबत त्या कारुण्याला महाकाव्याचे रूप प्राप्त होऊ लागले. माणसाचा देह धारण केलेल्या आंबेडकर नावाच्या वादळाला पत्नीच्या भावजीवनाकडे लक्ष द्यायला फुरसत नव्हती. त्यांनी स्वतःला उग्र

ज्ञानसाधनेत झोकून दिले होते. ते ज्ञानाची नवनवी शस्त्रागारे धांडोळीत होते. नवी शस्त्रागारे जन्माला घालीत होते. या देशातील कुटील ब्राह्मणी ग्रंथांचे गडकिल्ले उद्ध्वस्त करणारे लढावू ग्रंथ निर्माण करण्यात ते गुंतले होते. बाबासाहेबांची प्रज्ञा आणि प्रतिभा नवा माणूस आणि नवा देश निर्माण करणारे ग्रंथ निर्माण करण्यात गुंतली होती. 'रात्रंदिन ते युद्धातच' उभे होते. देशात असतानाही आणि परदेशातही त्यांची ज्ञान-मैफल सजली होती. त्यामुळे त्यांना संसाराकडे लक्षच देता आले नाही.

रमाबाई शालीनतेची आणि विनम्रतेची मूर्ती होती. अडचणींशी भांडत रमाईने आयुष्यभर पतीच्या सुरक्षिततेची काळजी वाहिली. बाबासाहेबांच्या आयुष्याचा भव्य प्रासाद पुढे राहिला. रमाबाईचा त्याग त्या भव्य प्रासादाच्या पायातील दगडासारखा आहे. हे त्यांच्या-साठी जीवनव्रत होते आणि ते त्यांच्यावर कोणी लादलेही नव्हते.' 'बुद्धयाचे वाण धरिले करी हे सतीचे' असे ते वाण होते. 'अमर्याद मित्रा तुझी थोरवी, अन् मला ज्ञात मी एक धुलीकण, अलंकारण्याला परी पाय तुझे, धुलीचेच आहे मला भूषण.' असे भूषण रमाईने मानले असले तरी एका युगप्रवर्तक प्रासादाच्या पायात स्वत:ला कोंडून घेणाऱ्या या धुलीकणाची महती इतिहासाने गौरवाने मान्य केली आहे.

एका अदृश्य आगीत रमाई बाबासाहेबांसाठी जळत होती. तिचा जीवनसाथी युगाला नवा आशय आणि नवा आकार देण्यात, देशाला नवी दिशा देण्यात गुंतला होता. त्याच्या कृतीउक्तीनी देशात चक्री-वादळे उठत होती. त्यांच्या वाणीतून लाव्हा सांडत होता. तो तर या देशातील जगावेगळया पशूतेविरुद्ध एकटाच भांडत होता इकडे रमाई दारिद्र्याशी एकटीच भांडत होती. पतीविषयीच्या चिंतेने ती अहोरात्र जळत होती. त्यांना क्षय झाला होता. अनेक महिने रमाई अंथरुणाला खिळून होती. प्रकृतीत सुधारणा होत नव्हती. औषधाला प्रतिसाद देण्याची ताकदही त्यांच्या अंगात उरली नव्हती. खंगून खंगून त्यांचा हाडांचा सापळा झाला होता. बाबासाहेबांनी अनेक नामवंत डॉक्टरांकडून इलाज केले पण त्याचा काहीही उपयोग झाला नाही. हा आजार रमाबाईंना घेऊन जायलाच आला होता. रमाबाईच्या

मृत्यूच्यावेळी बाबासाहेब रमाईजवळ होते. २६ मे १९३५रोजी रमाईची जीवनज्योत मालवली. सुमारे ३७ वर्षांचे आयुष्य रमाईला लाभले. २७ वर्षे रमाईने बाबांचा संसार केला. रमाईच्या मृत्यूने बाबासाहेब खचून गेले.जडअंत:करणाने त्यांनी या अमर सौभाग्यवतीला,या चिरंतन साध्वीला शेवटचा निरोप दिला. स्मशानातून घरी आल्यावर खोलीत त्यांनी स्वत:ला कोंडून घेतले.हुंबरडा फोडला.पोरक्या मुलाने रडावे तसे ते अनेक दिवस स्फुंदून स्फुंदून केविलवाणे रडत राहिले. ''प्रस्तुत लेखक परदेशी असताना रात्रंदिवस तिने प्रपंचाची काळजी वाहिली व तिला ती अजूनही करावी लागत आहे व तो स्वदेशी परत आल्यानंतर त्याच्या विपन्नदशेत शेणीचे भारे स्वत:च्या डोक्यावर वाहून आणण्यास जिने मागे पुढे पाहिले नाही अशा अत्यंत ममताळू,सुशील, पूज्य स्त्रिच्या सहवासात दिवसाच्या चोवीस तासांतून अर्धा तास त्याला घालविता येत नाही.'' असे बहिष्कृत भारतात बाबासाहेबांनी आधीच लिहिले होते. रमाईच्या मृत्यूने बाबासाहेबांवर मोठाच आघात झाला. रमाईला आपण सुख देऊ शकलो नाही अशा पश्चात्तापाच्या आगीत त्यांचे मन शोकदग्ध झाले.

अशी ही रमाई बाबासाहेबांच्या आयुष्याचा १९५६ पर्यंतचा युगप्रवर्तक बौद्धिक पराक्रम पाह्यला, बाबासाहेबांच्या महापुरुषपणाच्या सकळ कळा पाह्यला रमाई जिवंत राह्यला हव्या होत्या. आंबेडकर नावाच्या झंझावाताचा १९३५ च्या सुमारास प्रथमांक तेवढा सादर झाला होता. सगळे उच्चांक तर पुढल्या काळातच साकार झाले. तरी कर्तृत्वाच्या आणखी अपूर्व विराटाकाशात हा महापुरुष झेप घेणारच ही खात्री जणू रमाईला झाली आणि त्यांनी आपले जिवीतकार्य संपविले. त्यांनी जणू ''याचसाठी केला होता अट्टाहास.''आपला अट्टाहास फळला हे लक्षात येताच त्यांनी बाबासाहेबांचा निरोप घेतला.

त्यांच्या लोकसेवेचेही पुरावे आहेत. बाबासाहेबांच्या प्रेरणेने धारवाड येथे निघालेल्या मुलांच्या वसतिगृहात एके दिवशी जेवणाची काहीही तरतूद नव्हती. रमाईने आपल्या हातातील सोन्याच्या बांगड्या गहाण ठेवायला लावल्या आणि मुलांच्या जेवणाची सोय केली. हे रमाबाईंचे आयुष्य !

" करुणेची कविता तू मावत नाहीस कवितेतही
शब्दांशिवाय मैफल तू मावत नाहीस स्वरातही.
डोळ्यांमध्ये व्याकूळ सागर मावत नाही दुःखातही
आर्ततेची सदाफुली मावत नाही अश्रूतही.
सूर्यासोबत संसार तुझा चांदणे झालीस आगीतही
सौभाग्याचे वादळ तुझे मारून गेले मरणासही. "

हे आयुष्य आगीतही चांदणे झाले. जळण्याचा गौरव रमाईने मानला. सूर्यासोबत जळत तिने संसार केला आणि तो आपला सर्वश्रेष्ठ सन्मान मानला. युगप्रवर्तकाचा प्रतिभावंत हात, सौंदर्याचा शिल्पकार हात देशातील क्रांतीची कलमे लिहीत होता त्यावेळी कुटुंबाची चिंता त्याच्यापर्यंत पोहोचून तो विचलीत होऊ नये यासाठी रमाईने आपल्या आयुष्याला चूड लावली. या तिच्या कृतीने तिला देशातील उपेक्षितांच्या मातृत्वाची महानता दिली.

'रमाई'हा काव्यसंग्रह या मातृत्वाच्या महानतेचाच प्रतिभावतांच्या मुखांनी गौरव करीत आहे. सर्वच कविता आपापल्या परीने चांगल्या आहेत. 'रमाई' या संग्रहाच्या पानोपानी विलापिका आणि उद्देशिका यांचे मोठे उत्कट रसायन फुललेले आहे. रमाई हीच या काव्योत्सवाची उत्सवमूर्ती आहे. या संग्रहात एका क्रांतीकारी प्रासादाच्या पायातील चिरा सन्मानमूर्ती झालेला आहे. रमाईच्या करुणेने या प्रतिभांना मोहीत केले आहे. रमाई नावाच्या दुःखाबद्दलची कृतज्ञताच या संग्रहातील कवितांनी निश्चित केलेली आहे. " दुःख असावे असेच सुंदर " असे म्हणण्याचा मोह व्हावा आणि या दुःखाचा लोभ सुटावा असेच हे आदरणीय दुःख आहे.

'रमाई' या संग्रहातील अनेक कवितांनी मला व्याकूळ केले. या संग्रहातील अनेक ओळींनी माझ्या पापण्या भिजवल्या. अनेक कल्पना-प्रतिमांनी गळयात ढगांची गर्दी उभी केली. अनेक कविता वाचताना मला मनावरचा भार उतरला जाईस्तोवर थांबावे लागले. असे का झाले ? तर त्या त्या ठिकाणी कारुण्य उत्कटपणे कलामय झाले आहे. भावनांना उत्कट तरलता प्राप्त झाली आहे. सौंदर्य सुगंधी झाले आहे.

प्र. श्री. नेरूरकर, रमेश पाटील, बेबीताई कांबळे, दामोदर मोरे, भगवान भोईर, हृदय चक्रधर, रमाकांत जाधव, नामदेव ढसाळ, उर्मिला पवार, अनिल ढेंगळे, सिद्धार्थ तलवारे आणि यशवंत मनोहर इ. कवींच्या कविता मला विशेष लक्षणीय वाटल्या. अर्थात या आणि इतरही सर्व कवींनी रमाईच्या व्यक्तित्वाच्या सोन्याचे काव्यालंकार आपापल्या परीनी घडविले आहेत.

एक अत्यंत प्रगल्भ, अत्यंत लगामी, अत्यंत उत्कट आणि काळजाला हात घालणारी कविता म्हणून मी प्र. श्री. नेरूरकरांच्या कवितेचा उल्लेख करीन. रमाईच्या व्यक्तित्वाचे संपूर्ण बोलके शिल्प कवीने इथं साकार केले आहे.

रमाईमधील सर्वच गाणी खरे तर रमाईच्या मुक्या मनाची गाणी आहेत. 'चंदनाचं मूल्य कमी करणाऱ्या' रमाईवरची ढसाळांची कविता रमाईला बहिणाईच्या बहिणाई म्हणते तेव्हा कालवाकालव होते. या सुंदर कवितेतील –

" अष्टौप्रहर ती भटीण सरस्वती साहेबांच्या मागे असे !
सवतीमत्सर तुला करताच आला नाही का ग ?"

या दोन ओळींमध्ये कालाच्या संदर्भात काही घोटाळा होतो आहे असे वाटते. १९३५ पूर्वी म्हणजे रमाईच्या मृत्यूपूर्वी अशी कोणी भटीण बाबासाहेबांच्या आयुष्यात आल्याची नोंद मला तरी माहीत नाही. ढसाळ म्हणतात त्या भटीणीची आणि बाबासाहेबांची भेट १९४७ साली पहिल्यांदा झालेली आहे. तेव्हा रागाच्या भरात वरील ओळी दडपून दिल्या गेल्या असाव्यात एवढेच या संदर्भात म्हणता येणे शक्य आहे.

ना. मा. निमगडे यांची मंगलाष्टकांची चाल वापरणारी कविता रचनादृष्टचा सदोष आहे. हिरा बनसोडे यांची कविता आणि तिच्यातील सायसावलीची प्रतिमा सुंदर आणि मोलाची आहे.

" डोळ्यातून नवयुग रचीत आज चाललो आहे. "

या बापूराव जगताप यांच्या ओळीतील निर्धार एका खोल कृतज्ञताबुद्धीचा आरसा झालेला आहे. भगवान भोईर यांच्या कवितेत रमाईच्या मृत्यूचा प्रसंग उत्कटपणे आपल्या मनावर कोरला जातो.

" साहेब रडू नका !
मला हसत हसत निरोप द्या !
रामी, मला युगाचा अंधार जाळायचाय
तू बीजेसमान तळपत राहला हवीस
नि . . .
तू तर शेवटच्या यात्रेला निघालीस,
रामी थोडा वेळ थांब ना !
ह्या दलित झोपड्या प्रकाशमान करू !
मग एकाच वेळी जगाचा निरोप घेऊ !
. . . रमाईने उजवा हात
साहेबांचे डोळे पुसण्या वर नेला
हात खळकन खाली पडला . . . "

भोईर यांनी या कवितेत सुंदर भावकुंज फुलविला आहे. या ओळी त्यांच्या कवितेला केवढ्यातरी उंचीवर घेऊन जातात.

यशवंत मनोहरांची कविता तपशीलोत्तीर्ण होते. तपशीलाचा काव्यानुभव ती सादर करते. रमाई या सदतीस वर्षांच्या एका आगीत चांदणे होणाऱ्या वास्तवाचा एक वेधक सौंदर्याविष्कार त्यांची कविता करते. ही कविता माझीच असल्याने मी तिच्यावर अधिक भाष्य करणे रास्त नव्हे. ते काम वाचकांवर सोपवून मी पुढे वळतो.

" रक्ताचं पाणी करून . . , जळत राहिलीस
बुद्धासमोर जळणाऱ्या मेणबत्तीसारखी
बाबासाहेबांच्या आयुष्यात. "

हे कवी दामोदर मोरेंचे आकलन अभिनव आहे.हे आकलन वास्तवही आहे आणि सुंदरही आहे बॅरिस्टर होऊन आलेल्या बाबासाहेबांच्या स्वागताला रमाई जाते. लुगडे फाटके असते. तेव्हा शाहूराजाने बाबांना दिलेला जरीपटकाच नेसून ती जाते. रमाईच्या या जरतारी मनाला कवीने केलेला मुजरा सुंदर आहे. हेलावून सोडणारा आहे.

" काळोखितांच्या कंठातील
रमाई नावाचे सोने

ओठावर अंकुरायला लागते हळुवार
रमाई नावाचे मधुर गाणे."

इथे रमाईचे व्यक्तित्व अत्यंत चपखल शब्दांत कवीने खोदले आहे. रमाई हे गाणे आता प्रत्येकाच्या मनाचेच मधुर गाणे झाले आहे व रमाकांत जाधवांना तर रमाईने केलेल्या संसाराचे चित्र 'विस्तवाशी संसार' या प्रतिमेतून जाणवलेले आहे. रमाईने बाबांच्या ग्रंथांना दागिने मानले होते. जाधव म्हणतात –

" बाबांचे ग्रंथ हेच तुझे दागिने... आणि शेवटपर्यंत
बाबांची पणती होऊन सोबत केलीस "

इथे रमाईच्या व्यक्तित्वाची नवीच सौंदर्यछटा व्यक्त होते.

" साहेब काळजी करू नका
संसाराचा गाडा खेचण्यास मी एकटी समर्थ आहे.
वेळ आल्यास गोवऱ्या वेचीन शरम धरणार नाही
पण तुम्ही अंगिकारलेले कार्य तडीस न्या ! "

रमेशचंद्र सोमकुवरच्या या तशा साध्या ओळी. पण या ओळी–सुद्धा एक सौंदर्यशक्ती घेऊन येतात. अर्थात रमाईने

" . . . गरिबीचे
पोवाडे गायले नाहीत."

हे माया वासनिकांनी व्यक्त केलेले भावसत्यही खरेच आहे. रमाई म्हणजे त्यागास्विनी.

" जपलं एक वादळ तू
जपला एक अन्यायाचा कर्दनकाळ
माई, चंदनाचं खोड तू "

या शब्दांत रमेश पाटील यांनी रमाईचे इतिहासमोलाचे कर्तृत्व साकार केले आहे तेही मोठे सुंदर आहे. उर्मिला पवारांनी दारिद्र्याच्या संदर्भाशिवाय दु:खाच्या आणखी एका जिवघेण्या आगीची नोंद आपल्या कवितेत केली आहे. ही नोंद या संग्रहातील अगदी एकुलती एक नोंद आहे. एखाद्या संवेदनाशील प्रतिभेलाच सुचावी अशी ती बाब आहे. त्या म्हणतात–

" पहाडासारखी भूक विझविलीस चतकोर भाकरीनं
तेही कमी नव्हते म्हणून की काय
पोटजाळही सोसायला लावला नियतीने
एक नाही दोन नाही राजरत्नासह चवथ्यांदाही
घातला घाव तुझ्या तनामनावर
नि पांगळे केले तुला "

अनिल ढेंगळेंनी रमाईच्या व्यक्तित्वाचा आणखी एक जरतारी पैलू चितारला आहे. ते म्हणतात–

" आमचा क्रांतीपुरुष
उजेडासाठी जळताना
कधी विसावला तुझ्या कुशीत
त्याचे आभाळ, त्याचे वाळवंटी क्षितीज
त्याचे तुरुंग, त्याचे सुरुंग
तू जपलेस फाटक्या पदरात. "

या ओळी रमाईच्या थोरवीचे आणखी एक तळघर उघडून देतात.

अर्थात या संग्रहात अनेक कवींच्या कवितांमधून तपशीलाची पुनरावृत्ती होताना दिसते. प्रतिभावंताला एकतर उपलब्ध तपशीलाच्या पोटी संभवू शकणारे तपशील लक्षात घेता यायला हवेत. आणि दुसऱ्या पातळीवर उपलब्ध तपशीलाचे नवे भावार्थ खुलविता यायला हवेत. हे दोन्ही प्रकार जिथं घडत नाहीत तिथे काव्यत्व जन्माला येत नाही. सौंदर्याची कारंजी उद्रेकून येत नाहीत. या संग्रहात वरील प्रकारचे सर्जन जिथे सादर झाले तिथे कवितांना सौंदर्याचे वैभव प्राप्त झाले आहे.

' विसाव्या शतकातली
यशोधरा होऊन. ..' (बी बी. ईलमकर)

रमाईने स्वतःला चिरस्मरणीय करून टाकले. सिद्धार्थ तलवारे यांना रमाईचे दर्शन 'दलितांची उत्थानगुंफा' या सुंदर प्रतिमेतून झाले आहे. तर बाबांच्या रथाला रमाईने ' अबोल अनमोल गती ' दिली ही छटा किशोर घोरपडेंची कविता व्यक्त करते. हृदय चक्रधर यांच्या कवितेतील रमाई समिधेप्रमाणे जळताना दिसते.

" चवदार या तळ्याच्या
आगीत पोळताना
मी पाहिले रमाई
नव डोळियात भीमा "

या ओळी एका उत्कट संवेदनशीलतेने स्पंदीत झालेल्या आहेत. तर–

" उपसताना डोंगर परिश्रमांचे
वसंत ऋतुसम मोहरत गेलीस "

ही वैभवकुमार शेरे कवीची भावप्रचितीही अत्यंत तोलामोलाची आहे. रमाईच्या जीवनाची एक नवी अर्थवत्ता इथे शिल्पित केली जाते. 'बेबीताई कांबळे' ची कविता साधी पण सुंदर आहे. लोककाव्याच्या लावण्याची खुमारी या कवितेत आहे. एका स्त्रीप्रतिभेनेच लिहावे असे हे लोककाव्य आहे. रमाबाईला चाळीतील सर्व बायका चिडवितात. तिच्या गरिबीला नावे ठेवतात. रमाबाई बाबासाहेबांना विलायतेस लिहून पाठविते. रमाईचे पत्र वाचून बाबासाहेबांचे डोळे भरतात. ते रमाईला पत्रात लिहितात –

" कवडी किंमत नाही ह्या ग सोन्याची
जळती मशाल आहे तुझ्या त्यागाची
. . . सात कोटी जनता गळा ग मणी
कसा दिसतो तुझा कंठ शोभूनी
यशवंत एकटा तुझा ग नाही
दीन दलितांची तू खरी आई. "

रमाईचे व बाबासाहेबांचे अंतर्विश्व, त्यांचे भावजीवन बेबीताईंनी इथे साकार केले आहे. ते मोठे विलक्षण आहे. बेबीताईंच्या कवितेला प्रतिभेचा साधाच पण सुंदर स्पर्श लाभलेला आहे.

तर अशा या रमाईवरील कविता 'रमाई' हा काव्यसंग्रह एका स्त्रीसंबंधीच असलेल्या कवितांचा मराठीतला पहिला काव्यसंग्रह आहे. यादृष्टीने या काव्यसंग्रहाला ऐतिहासिक मूल्य आहे.

बाबासाहेबांच्या जन्मशताब्दी वर्षात बाबासाहेबांच्या या व्याकूळ सावलीची, या त्यागी पडछायेची व या करुणेच्या कवितेची कृतज्ञतापूर्ण

आठवण आंबेडकरवादी प्रतिभांना होणे अपरिहार्यच होते.या संग्रहातील सर्वच कवितांनी मला रमाईच्या भावजीवनात खोल नेले.त्या पायातील चिन्याचे कळसारखे झळाळते व्यक्तित्व न्याहाळण्याची संधी दिली त्याबद्दल या सर्वच प्रतिभांचे मी अभिनंदन करतो. रमाईच्या मातृस्मृतीला काव्याभिवादन करणाऱ्या या आंबेडकरवादी प्रतिभांना धन्यवाद देतो. आणि कष्टपूर्वक रमाई या संग्रहाचे संपादन केल्याबद्दल कवीमित्र सिद्धार्थ तलवारे यांचेही मी विशेष अभिनंदन करतो. 'रमाई' या काव्यसंग्रहाचे तमाम मराठी मुलुखात स्वागत होईल अशी सदिच्छा व्यक्त करतो. जयभीम !

**रमाई– संपादक : सिद्धार्थ तलवारे**

# दलित कथेतील विजांचे वादळ

मित्रवर्य चंद्रकांत वानखेडे यांच्या कथांचा संग्रह ' विटाळ ' या नावाने प्रकाशित होतो आहे याबद्दल त्यांचे ही प्रस्तावना लिहून अभिनंदन करताना अत्यंत आनंद होतो आहे. त्यांचे सर्वस्वी स्वत:चे असे हे पहिलेच पुस्तक आहे. या पुस्तकाच्या भक्कम पावलांनी ते मराठी दलित कथेच्या छावणीत सामील होत आहेत ही बाब मी वानखेडे यांच्या जीवनातली पहिली विशेष गौरवार्ह बाब मानतो. ते धडाडीचे सामाजिक कार्यकर्ते आहेत, अत्यंत निष्ठेने आणि प्रामाणिकपणाने आपल्या कृतीउक्तींचे सामर्थ्य समाजाच्या उत्थानासाठी वेचीत आहेत ही गोष्ट कोणीही मुक्त मनाने गौरव करावा अशीच आहे. मीही त्यासाठी त्यांचा सन्मानच करीन, पण हे सर्व समाजकार्य करताना सुंदर कथा आणि कविता लिहिणारा त्यांच्यातला लेखक त्यांनी जिवाप्रमाणे जपावा असे अगदी आवर्जून सुचवावेसे वाटते. कारण लेखकपण ही त्यांच्या रक्ताचीच प्रधान प्रवृत्ती आहे, लाल रंगाइतकेच त्यांच्या रक्तात या लेखकपणालाही स्थान आहे. म्हणून त्यांच्या

कथासंग्रहाची आणि कवितासंग्रहाचीही कोणी पाहिली नसेल तितकी मी वाट पाहिली आहे.

१९७० ते ८० या काळात नागपुरातील अनेक दलित तरुणांच्या मुखाने स्वत: वादळच नृत्य व गायन करीत होते. या तरुणांचा उत्साह ज्वाळांनी विणला होता. त्यांच्या ओठातून बाहेर पडेल त्या ओळीतून काव्य धावताना दिसे आणि अंगार गरजताना दिसे. डोळ्यांतून हुंदडताना दिसत विजांचे लोळ आणि पावलांतून गतीची पर्वे उलगडताना दिसत. ऊर्जेचा उत्सव किंवा संतप्त धारांनी बरसते. आभाळ हेच त्या काळाचे सुंदर नाव होते. चंद्रकांत वानखेडे हा आमच्या काटोलचा एक तरुण. त्यावेळी नागपुरच्या मेडिकल चौकातील या ऊर्जाउत्सवाचा एक महत्त्वाचा घटक होता. चंद्रकान्त वानखेडे हे झाड त्याकाळी सर्वस्वी हिरवेगार होते आणि कथा–कवितांच्या विद्युतफुलांनी फुलणे हेच त्याचे सुंदर जीवन होते. १९७३ ते १९७७ या काळात वानखेडे यांनी कथा–कविता लिहिल्या पण काय झाले कळत नाही, त्यांच्या प्रतिभेने जगण्यातून पुढे मनच काढून घेतले. म्हणून या प्रस्तावनेच्या निमित्ताने मला या लेखकाला आवर्जून सांगावेसे वाटते की मित्रा, लाल रंगाइतकेच तुझ्या रक्तात लेखकपणाला स्थान आहे. या लेखकपणाची माती करू नकोस, रक्ताच्या या उफाळाकडे पाठ फिरवू नकोस. तुझे ' अग्निपंख नभी फडफडू दे ' तुझ्या जगण्याची तीच खरी अर्थपूर्ण लय आहे.

' विटाळ ' मधील कथा वाचून मी खूपच अंतर्मुख झालो. दलित कथेतील एका समर्थ कथाकाराच्या कथा आपण वाचीत आहोत, दलितांच्या जीवनाचे विदारक दु:ख प्रभावी कथाबंधातून आपण अनुभवतो आहोत आणि आणखी एक नवे क्षितिज आपल्या कवेत खेचून घेणारी कथा आपण अनुभवतो आहोत असेच मला ही कथा वाचताना वाटले.

योगीराज वाघमारे, वामन होवाळ ही लेखकनामे अलीकडल्या दलित कथेला नवी शक्ती प्रदान करणारी नामे आहेत, पण चंद्रकांत वानखेडे यांची कथा वाचताना मला प्रकर्षाने आठवण झाली ती अण्णाभाऊ साठे आणि बाबुराव बागूल या दलित कथेतील दोन

महापुरुषांची. कथालेखक वानखेडे हे या दोघांचेच उत्तराधिकारी आहेत. या दोन्ही श्रेष्ठ कथाकारांच्या कथा वानखेड्यांनी मनापासून अभ्यासल्या आहेत. मनात छान मुरवल्या आहेत. या दोघांचीही सामर्थ्ये वानखेड्यांच्या कथांमधून हुंकारत आहेत. पण वरील दोन्ही कथा-कारांच्या कथासृष्टितील शक्तिस्थळे ध्यानात घेऊन वानखेडे यांनी त्यांना सन्मानाने मुजरा केला आहे आणि या युगंधर कथाकरांच्या जोडीला आपला आपल्या पद्धतीचा निराळा कथाखेळ मांडला आहे.

वानखेडे यांची कथा वाचताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती ही की आपल्या काळात मार्क्सवादाच्या ब्राह्मणी प्रभावामुळे अण्णाभाऊंच्या प्रतिभेला दिसले नाही ते जातिबद्ध समाजसंस्थेचे संतापजनक दुःख आंबेडकरांच्या मनाने पाहिल्यामुळे वानखेड्यांना दिसले. येथील मनांना हजारो वर्षे जडलेला जातींचा अमानुष महारोग अण्णाभाऊ साठ्यांनी पाहण्याचे टाळले. आर्थिक विषमता कथाकार अण्णाभाऊंनी ज्या ताकदीने पिंजून काढली त्या ताकदीने जातीय विषमता पिंजून काढली असती तर ! पण मांग, महार यांचे परस्पर-संबंध आणि त्यांना इतर उच्च जातींकडून मिळणारी निर्घृण तुच्छतेची वागणूक व त्यांच्यावर होणारे अत्याचार असा या समाजातील गरीब-गुदांचा जातिव्यस्थेने मांडलेला अमानुष छळवाद चितारण्याचे कार्य अण्णाभाऊंनीच जणू चंद्रकांत वानखेडे यांच्यासाठी राखून ठेवले होते. इतिहास कधी कधी एखाद्यासाठी असा हट्ट घेऊन बसतो.

विटाळमधील कथा ‘ दलित जाणिवेची ग्रामीण कथा ’ आहे ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची आहे. अण्णाभाऊ साठ्यांची कथा मार्क्सवादी जाणिवेची ग्रामीण कथा आहे. बाबुरावांची कथा मार्क्स–आंबेडकर यांच्या संमिश्र जाणिवेची नागर–ग्रामीण कथा आहे. तर वानखेड्यांची कथा आंबेडकरी जाणिवेची खरीखुरी ग्रामीण कथा आहे.

या कथेतून पहिल्यांदाच काटोलच्या भागातील मांग-महार माणसे मराठी कथेत प्रवेशली आहेत. विशेषतः मांग समाजाचा विस्तृत जीवनपट प्रथमच या कथांमधून साकार होतो आहे. महार–मांग आणि दलितेतर प्रस्थापित यांच्या संबंधांचे गुंतागुंतीचे बहुरंगी नाट्य अत्यंत

चित्रमय पद्धतीने या कथांमधून साकार होत आहे 'विटाळ' या कथेत मांगीण स्त्रीचा भोगवटा चितारला जातो. खेड्यात तिला हजारो वर्षे बाळंतपणं करावी लागली. पण बदल्यात तिला तुच्छतेशिवाय काय मिळालं! साळूची विटाळशी असलेली सून गुजराच्या वाड्यात बाळंतीणिची कामे करायला जाते. गुजर तिच्यावर बलात्कार करतो. बदमाश प्रस्थापिताच्या विटाळाच्या कल्पना कशा सोयीनुसार बदलतात त्याचे मोठे प्रत्ययकारी चित्रण वानखेड्यांनी इथे काढले आहे. 'बाट' या कथेत आजारी मुलीसाठी गंगू मांगीण मरीमायच्या देवळाकडे नैवेद्यासाठी जाते. पण नैवेद्यावर अधिकार भगतीण म्हणून महारीणीचा. इथे गंगूच्या दारिद्र्याची आणि विटाळामुळे घडून येणाऱ्या भेदक उत्पाताची कहाणी साकार होते. 'कायदा' कथेतही मांग कुटुंबाचे दारिद्र्य सुरेख पद्धतीने चितारले जाते. हे सोननाकचे व त्याच्या कुटुंबाचे दारिद्र्य अत्यंत लहान असे स्वप्न पाहते पण कायद्याचे नाव सांगून सरपंच त्याचा उकंडा आपल्या बागेत नेऊन टाकतो आणि या गरिबांची स्वप्ने अगतिकपणे मरून पडतात. 'विवंचना' या कथेतही दारिद्र्याची हृदयविदारक हकीकत साकार होते. 'दुसरा एकलव्य'मध्ये झापरू मांगाच्या दारिद्र्यात फुललेल्या गंधर्वगायनाचे चित्र काढले जाते. 'रक्त'मध्ये गिरजा मांगिणीच्या दुधावर वाढलेल्या योगेशच्या चित्रणातून रक्ताच्या नात्याचे चित्र काढले आहे. 'आंधळे' मध्ये देवका महारीनचे बुद्ध होणे, अस्मिता प्राप्त करून घेणे आणि मांगमंडळींनी ख्रिश्चन-मुसलमान होणे, विश्व हिंदू परिषदवाल्यांची दयेची याचना करणे आणि हिंदूधर्मातच गुलाम व आंधळे राहण्याचे मनसुबे करणे चितारले जाते. आणि देवकाबुढीचा भयंकर संतापही चितारला जातो. 'जाणीव' मध्ये मुलगा आजारी असतानाही वाजवायला जावे लागलेल्या दमड्याची कथा येते. त्याचा मुलगा मरतो आणि तो म्हणतो, 'भाडीत गेलं आता असं जगनं . . . !' तो सुरत ठेचतो सनई चेंदतो, संबळ जाळ्यावर आपटतो. ढोमणी फोडतो. डफडे फोडतो, आणि झोपडी पेटवून देतो. 'आता माणूस झालो' म्हणतो. गाव सोडून जायला लागतो. त्याच्या गुलामीचं प्रतीक असलेले झोपडे जळत असते. एका कथेत चांभार

माणसाच्या माणुसकीचे व सवर्णांच्या जीवघेण्या जातीय अहंकाराचे चित्र काढले जाते. पण अशा दोनतीन कथा सोडल्या तर वानखेडे यांच्या कथा मांगवाड्यातील आर्थिक आणि सामाजिक गुलामीचे जिणे व त्यातून बाहेर झेपावणे या गोष्टी चितारणाऱ्या कथा आहेत. पहिल्या कथेत अगतिक, अन्याय सहन करणारी, केवळ शाब्दिक संतापाने अभिव्यक्त होणारी मातंग जात शेवटच्या कथेत हिंदुसंस्कृतीविरुद्ध बंड करून उठताना दिसते. हा वानखेडे यांच्या कथांचा प्रवासही मोठा साभिप्राय आहे. ज्यावर जात उभी आहे तो धंदा सोडा, खेडी सोडा व अस्मितेचा शोध घेत स्वतःला मनुष्य म्हणून निर्माण करा या बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रकाशवाटेने जाण्याचा निर्णय दमडू घेतो. दमडू इथे मांग जातीच्या उत्थानाचे ' मिथ ' होतो. हा कथासंग्रह मागील दिशाहीनतेचे अघोरी प्रताप भेदकपणे चितारणारा आणि उजेडाची दिशा देणारा संग्रह आहे. हे वृत्तिवक्रप्रवर्तन आहे. मातंग समाजाच्या प्रबोधनाचा चित्रपट, त्यांच्या बंधनमुक्तीचा हा प्रवास आणि त्याच्या स्थलांतराची ही कथात्मक बखर कथासाहित्याने गौरवाने सत्कारावी अशीच आहे.

मांगवाड्याचा एवढा आणि असा जीवनपट या कथेत प्रथमच येतो आहे. काटोलच्या परिसरातील मांग आणि महारवाड्यातील सुंदर बोली प्रथमच या कथांमधून येत आहे. ' इच्या मायभीन मेलो ये पुरवलं पन वाचून काई बरं नाही,' ' इचारच हाये ईच्या पित्तर, ' ' आता सांगू का तुले कसं रायते तं ', ' माह्याच उकंडा थो फुकटात घेऊन चाल्ले आनं मलेच मारून रायले. '—' पायतो बर कसा नेता तं तुमी माह्या उकंडा,' ' तुह्या सत्यानास होवो- - - तुह्यं मढं जावो दारे - - - भोसडे - - -', ' हृये पोट्टबो ध्याच जातीचं दिसते इच्या भीन, बोलत बी नाही - - - अशी अत्यंत अफलातून भाषा कटोल भागात बोलली जाते. वामन इंगळयांच्या कथेतून या भाषेचा वरचा स्तर आला होता पण वानखेडे यांनी खालच्या स्तरातील लोकांच्या बोलीचे काळीजच आपल्या कथेत भरले आहे. हा कथाकार असा कटोल परिसरातील सच्ची, खालच्या स्तरातील भाषा आणि जीवन यांचे प्रथमच चित्रण करतो आहे. पण हा लेखक कवीही

आहे. या कथांचे बरेचसे निवेदन या कथाकारामधल्या कवीने केले आहे. दलित कथेत अशी काव्यमय आणि सुभाषितमय भाषा अण्णाभाऊंची आहे आणि बाबुरावांची आहे.

दलित कथेतील अण्णाभाऊ आणि बाबुराव हे वानखेड्यांचे भाषाकूळ आहे. ठिकठिकाणी वानखेड्यांमधला कवी या कथांमध्ये फुलावर आला आहे. . . ' पुन्हा पायात निश्चयाची ताकद ओतली.' ' गंगूची किंकाळी वातावरणाची छाती फोडून गेली. ' ' विचारांच्या गाडीत बसून रूळावरून धावत होता. ' ' त्याचं काळीज तुटून तोंडाला आलं. ' खोपटाखोपटात उजेड आणि अंधाराची झुंज होऊ लागली.' 'कधी उजेड तर कधी अंधार जखमी होऊ लागला.' 'जाताना आपला आजार आईला अहेरात देऊन गेला. ' ' उन्हं ठिणग्यांची पैंजणं पायांना बांधून सूर्याच्या मर्जीनं नाचत होती. ' ' साऱ्यांच्या मनात ही आशा सर्कशीतल्या पोरीसारखी गिरक्या घेत होती. ' शब्दांचे सूर होऊन त्याच्या काळजात घुसले. ', ' नुकतंच फुललेलं गुलाबाचं फूल तोडून पाण्यात भिजत ठेवावं तसा तिचा लाल साडीतला देह फुलासारखा टवटवीत दिसत होता. ' ' वादळाच्या गतीनं धावणारे पाय मातीत रुतून बसले. ' ' म्हातारीच्या शब्दाच्या बेड्या त्याच्या पायात पडल्या. ' या काही उदाहरणांवरून आपणास ही खुशीत आलेली काव्यमयता दिसते.

यातील बहुतांश कथांच्या घडांवर विद्रोहाची शिरे आहेत. 'विटाळ' मधला धनबा, 'बाट' मधील गंगू, 'कायदा'तील सोननाक, 'न्याय'मधील राघोबा, 'मनाची झालीत दगडं' मधील सोमा चांभार, 'आंधळे' मधील देवका बुढी, 'जाणीव' मधला दगडू या सर्वच व्यक्तिरेखा तेजःपुंज आहेत. विद्रोहाची लखलखती पाती असावीत तशा त्या आहेत. वानखेडे यांची कथा 'असे आहे'चे शिल्प ' असे का ' या प्रश्नाच्या गुहेत फिरत चितारतात म्हणून ही कथा श्री. म. माटे वा शंकरराव खरात यांच्या कथांतील पूर्णविरामापाशी थांबत नाही. वानखेड्यांच्या प्रत्येक कथेचा शेवट प्रारंभाने होतो. कथेचा शेवटचा शब्द थांबतो तिथून जीवनाचा नवा श्वास सुरू होतो. या कथेने मी मोहित झालो त्याचे हेही एक महत्त्वाचे कारण आहे.

या कथांचा आणखी महत्त्वाचा विशेष असा की या कथा विचार वा भूमिकेचा बटबटीत उच्चार करीत नाहीत. विवक्षित परिणामासाठी घाई वा सोयीची आवराआवर करीत नाहीत. विश्लेषणे वा भाष्ये करीत ही कथा आपले कथापण जखमी करीत नाही. ही कथा स्वतःच स्वतःचा शेवट फुलवते. या घडणीकडे लेखक बाजूला उभा राहून कृतार्थतेने पाहात असावा असे वाटते. घाटाच्या दृष्टीने ही कथा बागूलांच्या कथेची मावसबहीण वाटते. आपल्या जातीय जीवनातील घटितांवर ही कथा उभी आहेच पण ही कथा जिवंत होऊन चालते आणि धावते आहे पण ही जातीय जीवनातील मानसिकतांच्या बळाने. किंवा असेही म्हणता येईल की वानखेडे ज्या जीवनाची कथा करीत आहेत त्या जीवनातील घटना आणि मने एकाच पानाच्या दोन बाजू असतात. झाडाच्या पानात ताजेपणा तशी या घटनांमध्ये मने असतात. त्यामुळे घटनांची वर्णने करीत न बसताही ही कथा मनामनांचे संबंध-नाट्य आपल्यापुढे उभे करते. असे करून ही कथा भारतीय समाजव्यवस्थेतील थांबण्यालाच आनंद मानणाऱ्या एका समाजगटाचे दुःख जशी मांडत आहे तशी बदलालाच आता जीवन मानणाऱ्या त्याच समाजगटाची जिद्दही चितारीत आहे.

'विटाळ'मधल्या कथांची दखल मराठी कथेला सन्मानाने घ्यावी लागेल. दलित कथेला तिच्या स्वागताला यावे लागेल. एक मात्र घडेल, या लेखकाने लिहिले नाही तर माझ्याप्रमाणेच अनेक कथाप्रेमींना त्याचा रागही येईल.

शेवटी काटोलच्या त्या अफलातून सुंदर बोलीत एखादी संपूर्ण कादंबरी लिहावी अशी सस्नेह सूचना करून या माझ्या कथाकार मित्राचे या सुंदर कथा लिहिल्याबद्दल मनापासून अभिनंदन करतो.

**विटाळ : चंद्रकांत वानखेडे**

# दु:खाला नायक करणारी विद्रोही कथा

मित्र रमेश पाटील यांच्या निखाऱ्यातील फुलांचे मोहक सौंदर्य आणि दाहक सामर्थ्य यांचा संयुक्त अनुभव घेण्याची संधी पहिला वाचक म्हणून मला मिळाली याचा मला अपार आनंद वाटतो. या निखाऱ्यातील फुलांच्या जिद्दीने आपल्या पावलांपुढे परिस्थितीचा पहाड कसा वाकवला आहे, अडचणींना कसे शरण आणले आहे आणि अन्यायाला कसा मृत्यूदंड दिला आहे ते सर्व कथाचित्रांमधून पाहिले आणि रमेश पाटील या मनातील आग ज्या दिशेने धावते आहे तिचा खोल प्रयत्य आला.

अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, बंधुमाधव यांच्या नंतरच्या काळात दलित कथेचा बाबुराव बागूलांनी अंतर्बाह्य कायापालट केला. बाबुरावांच्या कथेतील आशयसृष्टी आणि जीवनदृष्टी एकूणच मराठी कथेला अनोखी होती. या कथेतील दु:खांची दुनियाच निराळी होती आणि विद्रोहाचा आकांत तर सर्वस्वी अपूर्व असा होता. बाबुरावांची कथा जातिव्यवस्थेने दिलेले अमानुष दु:खही उरीपोटी वागविते आणि भांडवलीव्यवस्थेने दिलेल्या यातनांचे ओझेही ती अंगाखांद्यावर वागविते. कुणा एका वा दुसऱ्या जातीच्या कुंपणात या कथेचे वादळ बांधलेच जाऊ शकत नाही. ही कथा शोषित-पीडित मानवतेच्या दु:खांचा विद्रोही राग युद्धाच्या परिभाषेतून आळविते.

बाबुरावांची कथा प्रस्थापिताचे सर्व आरोप निकामी करून टाकते. बाबुरावांच्यानंतर अत्यंत समर्थ दलित कथा लिहिली गेली. वाघमारे, डोळस, होवाळ, शिरवाळ, डांगळे यांनी आपले वैशिष्ट्यपूर्ण कथालेखन केले. आपली अशी मोलाची स्थाने निर्माण केली. ग्रामीणजीवनापासून महानगरीय जीवनापर्यंतचा प्रचंड परीघ या कथेने आता आपल्या युगमनस्क कवेत घेतला आहे. ही कथा एखाद्या जातीवादी माणसाने विचारावी त्याप्रमाणे दु:खाला जात विचारीत नाही. दु:ख कुठेही असो, कोणाचेही असो, दु:ख हीच दु:खाची जात होय असे ही कथा मानते. कोणाच्याही दु:खाला आपले दु:ख मानते. या सर्व कथांमधून वेगवेगळ्या

नावांनी वावरत असेल, वेगवेगळ्या रूपांनी वावरत असेल पण कथेच्या नायकपदी आहे दु:ख. दु:ख हे या कथेत नायक आहे. नाना भोग भोगलेले, जिद्दीला पेटलेले आणि विद्रोहाची दाहकता व प्रकाशता घेऊन माणुसकीच्या गावाला निघालेले दु:ख हेच या कथेचे नायक आहे.

या दु:खालाच आपल्या कथेचे नायकपण देणारा, निखाऱ्यांमध्येही करपून न जाता जगणे फुलवणाऱ्या विद्रोही फुलांच्या कथा लिहिणारा आणखी एक समर्थ कथाकार रमेश पाटील यांच्या रूपाने मराठी कथा-क्षेत्रात प्रवेशतो आहे. यावेळी 'स्वागत', ' मनापासून स्वागत ' हे शब्द दाद यावी तेवढ्या उत्फूर्तपणे माझ्या ओठांत धावून आलेले आहेत.

रमेश पाटील यांची कथाशक्ती मनाला विशेष मोह घालते ती यासाठी की, दलित जाणीव ग्रामीणकथानुभवाचे खोल नियंत्रण करू लागली तर जे एक अनोखे सौंदर्यरसायन होईल त्याचा मोठा वेधक प्रत्यय ही कथा देते. त्यांच्या दलित जाणिवेच्या प्रतिभावंत हातांनी या कथा ग्रामीण जीवनातून वेचलेल्या आहेत. सामान्यपणे विदर्भातील अमरावती जिल्ह्याच्या ग्रामीण परिसरातून रमेश पाटील यांनी या कथांचे निखाऱ्यातील पीक घेतले आहे.

वऱ्हाडातील ग्रामीण जीवन व त्या जीवनात वेडेवाकडे वळवळत असलेले मागल्या हजारो वर्षांपासूनचे ताण यांच्या गर्दीत रमेश पाटील या कथाकाराला कथा गवसते. नाना पातळ्यांवरील हे ताण, आपल्या समाजजीवनाचा हा द्वंद्वस्वभाव वऱ्हाडच्या परिसरात हजारो वर्षांपासून आहे. पण पारंपरिक ग्रामीण मनाने, पारंपरिक दलित मनाने संस्कारांच्या परिणामामुळे हे जळते ताण, ताण म्हणून लक्षात घेतले नाही. वऱ्हाडच्या परिसरातील हे ताण शेळक्यांसारखा लेखक टाळतो. आपल्या समाजाच्या खऱ्या जखमेची या सर्व मंडळींनी धास्तीच घेतली होती. कारण हे ताण लक्षात घेणे सोपे नव्हते. तसे या लेखकांनी केले असते तर आपणच पूजनीय मानलेल्या श्रद्धांशी त्यांना विद्रोह करावा लागला असता आणि लोकप्रियतेचा सोनचाफा यांच्या अंगणात फुलणे अशक्य झाले असते.

रमेश पाटीलसारख्या वऱ्हाडातील ग्रामीण कथाकाराची वरील दोन्ही गोष्टींच्या संदर्भात स्थितीच निराळी होती. वऱ्हाडच्या जीवनातील

पारंपरिक सरंजामी शोषणाचे—जातीय आणि आर्थिकही शोषणाचे येथील गरीब लोकांना प्रत्यही जाळणारे ताण एक्स्पोज करणे ही प्रतिज्ञा पाटील यांच्या जन्माने आणि जगण्यानेच त्यांच्या कथेच्या कपाळी लिहिलेली आहे. आणि लोकप्रियतेचे मोसमी झाड आपल्या नावाच्या अंगणात त्यांना लावायचेच नव्हते. ही ताकद या लेखकाला त्याच्या मनाच्या उघडया दारांनी दिली. दलित साहित्याच्या दाहक आणि मोहक वादळाने दिली. बंधमुक्तीच्या आंबेडकरी जीवनसत्वांनी दिली. वऱ्हाडाच्या जीवनकलहात हा लेखक मनात आंबेडकर घेऊन शिरला. वऱ्हाडच्या मातीत हा लेखक मनात जोतिराव फुले घेऊन शिरला. वऱ्हाडातील इतर ग्रामीण लेखकांपेक्षा ही कथा खूप पुढे गेली. वऱ्हाडचे खरे रूप प्रकट करण्याला अधिक समर्थ ठरली आणि कथा-गुणांच्या दृष्टीनेही निराळी ठरली त्याचे कारण त्याच्या कलावंत मनाचा हा इतर लेखकांपेक्षा नवा निराळा असलेला स्वभाव आहे.

रमेश पाटील यांची कथा मराठी कथासमीक्षेपुढे एक नवे वाङमयीन वास्तव उभे करीत आहे. एक नवा उजेड पुरवीत आहे. ही कथा ग्रामीण आहे. पण दलित कथा असल्याने ग्रामीण जीवनातील दलित केंद्र ही कथा आपले मध्यवर्ती केन्द्र मानते. त्यामुळे इतर ग्रामीण लेखकांप्रमाणे ही कथा ग्रामीण राहत नाही. इतर दलित लेखकांप्रमाणे ही कथा दलितही असत नाही. ग्रामीणता येते म्हणून ती दलित लेखकांच्यापेक्षा निराळी ठरते आणि दलित जाणिवेची उपस्थिती तिच्यात असल्याने विद्यमान ग्रामीण लेखकांच्याही पुढे ती जाते. दलितांच्या ग्रामीण कथेची एक नवी आकृती, आंबेडकर जाणिवेने सिद्ध केलेली ग्रामीण आशयाची एक नवी प्रकृती इथे साकार होते. हा सिंथेसिसच रमेश पाटील यांच्या कथेला वेगळे स्वरूप प्राप्त करू देतो.

यापुढच्या दलित कथेचा मोहरा या सिंथेसिसच्या खाणीकडे वळणे अटळ आहे. ही गरज केवळ आपल्या वाङमयीन जीवनाची नाही तर आपल्या सांस्कृतिक जीवनाचीही ती मोठी गरज आहे. रमेश पाटील यांनी या दिशेने भक्कम पाऊल टाकले आहे ही गोष्ट मला विशेष महत्त्वाची वाटते.

कथाकार रमेश पाटील हा मनाला पडणारे पीळ या कथासंग्रहातील कथांच्या मुळाशी आहेत. ग्रामीण भागातील पूर्वापार चालत आलेला स्पृश्य आणि अस्पृश्य या नात्यातील कलहनाट्य लक्षात घेणे, व त्याच्या मूळरूपात ते शब्द बांधणे– ते कथाशिल्पात कोरणे ही या कथेची एक प्रकृती आहे. ही कथाप्रकृती आर्थिक, धार्मिक, सामाजिक अशा विविध पातळ्यांवरून या कलहाचे दर्शन घडवते. नवे बंधनमुक्तीसाठी आंबेडकरांनी उभे केलेले मन व त्याच्या वाटा रोखणारे पारंपरिक मन ही जाणीव जशी या कथेचे नियंत्रण करते त्याप्रमाणे दलित समाजातील पांढरपेशा आणि अडाणी यांच्यातीलही नवजात ताण व्यक्त करते. ही कथा जातिव्यवस्थेतील कुरूपतेचेच यथार्थदर्शन घडविते असे नाही तर भुकेच्या सामर्थ्याचे, तिच्या भडकलेल्या कधी करुण तर कधी प्रलयंकारी रूपाचे सामर्थ्यही ही कथा मांडते.

रमेश पाटील यांच्या कथेचा महनीय विशेष असा की या कथेतील माणसे वऱ्हाडचा बहुरंगी चित्रपट आपल्या डोळ्यांपुढे उभा करतात. ही माणसे, त्यांची कुटुंबे, त्यांचे मोहल्ले, त्यांची गावे, त्या गावागावांतील संबंध अशी समग्र सांस्कृतिक गजबज आपल्या डोळ्यांपुढे या कथांमधून उभी राहते. हे आपल्या भारतीय जीवनाचे वऱ्हाडच्याद्वारा घडणारे प्रातिनिधीक दर्शनच होय. पण याहीपेक्षा हे लक्षात येते की या कथेतील अन्यायग्रस्त माणसे माणुसकीची लढाई लढत आहेत. ही लढाई लढताना ती पराभूत होत नाहीत. त्यांची माणुसकी तर कधीच पराभूत होत नाही. या युद्धात, मूल्यांच्या लढाईत अन्यायकर्त्यांसोबत लढताना त्यांची माणुसकी अधिकच तेज:पुज होऊन उठते. मूल्यांसाठी द्यावी लागणारी किंमत त्यांना उन्नत करते. स्वत:ला निर्माण करण्यासाठी द्यावा लागणारा लढा क्वचित यांचे जीव घेतो पण माणुसकीचा बळी कुठे जात नाही. अण्णाभाऊ साठ्यांच्या कथेत असे घडले आहे. बाबुराव बागूलांच्या कथेनेही माणुसकीच्या विजयाशी आपली प्रतिबद्धता जपली आहे. रमेश पाटील यांचीही कथा हा धम्मध्वज, हे नैतिकतेचे निशाण खाली पडू देत नाही. या दृष्टीने 'प्रश्न', 'उजेडाची फुले', 'ऊनसावली', 'मी भाकरीसाठी नाही', 'पुण्यदान' या कथा मला फार महत्त्वाच्या वाटल्या.

'प्रश्न' या कथेत रमेश पाटलांनी भूकेच्या काव्यातील कारुण्याचा डोह साक्षात केला आहे. या कथेचा नायक मंगल हा हमाल आहे. अधू आहे. एके दिवशी त्याला कामच मिळत नाही. भूक त्याच्या जिवावर उठते. फुटाण्याच्या दुकानापुढे पडलेले फुटाण्याचे चार दाणे तो पोटात टाकतो. एका मुलाच्या हातातील आठ आण्याचे नाणे तो उचलतो. एका म्हाताऱ्याचे पैसे पडतात ते घेतो. हॉटेलात जातो. त्याच्या दुर्दैवाने फाटक्या खिशातून पैसे पडून गेलेले असतात. हॉटेलवाला खूप मारतो. येवून झोपतो. सकाळी एक कुत्रे त्याच्या तोंडाला स्पर्श करते. त्याला मारावे असे त्याला वाटते पण ते त्याच्याने होत नाही. त्याला वाटते कुत्रं आणि आपण एकाच प्रश्नाभोवती फिरत आहोत. मंगल कुत्र्याला मायेने कुरवाळतो. त्या स्पर्शानं कुत्रे आपल्या शेपटातून पोटाचा प्रश्न अधिकाधिक हलवू लागतं. ही पशूपातळीवरची भूकेची भीषणता मांडतानाही पाटील यांची कथा कुत्रे आणि माणूस यांच्या संबंधातून मंगलची माणुसकी अधिक उन्नत करून टाकते.

' ऊनसावली ' या कथेतून सदा, शांती व रावसाहेब यांच्या चित्रणातून अन्यायाविरुद्ध उठलेल्या वादळाला ते कथेत बांधतात. या कथेत गरिबी आहे. सदाची जिद्द आहे. शांतीची अगतिकता आहे. रावसाहेबांची घरंदाज मग्रुरी आहे आणि विद्रोहाने पेटलेला व त्याचे फळ म्हणून पोलिसांच्या हवाली होणारा विजयी मुद्रेचा कृतार्थतेचा अनुभव भोगणारा सदा आहे. स्वतःला दुःखात लोटून टोपल्यातील सडलेला आंबा तो काढून फेकतो. असाच विद्रोह उजेडातील फुलेमधील पारुबाई करते. पतीचा खून करणाऱ्या आणि आपल्याला रखेल करणाऱ्या रावसाहेबांच्या अख्ख्या घराची रावसाहेबासकट चिता पारुबाई पेटवते. अन्याच भडकला म्हणजे न्यायासाठी तो काय करील याचा नेम नाही. हेही कथा सांगते. 'मी भाकरीसाठी नाही' याही कथेत फत्तूच्या चित्रणातून पाटील वणव्यात मोहोरलेल्या माणूसकीचे शिल्प कोरतात. ' थोटचा हातानं खोटा धंदा करणार नाही. ' ही गाठ मारून फत्तूच्या कथेला पाटील तेजस्वी करून टाकतात. 'पुण्यदान'मध्ये बदमाषांच्या पुण्यदानाच्या दंभाचे नाट्य चितारले जाते. तर ' गिधाडे 'मध्ये

मानवी आकारातील गिधाडांच्या चोची त्यांच्याच घशात गेल्याची मोठी सूचक कहाणी ते सादर करतात. जे कोपरे मानवी मन उघड दाखवीत नाहीत ते कोडगे कोपरे इथे उलगडले जातात. 'भूक' मध्ये लेखक भूकेच्या तलावातील जिद्दीचे चांदणे चितारतो तर 'विझता दिवा' मध्ये दिव्याच्या प्रेमात पडलेल्या विद्रोही तुफानाचे स्वभावचित्रण ते करतात. तर 'एका सूडाचा प्रवास' मध्ये मोठ्या नाट्यमय पद्धतीने दलित-सवर्ण यांच्यातील तीव्र द्वंद्व चितारीत खंडू पाटलाच्या काळ्या सूर्याचा निरुपद्रवी अस्त चितारला जातो. हा सूडाचा प्रवास स्वत: काळच जणू पराभूत करून टाकतो. अन्यायग्रस्तांच्या बाजूने इथे काळाचे कॅरेक्टर उभे राहते. युगाची ढाल दुखांच्या बाजूने उभी राहते. आणि न जाळताही सूडाचा अग्नी विझून जातो. सुंठीवाचून खोकला गेल्याची ही कथाही वेधक आहे. 'नातं' या कथेत सुशिक्षित दलितांच्या कृतघ्नपणाचे भेदक चित्र काढले आहे. दलित बापाच्या यातनांचा अजिंठा इथे कोरला जातो ही समाजसमीक्षेची कथाही डोक्यात छान भिनते.

या प्रकारे वऱ्हाडच्या जीवनातील कुरूपता आणि सुरूपता यांच्या चित्रणाची ही कथा आहे. या चित्रणात येणारी–

१) 'त्याच्या थोट्या हातात भाकरीचा प्रश्न उभा होता आणि त्याच्या चोहिकडे पसरलेल्या आसवांच्या रानाकडे पाहून त्याचे डोळे झरत होते.'

२) 'पाटलाचं सारं आयुष्य भोवती गुंडाळलेलं एक वस्त्र होऊन जळत होतं.'

३) 'कुत्रं आणि आपण एकाच प्रश्नाभोवती फिरत आहो असे त्याला वाटले.'

४) 'त्यांचे अपार करुणेनं भरून आलेले डोळे बुद्धाच्या अर्धोन्मीलित पापण्यांप्रमाणे लागले होते.'

५) 'गटूलाल शेटजीचे नोकर व नातेवाईक पुण्य पदरात पाडून स्वराज्य मिळाल्याच्या आनंदात घराकडे जात होते.'

६) 'आईच्या गोड गुणाचा वारसा दुधातून लेकाच्याही अंगी आला.'

७) ' पण ह्या दुःखापेक्षाही त्याला गावातील लोकांच्या ढिगाऱ्यावरील सडवणारा एक सडका आंबा आपण काढून फेकून दिला ह्याचं समाधान त्याला कितीतरी मोठं होतं. '

८) 'ज्याच्यासोबत मी तुझ्यासोबत आलो ती माझी भयानक भूक सोबत आणली आहे. '

९) ' हॉटेलातील निघणाऱ्या ताज्या मालावर बिनपैशाने लाईन मारत होता.'

१०) ' ह्या स्पर्शानं कुत्रं आपल्या वाकड्या शेपटातून पोटाचा प्रश्न अधिकाधिक हलवू लागलं. '

११) ' आपल्या तोंडाच्या चोचा पंखात लपवे. '

१२) ' ती दोनबी झाडं शंकरभाऊंच्या हाडामासावरच जगत होती. '

१३) ' मुंग्यांना मरणाची चाहूल लागली म्हणजे पंख फुटतात म्हणतात. '

१४) ' कोनायच्याच कनसाले हासू फुटलं नाई ! '

१५) ' त्याले डोया आला पण त्यानं आपल्या हातानं फोडला. '

१६) ' झोपेत त्याच्या स्वप्नात एकसारखं भाकरीचं चाक गरगर फिरू लागलं. '

अशी विद्युतभारित वाक्ये वाचकाला खिळवून ठेवतात. वऱ्हाडी बोलीचा मोठा समर्पक वापर पाटील करतात, एका तटस्थ मनाने जीवनातील नाट्य कथाबद्ध करतात. हेही पाटलांच्या कथेचे वैशिष्ट्य म्हणून लक्षणीय ठरते.

( रमेश पाटील यांची कथानिष्ठा अधिक प्रबल व प्रगल्भ झाली तर ते मराठीला फार मोठी कथा देऊ शकतील यात मला शंका वाटत नाही), त्यांच्या कथेचा उद्याचा सन्माननीय संसार पाहायला इतराप्रमाणे मीही आतुर झालो आहे.

**निखाऱ्यातील फुले : रमेश पाटील**

# विद्रोहाचे नाट्यसौंदर्य

बाजीराव रामटेके यांची " इथे माणसाला स्थान नाही " ही नाट्यकृती प्रकाशित होत आहे याबद्दल रामटेके यांचे मी मन:पूर्वक अभिनंदन करतो. या नाटकामुळे दलित रंगभूमिला पुन्हा विद्रोहाचे तांडव करणारे वैभव प्राप्त होणार आहे. धर्मांतरोत्तर दलितांच्या जीवनातील जगण्यामरण्याच्या जळत्या रेषेवरील भेदक नाट्यलावण्य बाजीराव रामटेके फुलवीत आहेत. उजेडाच्या ध्यासाने पेट घेतलेले आंबेडकर–शब्द त्यांच्या या नाटकाचे संचलन करीत आहेत. हा नाटकार लिहित का नाही ? तो लेखणी म्यान करून का बसला ? त्याने दलितांच्या जीवनातील नटसम्राट का फुलविले नाही ? बहिष्कृतांच्या यातनांचे भारत त्याने रंगभूमिवर का आणले नाही ? पंख फुटलेली गुलामी आणि गुलामीला आग लावत सुटलेली दलित अस्मिता त्याने नाना कळांची कमळे फुलवून का साकार केली नाही ? हे अभिमान वाटावा या पातळीवरून या लेखकाला साधले असते. म्हणून लेखणी म्यान करण्याच्या त्याच्या अपराधाबद्दल मोठ्या यातना होतात. पण आता तरी रामटेके यांनी थांबू नये. दलित रंगभूमीवर भेदक सौंदर्याचे नाट्यपिसारे फुलवावे. दलित रंगभूमी रामटेके यांच्या नाट्यकृतीची डोळ्यात तेल घालून वाट बघत आहे हे त्यांनी लक्षात घ्यावे. या नाटकाची कथारेषा अशी: शंभू हा पांडुरंगभक्त ब्राह्मण त्याच्या भावाने बलात्कार केलेल्या अस्पृश्य तरुणींशी लग्न करतो. गाव बदलतो. व महार म्हणून जगतो. बलात्कारीत तरुणी मुकुंदाची प्रेयसी असते. तो सैरभैर होतो. सैन्यातून निवृत्त होतो तेव्हा यादव नावाचा मुलगा मागे ठेवून त्याचा भाऊ व भावजय जग सोडून जातात. शंभूला सखू व विनायक ही दोन मुले. सखूचे पाटलाच्या विठ्ठलवर प्रेम असते. पण पाटील मुलीला लग्नापूर्वी आमच्याकडे ठेवा म्हणतो. लग्नास विरोध करतो. सवर्ण दलितांवर अत्याचार करतात. सखूची बेअब्रू करतात. शंभूबोवाची भक्तीची नशा उतरते. तो धर्मांतराचा अवलंब करतो.

शेवटी मुकुंद यादवसाठी सखूला मागणी घालतो . . . या कथासूत्राचे प्रभावी प्रकाशन हे नाटक करते. पण या कथासूत्रातून लेखकाने जे सामाजिक सत्यांचे निखारे फुलविले आहेत त्यामुळे वाचक विलक्षण अंतर्मुख होतो.

शंभूच्या योजनेतून भक्तिची समाज "जैसा था" ठेवण्यची विषारी भूमिका मांडली जाते. भक्ती हे शोषणव्यवस्थेने शोषितांना मृतवत ठेवण्यासाठी सुरू केलेले मूल्य आहे. भक्तिने उपेक्षितांना मृगजळामागे धावायला लावून पाण्यावाचून मारले. अन्यायाविरुद्ध पीडितांना उठूच दिले नाही. या भक्तिच्या विषाने दलितांच्या पिढ्या गारद झालेल्या आहेत. भक्तिचे क्लोरोफॉर्मपण धर्मांतरोत्तरकाळातील सखू-विनायकांच्या पिढीच्या लक्षात आले आहे. देवभक्त दलित कितीही सुसंस्कृत झाला तरी घाणेरडे अशिक्षित सवर्ण त्यांना माणुसकीची वागणूक देत नाहीत हे कटू सत्य या नाटकाने रंगभूमीवर खेचले आहे.

'युद्धाच्या वार्ता रम्य' प्रमाणे दलितांच्या दुःखासंबंधी बोलता यायचे नाही दलितांच्या यातना भोगल्याशिवाय डॉ आंबेडकर कळायचे नाहीत. धर्मांतराची महानता कळायची नाही. आणि वेगळ्या दलित–स्थानाच्या मागणीचे मर्मही कळायचे नाही. दुसऱ्या बाजूने भारतीय संस्कृती, हिंदूधर्म, देवदेवता, आध्यात्मिक तत्त्वज्ञाने व भक्ती यांचा विषारीपणाही कळायचा नाही. लेखकाने म्हटले आहे : बाळंतपणाच्या वेदना वांझोट्या बाईला कळणार नाही त्याचप्रमाणे महार झाल्याशिवाय भारतीय संस्कृतीच्या थोरवीबद्दल निष्कर्ष मांडण्याचा अधिकार प्राप्त व्हायचा नाही. . . " माझ्यासारख्या कोणत्याही हिंदूधर्माच्या, आणि हिंदू-संस्कृतीच्या अभिमान्याला शूद्र म्हणून जीवन जगावयास लावले तर त्यालाही पटेल की, इथे जात सोडून माणसासारखे जगता येणार नाही. जो मानवजातीचे कल्याण इच्छितो अशा कोणत्याही महापुरुषाला शूद्र म्हणून जगावयास लावले तर तोसुद्धा एक दिवस माझ्याच मार्गाने येईल. त्यालाही पटेल की इथे माणसाला स्थान नाही." लेखकाचे शंभूच्या तोंडून निघालेले हे शब्द हिंदूंनी लक्षात घ्यायला हवेत. लेखक या शब्दांतून हिंदूसंस्कृतीचे मनुष्यमारक असे अमानुष रूप अधोरेखित करीत आहे.

ही नाटयकृती धर्मांतराने अंतरबाह्य स्पंदित झालेली आहे. तिने हिंदुसंस्कृतीपुढे टाकलेला प्रश्न दलित रंगभूमीवर पहिल्यांदाच ज्वाला झालेला आहे. आणि हे ज्वालानाटय या नाटयकृतीतून सौंदर्यपिसारा फुलवीत साकार झाले आहे.

रामटेके जर यापुढे प्रतिभेला पीळ देऊन लिहू लागले तर आपल्या समाजातील दुःखसम्राटांचे नाटय, भेदक विचारनाटय ते ताकदीने फुलवू शकतील. दलित रंगभूमिला त्यांच्या नाटयकृतींनी श्रीमंत व्हायचे आहे. म्हणून रामटेकेंनी नेटाने लिहावे. ते दलित रंगभूमिला नवे सामर्थ्य देऊ शकतात. ही ताकद त्यांच्या नाटयप्रतिभेत निश्चित आहे.

**इथे माणसाला स्थान नाही : बाजीराव रामटेके**

# जखमांचे शहर

हे शहर आहे नवोदित एकांकिकाकार अमर रामटेके यांचे अनंत जखमांचे हे शहर रामटेके यांनी पाहिले आणि या जखमांसकट या शहराला त्यांनी आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले.

आपल्याकडील खेडे आणि शहर यांच्या मनांच्या ठेवणीत जुळया भावांप्रमाणे साम्य आहे. या जुळया भावंडांच्या वेषभूषा वेगवेगळया असतात एवढेच. त्यामुळे अमर रामटेक्यांचे हे शहर आपल्या देशातील कोणत्याही गावाचे प्रतिबिंब दाखवणारा आरसा झालेले आहे.

विद्रोही जाणिवांची नाटयाविष्कार करणारी मंडळी नागपूरात मागील आठ–दहा वर्षांपासून काम करीत आहेत. पाच–सहा वर्षांपासून श्री. रामटेके हेही या क्षेत्रात काम करीत आहेत. अडचणींना हसत, पराभवाची चेष्टा करीत रामटेके या क्षेत्रात जिद्दीने पावले टाकीत आहेत ही गौरवाची बाब आहे.

दलित रंगभूमी आज शेकडो वर्षे नांगरल्याविना असलेल्या भूमीतून विद्रोहाचे पीक सिद्ध करीत आहे. या देशातील गावागावांतून उपेक्षि-

तांच्या जीवनातील अस्पर्श नाटच या रंगभूमीला हाका मारीत आहे. अज्ञान आणि लाचारी, दारिद्र्य आणि बेकारी, अंधश्रद्धा आणि सामाजिक तुच्छता, दैववादी परंपरांचे ओझे आणि गतकालीन सामाजिक प्रतिष्ठांचे राक्षसी अहंकार या सर्व कौरूप्याच्या नाळी कालच्या अमानुष समाजसंस्थेशी बांधलेल्या आहेत. या कौरूप्याच्या हजारो छटा, विद्रोहाच्या हजारो लाटा, नाटयप्रतिभांची वाट पाहत आहेत. दलित रंगभूमी काही हाकांपर्यंत तरी आज पोहोचत आहे. आणि त्या जीवनातील ही अनोखी स्पंदने टिपत आहे. ही आजच्या मराठी रंगभूमीने गौरवाची बाब मानायला हवी.

श्री. अमर रामटेके हेही या दलित रंगभूमीवर आपले शहर घेऊन येत आहेत याबद्दल, हे शहर प्रथमच पुस्तिकेच्या रूपात प्रकाशित पुढे येत आहे याबद्दल रामटेके यांचे मनापासून अभिनंदन करतो.

अमर रामटेके नाटयलेखक आहेत, स्वत: एक चांगले नट आहेत आणि आपल्या नाटकाचे दिग्दर्शनही ते करतात. त्यांची एक नाटच-संस्थाही आहे आणि आपल्या मित्रांना सोबत घेऊन ते सतत तालमी आणि प्रयोग अशा कार्यक्रमांत धुंद असतात. नागपुरातील पथनाटयाच्या चळवळीशी, दलित रंगभूमीशी त्यांचे घनिष्ठ संबंध आहेत. एक जागृत जिद्दी आणि धडपडणारे मन असल्याने रामटेकेंना शहराच्या जखमा बघता येतात. या जखमांचे आक्रंदन ऐकता येते. या संवेदनस्वभावाची जडणघडण आंबेडकरी प्रेरणेमुळे झालेली असल्यानेच या जखमांच्या कैफियती रामटेके यांना मांडता आलेल्या आहेत, हे उघड आहे.

शहर हे एक नाट्कले आहे. त्यात छोटछोटे अनेक अंक आहेत. अंक म्हणजे दृश्ये.

पहिल्यात – पोलिसांची दडपशाही.
दुसऱ्यात – पार्टी कार्यालयातील पिळवणूक.
तिसऱ्यात – परमेश्वराच्या अस्तित्वाची चर्चा.
चौथ्यात – बेकारी आणि नोकऱ्यांच्या जगातील शोषण.
पाचव्यात – आमदारांची तत्त्वशून्यता व केवळ पोटार्थी वृत्ती यांचा निषेध.

सहाव्यात – फादरची बेईमानी व धर्मांतरितांचा संताप.

सातव्यात – व्यवस्थेचा भाग झालेले व व्यवस्थेच्या बाहेर असलेले यातील कलह.

आठव्यात – रामाच्या शोभायात्रेतील वाघनांचे दर्शन, विसंगती.

नवव्यात – विद्यार्थ्यांमधील बेजबाबदारपणा व भोगवादी वृत्ती.

दहाव्यात – धार्मिकांमधील भूमीवाद व मूर्ख शौर्य.

अकराव्यात– अन्यायाच्या संदर्भातील मंत्री, पोलीसखाते यांचे वेळकाढू धोरण. टाळटाळ.

शेवटी सर्वांना एकत्र येवून लढण्याचा संदेश. फुले-आंबेडकरांच्या या संदर्भातील विचारांशी लेखन आपले नाते जोडते.

बातम्यांतील खोटेपणाचे दर्शन उपहासगर्भ संदर्भांनी होते, आणि आकाशवाणीची दरदिवशीची सभा इतके सगळे जखमांचे आक्रंदन दररोज सुरू असताना, नवनव्या जखमांचे जन्म होत असतानाही मंगल वाद्यानेच सुरू होते. हे विरोध दर्शन उपहासपूर्ण पद्धतीने साकार होते आणि हे नाटुकले संपते

(या दृश्यांच्या रचनेत, मांडणीत अनेक ठिकाणी कच्चेपणा आहे. पुरेशी प्रगल्भ ट्रिटमेंट दिली जात नाही. पात्रांचे वागणे निःसंदर्भ होते आणि ते कलापातळीवर फिल होत नाही. या अंगाने रामटेके यांनी खूपच चिंतन करायची गरज आहे.) पहिल्याच दृश्यात 'ही घे बादली, हा घे ब्रश आणि दे रंगवून भिंत,' हा संवाद आणि नंतरचे काही संवाद यांची या नाटुकल्यात गरज काय ? असे बारके अनेक दोष या एकांकिकेत म्हणण्यापेक्षा अनेक लघु–प्रवेशी नाटुकल्यात दाखविता येतील पण लेखकाला शहरातून एक मोठा कॅनव्हास अंधूक दिसला हे महत्त्वाचे आहे. आणखी काही काळानंतर हाच कॅनव्हास ते निराळया पद्धतीने, मोठ्या कलासामर्थ्याने मांडू शकतील, असा विश्वास आहे. यादृष्टीने या नाटुकल्यातील यशाची नोंद घ्यायला हवी. अमर रामटेके यांच्या प्रतिभेने ही झेप घेतली त्याबद्दल, ती ज्या प्रमाणात यशस्वी झाली त्याबद्दल रामटेकेंचे अभिनंदन करतो.

आज दलित नाट्यप्रतिभांपुढे मोठे प्रश्न उभे ठाकलेले आहेत. हे प्रश्न, दलित जीवनातील नाट्यवैविध्य समर्थपणे टिपण्याचे एका बाजूने आहेत आणि दुसऱ्या बाजूने प्रस्थापित व्यवस्थेचे नाटककार परिवर्तनाच्या चळवळीपुढे जे अवरोध निर्माण करून दलितांविषयीची तुच्छता पसरवीत आहेत, त्यांनाही उत्तरे देण्याचे ऐतिहासिक कार्य या दलित नाट्यप्रतिभांना करायचे आहे. कन्यादान, पुरुष, सूर्यास्त अशा नाटकांनी ही चॅलेंजेस मांडलेली आहेत.व्यवस्था आपला विषारी स्वभाव साहित्यातून कसा व्यक्त करते त्याचे ही नाटके म्हणजे वस्तुपाठच होत.

अमर रामटेके यांनी आजच्या मराठी नाटकांच्या मध्यधारेतील संघर्षात उडी घेण्याचा, तिथे वापरल्या जाणाऱ्या शस्त्रास्त्रांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला तर त्यांच्या नाट्यप्रतिभेला या सांस्कृतिक संघर्षाची मूलगामी रक्तकमळे फुलविता येतील.

हे सामर्थ्य श्री. रामटेके यांच्या प्रतिभेला लाभो, ही सदिच्छा व्यक्त करून ही प्रस्तावना आटोपती घेतो

शहर : अमर रामटेके

# स्वातंत्र्याच्या तहानेचे नाट्य

– 'स्वातंत्र्य हवे आम्हाला'या एकांकिकेच्या प्रकाशनाच्या निमित्ताने श्री. वि. रु. गोडबोले यांचे मी मनापासून अभिनंदन करतो. गोडबोले यांचे विशेष कौतुक करायचे ते यासाठी की महाविद्यालयात शिकणारे गोडबोले अल्पवयात रंगभूमीच्या महादेशात उतरले आहेत.

दलितांची विद्रोही प्रतिभा रंगभूमीकडे जग बदलणारी महाशक्ती म्हणून पाहते. आंबेडकरी प्रेरणेने या महाशक्तीची घटनातत्त्वे सिद्ध झालेली आहेत. आपल्या समाजातील मर्मस्पर्शी, अस्पर्शीत असे खरे जीवननाट्य त्यातील कडोविकडीची मूलगामी द्वंद्व केवळ दलित रंगभूमीच प्रकाशमान करू शकते. कारण दलित प्रतिभा हीच क्रांतीविरोधी संचिताचा मोह तुडवून जाऊ शकते. ही प्रतिभा पूर्णतः अंतर्मुख,चिकित्सक

आणि भेदक झाली तर उत्कटतेची व अन्वर्थकतेची पांढरपेशी व्याख्या बदलून टाकणारे नाट्यसौंदर्य तीच साकार करू शकते. दलित प्रतिभा या दिशेने क्रमाने पावले टाकू लागली आहे ही बाब बलदायी बाहे.

दलित समाज आपली पारंपरिक प्रसारमाध्यमे १९५६ नंतर गमावून बसला आहे. तमाशा, गोंधळ, कलापथके, जलसे, कव्वाली, भजने ही माध्यमे आज हरपली आहेत. त्यामुळे प्रबोधनाचे आंबेडकर–वादळ घरोघरी पोहोचविण्याची प्रक्रिया तशी अविरुद्ध झाली आहे. यावेळी दलित साहित्यातील इतर वाङमयप्रकारांच्या तुलनेने वरील सर्व प्रसारमाध्यमे आत्मसात करू शकणारी रंगभूमीच दलित चळवळीचे सामर्थ्य माध्यम ठरू शकते. वरील प्रसारमाध्यमांचे युगसंगत आधुनिकी-करण दलित रंगभूमी करू शकली तर तिच्याइतके अन्वर्थक पुढच्या दलित काळासाठी दुसरे काही असू शकणार नाही. आणि हे तिने केले नाही तर तिच्यासारखी करंटीही केवळ तीच ठरणार. दलित रंगभूमीवर इतिहासाने जीवनक्रांतीची जबाबदारी टाकलेली आहे. पण ही जबाबदारी यशस्वीपणे पाडता पार येण्यासाठी दलित रंगभूमीला जीवनाचे आंबेडकरी सौंदर्यशास्त्र व अत्यंत प्रगल्भ असे नाट्यसौंदर्य यांच्या एकजीव मिलनाचीच आराधना केली पाहिजे.

श्री. गोडबोले या रंगभूमीच्या अवघड प्रवाहात उतरले आहेत. या एकांकिकेत त्यांनी स्वातंत्र्य या घटनेचे अस्तित्वच नाकारले आहे. ज्याला स्वातंत्र्य म्हटले जाते त्याला प्रत्यक्षाचे पुरावे बघितले तर स्वातंत्र्य म्हणण्यासारखी स्थिती नाही. शोषितांसाठी तर ते विशुद्ध पारतंत्र्य आहे. लेखकाला स्वातंत्र्य हवे चार्वाका–बुद्धाच्या, फुले–आंबेडकरांच्या मनातले. या देशाने करावयाचे आहे ते स्वातंत्र्ययुद्ध निराळेच आहे. ते मनुष्यतेच्या सुंदर वाढीसाठी हवे आहे. या युद्धात आज दलित रंगभूमी उतरली आहे आणि एक सैनिक म्हणून या युद्धात गोडबोलेही उतरले आहेत. मौलिक नाट्यकृतींनी त्यांची प्रतिभा सुफलाम् होवो ही शुभेच्छा व्यक्त करतो.

**स्वातंत्र्य हवे आम्हाला : वि. रु गोडबोले**

# एका नियतकालिकाचे अंधेरे बंद कमरे

आमचे मित्र वामन निंबाळकर यांनी 'अस्मितादर्शची नऊ वर्षे' ही पुस्तिका लिहून एक उद्याचा इतिहास ठरणारे आणि आजचे महत्त्वाचे सामाजिक कार्यच अत्यंत मेहनतीने आणि साक्षेपाने केले आहे. सत्याला अनेक अडचणीतून, काट्यांच्या अड्ड्यांमधून प्रवासावे लागते. अशा मुजोर काळोखातून जातानाची त्याची पाळी शिव्या खाण्याची असते. सत्याला द्याव्या लागणाऱ्या सत्त्वपरीक्षाही अत्यंत कठोर असतात. ह्या प्रक्रियेचा भोगवटा निंबाळकरांच्या या पुस्तिकेतील वस्तुस्थितीने आजवर भोगलेला आहे. आणि वामन निंबाळकरांनी लिहिले नसते तर या पुस्तिकेद्वारे गावकुसाआत आलेली वास्तविकता आणखी किती काळ गावकुसावाहेर राहिली असती कुणास ठाऊक !

वामन निंबाळकरांनीच हे लिहिण्याला ऐतिहासिक दुजोरा आहे. कारण त्यात इतिहासाचीही इज्जत आहे. त्यांचे वाङ्मयीन कर्तृत्वही औरंगाबादेला अस्मितादर्शच्या आधीपासून आणि अस्मितादर्शच्या सोबत साकार झाले आहे.

एक स्वतंत्रपिंडाचा मानवतावादी कवी म्हणून मराठी रसिकतेने वामन निंबाळकरांना सस्नेह पोच दिली आहे. १९६५ नंतर सामाजिक जाणिवेची कविता लिहिणाऱ्या कवींमध्ये त्यांनी महत्त्वाचे स्थान मिळविले आहे. भूत, भविष्य आणि वर्तमान यांनी आंदोलित होणारी जाणिवेची अत्यंत भेदक आणि मूल्यगर्भ वलये त्यांच्या अस्तित्वाचे कथासागर आणि व्यथासागर घेऊन त्यांच्या कवितेत सूर्यसाकार झालेली आहेत. त्यांच्या 'माय'ने मराठी रसिकतेच्या गहिवराचे पारणे फेडलेले आहे. 'गावकुसाबाहेरील कविता' मध्ये लालित्याची रंगस्वी कारंजी आणि नादवत्तेची केंद्रे पेरून ठेवणाऱ्या या विद्रोही कवीने नुकतीच "महायुद्ध" या दुसऱ्या काव्यसंग्रहाची घोषणा केलेली आहे.

वृत्तपत्रांच्या मुलुखातही त्यांनी धाडसी "फेरफटके" मारलेले आहेत. साप्ताहिक भीमसंदेश आणि साप्ताहिक प्रबोधन ही नियतकालिके

त्यांनी आपल्या झुंजार पद्धतीने चालविली. त्यांचे काही मौलिक व संग्राह्य विशेषांक त्यांनी काढले. मागे सर्वत्र ओसाड असताना, हाती काही नसताना केवळच डोक्याच्या बळावर केलेल्या या गोष्टींचे मोल निश्चितच ऐतिहासिक आहे. हा त्यांचा विद्रोह पराक्रमाचा साथी ठरावा.

१९७६ मध्ये मुंबई येथे म. बौद्ध साहित्य परिषदेच्या विद्यमाने भरलेल्या बी. सी. संमेलनातील कवी – संमेलनाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले.

औरंगाबादच्या डॉ. आंबेडकर अध्ययन मंडळाचे ते संस्थापक आणि अध्यक्षही आहेत. एक सामाजिक कार्यकर्ते आणि पत्रकार म्हणून ते परिचित आहेत, सामाजिक, सांस्कृतिक व वाङ्मयीन विषयावरील निदान पाच पुस्तके होतील एवढे लेख प्रकाशित झाले आहेत. शिवाय कथा, व्यक्तिचित्रे आणि उपेक्षितांचे कवी आणि गायक इत्यादी लेखनही त्याचे मौलिक आहे.

जन्माआधीपासून अस्मितादर्शचे नि:पक्षपाती चरित्र निंबाळकरांनी लिहिणे ह्या घटनेला एक स्वयंभू अर्थ आहे. ते सर्वकाळी अस्मितादर्शचे जिवलग सांगाती होते. नऊ वर्षांपैकी साडेआठ वर्षे ते अस्मितादर्शचे या ना त्या संदर्भात संपादक होते. ७१ पर्यंत ते पानतावणे यांचेबरोबर अस्मितादर्शचे प्रमुख संपादक होते. नंतर क्रमाने सहाय्यक, सहकारी या पद्धतीने प्रमुख संपादकत्वापासून ते दूर ठेवले गेले. पण होते अस्मितादर्शच्या संपादक मंडळातच सक्रीयपणे वावरत. अस्मितादर्शच्या जन्मकथेतील नायक डॉ. वानखडे आहेत तर इतर पात्रे रा. ग. जाधव, निंबाळकर, हिवराळे, रायमाने हे आहेत. नावरूप प्राप्त झालेल्या अस्मितादर्शशी पानतावणे यांचा घनिष्ट संबंध आहे. तर या आधीच्या आणि त्या जन्माआधीच्याही अपूर्व प्रक्रियेशी डॉ. वानखडे, रा. ग. जाधव, हिवराळे, रायमाने यांचेबरोबर निंबाळकरांचा संबध आणि सहभाग आहे. त्यावेळी झालेल्या सर्व बैठकींच्या वृत्तांच्या फायली त्यांचेजवळ आहेत. त्या फायलीतील इतिहासाचे स्वागत म्हणजे सदर पुस्तिका. 'हा सत्य नावाचा इतिहास' आहे. अस्मितादर्शच्या चरित्रातील आजवर दडवली गेलेली म्हणून अज्ञात राहिलेली दालने आहेत.

हा अस्मितादर्शचा एक्सरे आहे. मुळात कुठल्याही ऐतिहासिक घटनेचा अलंकार स्वभावोक्ती हाच असतो. पण कधी एखादा वक्रोक्तिजिवितकार वर्तमान या ऐतिहासिक घटनांचा विनयभंग करीत असतो, आणि चुकीचे पण सोयीचे निष्कर्ष अनभिज्ञ भविष्याच्या हाती देतो. तेव्हा "उद्धवा अजब तुझे सरकार" म्हणण्यासाठी अशा पुस्तिकेला जन्म देणे अटळ असते. वस्तुस्थितीच्या जगाचा मानवतावाद मांडून दाखवावा लागतो. हे सर्वच कुणा व्यक्ति-साठी करायचे कारण नसते. केवळ वस्तुस्थितीच्या, शीलाखातर इभ्रतीखातरही, सत्याच्या निष्ठेखातरही हे करणे आवश्यक ठरते. निंबाळकरांनी याच वास्तवनिष्ठेने याच पुस्तिकेतील शब्दांजवळ अस्मितादर्शची आता विकृतीच्या अंधारात बुडविलेली जीवनांगे दृश्य होतील असा अनेकांना पटणारा पण न आवडणारा उजेड दिला आहे. अंधार पिण्याचा छंद जडलेल्या डोळयांना हा उजेड सहन होणार नांही. नकोसा वाटेल, तिरस्करणीय वाटेल, पण त्याची नालस्ती झाल्याच्या कथा आणि करणार्‍यांच्या गतकाळातील वसाहतींचा फुले-आंबेडकरांनी आम्हाला परिचय करून दिला आहेच. निंबाळकर अशा स्वकाळातील एका वसाहतीचा परिचय करून देत आहेत एवढेच.

कुणी कर्क शैलीनेच बोलायचे व्रतच घेतले तर निर्विवाद मुद्देही वादग्रस्त म्हणून बदनाम करता येतील. पण हे करण्यासाठी इतरांशी सोडाच स्वत:शीही फितूर व्हावे लागेल. पण जाणकारांनी या साईचमत्काराचे पूजक व्हावे की काय ते त्यांनीच ठरवायचे आहे. वामन निंबाळकरांची पुस्तिका स्वत: बोलकी आहे. त्याच्या संबंधी, त्यांच्या पुस्तिके संबंधी मित्र म्हणून आम्ही लिहिले. आम्हीही अस्मितादर्शच्या जन्मसोहळयाच्या वेळी औरंगाबादेला होतो. तिथल्या आभाळातील ग्रहमालांची, सूर्यमालेची मांडणी न्याहाळली आहे.

अस्मितादर्शचे साक्षेपी चरित्रकार निंबाळकर यांनी ही चरित्र-पुस्तिका लिहिली नसती तर सूर्य आजवर उगवला तसाच पाठमोराच उगवला असता. अस्मितादर्शच्या वास्तवाबद्दलचा. आणि ते स्वत: दलित साहित्याच्या प्रेरणातीर्थाला डॉ. बाबासाहेबांना कधीच आवडले

नसते. म्हणूही या पुस्तकेला अर्थ आहे. कुणाचे पाठबळ नसताना वैयक्तिक खर्चातून त्यांनी ही पुस्तिका छापली ही बाब त्यांच्यातील सत्यनिष्ठेचे प्रकाशन करणारी निश्चितच ठरावी.

अस्मितादर्शची नऊ वर्षे : वामन निंबाळकर

28-11-91
Raipur

आंबेडकरवादी साहित्यातील प्रस्तावनांचे हे पहिले पुस्तक. आंबेडकरवादी साहित्याने मराठी साहित्यात, मराठी सैद्धान्तिक समीक्षेत आणि उपयोजित समीक्षेतही नवी गौरवशाली क्षितिजे उघडून दिली. या क्षितिजांवर डॉ. यशवंत मनोहर या सृजनशील प्रज्ञा–प्रतिभेचे नाव एक प्रमुख नाव म्हणून कोरलेले आहे. एक विद्रोही कवी, एक जडवादी वैचारिक निबंधकार आणि लालित्याची कारंजी फुलविणारा प्रवासवर्णनकार म्हणून त्यांना महाराष्ट्राने सन्मानीत केले आहे. आणि " मध्यमवर्गीयांचे साहित्यशास्त्र दलित साहित्याच्या मूल्यमापनाला उपयोगाचे नाही, त्यासाठी वेगळे समीक्षाशास्त्र पाहिजे, अशीही विचारसरणी पुढे येऊ लागली. त्यांचे अध्वर्यू डॉ. यशवंत मनोहर आहेत. " या शब्दांत प्रा. रा. भि. जोशी यांनी त्यांच्या सैद्धांतिक समीक्षेचाही गौरव केलेला आहे.

' आंबेडकरवादी आस्वादक समीक्षा ' हे त्यांचे ' स्वाद आणि चिकित्सा ', ' बाळ सीताराम मर्ढेकर ' या पुस्तकानंतरचे उपयोजित समीक्षेचे महत्त्वाचे पुस्तक ! या पुस्तकात डॉ. मनोहरांच्या जडवादी जीवनदृष्टीने आणि समीक्षाशक्तीने एक नवाच सौंदर्यराग आळविलेला आहे.